उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १७८ ■ नाशिक, बुधवार, दि. १९ मार्च २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## उद्या अंक नाही

**गांवकरी**

रंगपंचमीनिमित्त आज बुधवारी (दि. १९) दै. गांवकरी कार्यालयास सुट्टी असल्याने गुरुवार (दि. २०)चा अंक प्रसिद्ध होणार नाही, याची आमचे असंख्य ग्राहक, वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

–संपादक

# पोलिसांवर हल्ला करणा-यांना माफी नाही

## मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितला घटनाक्रम; नागरिकांना शांततेचे आवाहन

**मुंबई : राज्यात कोणीही दंगा करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर जात-धर्म न पाहता कारवाई करण्यात येईल. पोलिसांवर हल्ला करेल त्याला सोडले जाणार नाही, असा स्पष्ट आणि कठोर इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. नागपूरच्या महल आणि हंसापुरी परिसरात झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात निवेदन दिले.**



यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील सर्वधर्मीय नागरिकांना शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. या ठिकाणी गुंतवणूक येत आहे. आपल्याला इच्छित उद्दिष्ट गाठायचे असेल तर नागरिकांना कायदा-सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे. सध्या अनेक धर्मांचे सण सुरू आहे. त्यामुळे सर्व लोकांनी संयम बाळगावा आणि एकमेकांविषयी आदरभाव बाळगावा. नागपुरातील महाल परिसरात सोमवारी (दि. १७) विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने औरंगजेबाची कबर हटाव, असे नारे देत आंदोलन केले होते. यावेळी त्यांनी गवताच्या पेंड्या असलेली प्रतीकात्मक कबर जाळली. याप्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी आंदोलकांवर दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर वातावरण शांत होते. मात्र, सायंकाळी अफवा पसरवण्यात आली की, सकाळी आंदोलकांकडून जी प्रतीकात्मक कबर जाळण्यात आली, त्याच्या कापडावर धार्मिक मजकूर होता. हे वृत्त पसरल्यानंतर नमाज आटोपून येत असलेल्या २०० ते २५० लोकांच्या जमावाने नारेबाजी सुरू केली. आम्ही आग लावून टाकू, अशी हिंसक भाषा त्यांनी केली. तेव्हा पोलिसांनी बळाचा वापर केला, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

तत्पूर्वी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांविरुद्ध तक्रार द्यायची आहे, अशी मागणी केल्यानंतर मुस्लिम समुदायाच्या लोकांना पोलिसांनी गणेशपेठ पोलीस ठाण्यात बोलावले. /-...४

### ८० जणांना अटक; अनेक भागात संचारबंदी

सद्य परिस्थिती नियंत्रणात असून, तणावपूर्ण शांतता आहे. महाल भागात पोलिसांनी रात्रभर कोम्बिंग ऑपरेशन राबवत ८० जणांना अटक केली आहे. आक्षेपार्ह व्हिडिओ आणि मजकूर पसरवणारी ५५ सोशल मीडिया अकाउंट पोलिसांच्या रडारवर आहेत. अनेक भागात जमावबंदी लागू करण्यात आली आहे. वीज आणि इंटरनेट बंद करण्यात आले होते. सायबर पोलिसांकडून जवळपास १८०० सोशल मीडिया अकाउंट्स तपासण्यात आले आहेत. महाल परिसरानंतर हंसपुरी भागातही तणाव निर्माण झाला व या भागात २० ते २२ वाहनांची तोडफोड करण्यात आली. मात्र, पोलिसांनी येथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आणली आहे.

### औवेसींचा दोन मंत्र्यांवर निशाणा, इंटेलिजन्सही लक्ष्य

एमआयएमचे खासदार असदुद्दीन औवेसी यांनी नागपूर घटनेवर प्रतिक्रिया देताना नाव न घेता मंत्री नितेश राणे आणि मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले. गेल्या काही आठवड्यांपासून महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडून भडकाऊ वक्तव्य केले जात आहे. कुराणवर जे लिहिले जाते ते एका कपड्यावर लिहिले होते, तो कपडा जाळला. यासंदर्भात हिंदू व मुस्लिम लोकांनी पोलिसांकडून जाऊन हे थांबवा, अशी विनंती केली होती. मात्र, पोलिसांनी ॲक्शन घेतली नाही. त्यानंतर रात्री हिंसाचार घडला. मी या हिंसाचाराचा निषेध करतो. मात्र, मंत्र्यांकडून होत असलेल्या भडकाऊ वक्तव्यांकडे पाहिले पाहिजे.

# मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक होणार

## बोगस मतदानाला आळा बसणार

**नवी दिल्ली :** पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंकिंगनंतर आता निवडणूक आयोगाने मतदानकार्ड आधार कार्डसोबत लिंक करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आणि घटनेतील तरतुदीनुसार निवडणूक आयोगाने दिल्लीत झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेतला. लवकरच यासंदर्भात तज्ज्ञांसोबत सल्लामसलत केली जाणार आहे.

आधारकार्ड फक्त ओळख प्रस्थापित करणारी व्यवस्था आहे, त्याचा संबंध नागरिकत्वाशी नाही. मतदानाचा अधिकार फक्त नागरिकांनाच आहे. इपीआयसीला आधारशी जोडण्यासाठी निवडणूक आयोगाकडून कलम ३२६, आरपी कायदा, १९५० आणि संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा आधार घेऊन कारवाई करण्यात येणार आहे. याबाबत युआयडीएआय आणि निवडणूक आयोगाच्या तज्ज्ञांमध्ये तांत्रिक सल्लामसलत लवकरच होणार आहे.

सध्या अनेक ठिकाणी एकाच मतदाराची नावे वेगवेगळ्या ठिकाणी नोंद होण्याचे प्रकार समोर आले आहेत. तसेच, बोगस मतदार ओळखणे आणि बनावट मतदान रोखण्यासाठी सरकार आणि निवडणूक आयोगाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. आधारकार्ड लिंकिंगमुळे प्रत्येक मतदाराची ओळख निश्चित करता येईल आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणता येईल. या निर्णयाच्या /-...४

### आधार लिंकिंगमुळे होणारे फायदे



आधार लिंकिंगमुळे नकली मतदार ओळखणे सोपे होईल. एकाच मतदाराची अनेक ठिकाणी नोंद टाळली जाईल. मतदारयादी अधिक स्वच्छ आणि विश्वासार्ह होईल. मतदान प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होऊन निवडणुका अधिक विश्वासार्ह आणि योग्य पद्धतीने पार पडतील. बोगस मतदान रोखण्यास मदत होईल आणि प्रत्येक मतदाराची ओळख निश्चित करता येईल.

## महत्त्वाचे

### माजी आमदार बाबाजानींवर गुन्हा



**परभणी :** जिल्ह्यातील पाथरी येथे साईबाबा विकास आराखडा समितीमध्ये काम करणाऱ्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्यासह आठ जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. ही घटना सोमवारी (दि.१७) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास घडली. दुर्राणी यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल होण्याची ही आठवड्यातील दुसरी घटना आहे. पालिकेतील कर्मचारी सदाशिव गायकवाड यांना दुर्राणी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी लाकडी फळीने मारहाण करत जखमी केले.

### माथेरान येथे कडकडीत बंद

**माथेरान :** येथे येणाऱ्या पर्यटकांचे वाढते फसवणुकीचे प्रकार रोखण्याच्या मागणीसाठी मंगळवार(दि.१८)पासून बेमुदत बंदची हाक माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने दिली होती. या आवाहनाला माथेरानकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. माथेरान व्यापारी संघटना, हॉटेल असोसिएशन, राजकीय पक्ष, ई-रिक्षा संघटना, विविध सामाजिक संघटनांनी या बंदला पाठिंबा दिला. त्यामुळे मंगळवारी माथेरानची बाजारपेठ, हॉटेल्स, हातरिक्षा, ई-रिक्षा शंभर टक्के बंद ठेवण्यात आल्या होत्या. पर्यटकांची वर्दळही दिसून येत नव्हती.

### राज्यात आजपासून सीईटी परीक्षांचे सत्र

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध १९ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. त्यासाठी बहुतांश सर्वच अभ्यासक्रमांची आवश्यक नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, १९ मार्चपासून प्रवेश परीक्षा सुरू होत आहेत. प्रवेश परीक्षेला एम.एड. आणि एम.पी.एड या अभ्यासक्रमांच्या परीक्षेने सुरुवात होणार आहे. तर एमएचटी सीईटीची परीक्षा अखेरीस होणार आहे. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आतापर्यंत १३ लाख ४३ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

### प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरणाऱ्या प्रशांत कोरटकर याचा अंतरिम जामीन अर्ज कोल्हापूरच्या सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. त्याला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. कोरटकरच्या अंतरिम जामीन अर्जावरील सुनावणी १७ मार्च रोजी पूर्ण झाली होती. न्यायालयाने या जामीन अर्जावरील निकाल १८ मार्चपर्यंत राखून ठेवला होता.

# ऑक्टोबरनंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शक्य?

## निकालानंतर १०० दिवस तयारीसाठी हवे

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता महापालिका निवडणुका कधी पार पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पण पुढील सहा ते सात महिने महापालिका निवडणुका होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे समजते.

मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची आणि राज्य निवडणुक आयोगाची नुकतीच बैठक पार पडली. यावेळी निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली आहे. सुप्रीम कोर्टाने निकाल दिला तरी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका ऑक्टोबरनंतरच होणार आहे. निवडणुकासंदर्भात पुढील सुनावणी ही ४ मे रोजी होणार आहे. मे महिन्यात निकाल लागला तरी देखील महानगरपालिकेच्या निवडणुका पावसाळ्याअगोदर होणार नाहीत. निकाल लागल्यानंतर जवळपास १०० दिवस प्रशासकांना निवडणुकीची तयारी करायला वेळ लागणार आहे. यामध्ये वॉर्डरचना, यादी तपासणी, हरकती मागवणे, आरक्षण सोडत या बाबींचा समावेश असणार आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुंबई महानगरपालिकेची निवडणूक कधी होणार याबाबत चर्चा सुरू आहे. कारण हा माहापालिका ताब्यात घेण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली होती. तर महायुती महापालिकेच्या निवडणुका एकत्रच लढणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### राज्यात सहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्य सरकारने सहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. नागपूरच्या अतिरिक्त मनपा आयुक्त आंचल गोयल यांची मुंबईच्या जिल्हाधिकारीपदी निवड करण्यात आली आहे. नागपूरसह जळगाव, नांदेड, पालघर आणि गडचिरोलीतील अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांची छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी तर गडचिरोलीतही रजणीत यादव यांना वेगळा पदभार देण्यात आला आहे.

# अनैतिक संबंधातून अपहरण; पंचवटीतील युवकाचा खून

**पंचवटी : वार्ताहर**



दिंडोरी रोडवरील म्हसरूळ शिवारात राहणाऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून एकवीस वर्षीय युवकाचा चार संशयितांनी अपहरण करून गळा आवळून खून केला. पेठ रोडवरील सावळ घाटात मंगळवारी (दि.१८) त्याचा मृतदेह आढळून आला.

### करंजाळीच्या घाटात सापडला मृतदेह

श्रीकांत भीमराव उबाळे (वय २१, रा. वज्रेश्वरीनगर झोपडपट्टी, पंचवटी) असे या युवकाचे नाव आहे. श्रीकांत बेपत्ता असल्याबाबत गुरुवारी (दि.१३) पंचवटी पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून श्रीकांतचे पोकार कॉलनीतील महिलेसोबत तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. तिला भेटण्यासाठी गेला असता तिचा पती संशयित दीपक काकडे याने श्रीकांत यास जबर मारहाण केली. संशयित राहुल शेळके, सविता काकडे, चंद्रकात कुलकर्णी यांनी रिक्षा (एमएच १५ एफएन २४६४) मध्ये जबरदस्तीने बसवून त्याला जीवे मारून पेठरोडवरील करंजाळी येथील घाटात टाकून दिले. म्हसरूळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल डहाके यांच्यासह दहा /-...४

# एक विषारी मंत्री उघडपणे समाजात द्वेष पसरवतोय

## नागपूर हिंसाचारावरून आंबेडकरांचा आरोप

**मुंबई :**

महाराष्ट्राचा एक विषारी मंत्री उघडपणे समाजात द्वेष पसरवत आहे आणि समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. एवढेच नाही, तर महाराष्ट्रात द्वेष पसरवण्यासाठी बाहेरून लोकांना आणले जात आहे, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.



नागपूर शहरात दोन गटांत झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर ॲड. आंबेडकर यांनी गंभीर आरोप करत महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. हा एका मोठ्या सुनियोजित कटाचा भाग असल्याचं सांगत अफवांकडे लक्ष न देण्याचे आवाहनही त्यांनी केले. गृहमंत्री नागपूरचे असताना दंगल होतेच कशी? असा प्रश्न करत विरोधकांनी मुख्यमंत्री फडणवीसांचा /-...४



# कबरीचा मुद्दा दिल्ली दरबारी?

## शिंदे केंद्राशी चर्चा करणार

**मुंबई :** सध्या राज्यात खुलताबाद येथे असलेल्या औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीच्या दौऱ्यावर जाणार असून, औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा ते केंद्रीय नेतृत्वाकडे उपस्थित करण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या मुलाच्या लग्नसोहळ्यात सहभागी होणार आहेत. या सोहळ्याला हजेरी लावल्यानंतर /-...४

# पंतप्रधान मोदी पूर्वजन्मीचे छत्रपती शिवाजी महाराज

## लोकसभेत भाजपा खासदाराचा दावा

**नवी दिल्ली :** मोदी पूर्वजन्मात छत्रपती शिवाजी महाराज होते, असा दावा भाजपचे ओडिशातील खासदार प्रदीप पुरोहित यांनी मंगळवारी (दि. १८) लोकसभेत बोलताना केला. त्यावरून विरोधकांनी आगपाखड सुरू केली आहे. भारतीय जनता पक्षाने या विधानाबद्दल माफी मागायला हवी, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे.

लोकसभा निवडणुकीदरम्यान पंतप्रधान मोदींनी आपला जन्म झाला नसून, आपल्याला देवानेच पाठवल्याचा दावा केला होता.



यावरून विरोधकांनी टीका केली होती. यानंतर आता भाजप खासदाराने लोकसभेत मोदी पूर्वजन्मात छत्रपती शिवाजी महाराज होते, असा दावा केला आहे. खा. प्रदीप पुरोहित म्हणाले, देशाला शक्तिशाली राष्ट्र /-...४

# मंत्री कोकाटे यांना हायकोर्टाचा दिलासा

## निर्णयात हस्तक्षेपास नकार

**नाशिक : प्रतिनिधी**



राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक येथील दंडाधिकारी न्यायालयाने खोट्या कागदपत्रांच्या आधारे चार घरे लाटण्याच्या प्रकरणात दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. या निर्णयाला नाशिक सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती. सत्र न्यायालयाच्या निर्णयात उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तसेच, कोकाटे यांच्यासह अन्य प्रतिवाद्यांना नोटीस बजावण्याचे आदेश न्या. लड्ढा यांनी दिले. आता या प्रकरणाची सुनावणी २१ /-...४

# तंत्रज्ञानाच्या मदतीतून खरा देवगड हापूसची ओळख

## आंबा उत्पादक सहकारी संस्थेकडून शेतकऱ्यांना TP Seal UID तंत्रज्ञानाचे वितरण

**मुंबई : पातळ सालीचा आणि आत भरपूर गर असणारा देवगड हापूस आंबा जाणकाराला नुसत्या सुवासाने ओळखता येतो. मात्र, तरीही अनेकदा देवगड हापूस आंबा खरेदी करताना ग्राहकांची फसवणूक केली जाते. खरेदी केलेला आंबा नक्की देवगडचा हापूसच आहे का? की त्या नावाखाली दुसराच हापूस दिला? हे ओळखण्यासाठी व ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी आता टेक्नॉलॉजीचा वापर केला जात आहे. त्यामुळे नागरिकांना खरा देवगड हापूस ओळखणे सोपे होणार आहे.**

बाजारपेठेत आता आंबे येऊ लागले आहेत. नुकतेच साताऱ्यातील देवगड हापूसच्या पहिल्या मानाच्या पेटीला २० हजारांची बोली लागली. देवगडचा हापूसला जगभरात सर्वोत्कृष्ट आंब्याचा दर्जा दिला जातो. आंतरराष्ट्रीय स्तरावरचा भौगोलिक मानांकनाचा दर्जाही या आंबाला आहे. आधुनिक टेक्नॉलॉजीचा वापर करून या आंब्यावर लावल्या गेलेल्या TP seal UID कोडवरून खरा देवगड हापूस ओळखता येणार आहे. जीआय नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. देवगड तालुक्यातील आंबा उत्पादक सहकारी संस्थेने भौगोलिक मानांकन नोंदणीकृत शेतकऱ्यांना त्यांच्याकडील झाडांची संख्या आणि त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार TP Seal UID या तंत्रज्ञानात वितरण केले आहे. यात शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा UID /-...४




# मोदींचे सुनीता विल्यम्स यांना भारत भेटीचे आमंत्रण

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात तब्बल नऊ महिने राहिल्यानंतर नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बूच विल्मोर मध्यरात्री पृथ्वीवर पोहोचणार आहेत. दरम्यान, सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतल्यानंतर भारतात येण्याची शक्यता आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विल्यम्स यांना पत्र लिहून भारत भेटीचे आमंत्रण दिले आहे.

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी पंतप्रधान मोदींनी सुनीता विल्यम्स यांना लिहिलेले पत्र सोशल मीडियावर शेअर केले आहे. मोदींनी पत्रात म्हटले आहे की, मी तुम्हाला भारतीयांच्या वतीने शुभेच्छा देतो. मी जेव्हा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प किंवा माजी राष्ट्राध्यक्ष बिडेन यांना त्यांच्या अमेरिका भेटीदरम्यान भेटलो, /-...४




## महत्त्वाचे

### मोतीवाला हॉस्पिटल येथे कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशले विकसित करणे. नवनिर्मितीची कौशले प्राप्त व्हावे यासाठी औपचारिक शिक्षणाबरोबरच बहि:शाल शिक्षण मंडळ (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) कार्यक्रमामार्फत दरवर्षी महाविद्यालयामध्ये अनेक उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक दर्जा सुधारण्याकडे महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. एफ. एफ. मोतीवाला यांचा कल असतो. त्यादृष्टीने महाराष्ट्र युनी हेल्थ सायन्सेसमार्फत महाविद्यालयामध्ये बहि:शाल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यापासून ते पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला. डॉ. स्वप्नील किरण गिरणारकर व विशाली नाईकवाडी, डॉ. विजय चड्ढा, डॉ. संजय रकिबे यांनी कार्यशाळा घेतली. कार्यशाळेचे नियोजनबद्ध मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एफ. एफ. मोतीवाला, ट्रस्टी डॉ. सहार मोतीवाला सिंह व उपप्राचार्य डॉ. मिता घरटे आणि रजिस्टार कर्नल राकेश चड्ढा यांनी केले. डॉ. स्वाती पाटील, डॉ. कीर्ती कदम व डॉ. शिवानी पाटील यांनी परिश्रम घेतले.

### भडांगे, आठवले, सोनपसारे यांची निवड





**सिडको : विशेष प्रतिनिधी**

त्रिशरण यंग फ्रेंड कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक विकास संस्था प्रणीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची महत्त्वाची बैठक त्रिशरण बुद्धविहार, उत्तमनगर या ठिकाणी समितीचे संस्थापक अध्यक्ष व मनपा स्थायी समितीचे माजी सभापती संजय साबळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीमध्ये सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विनोद भडांगे तर स्वागताध्यक्षपदी संतोष सोनपसारे यांची निवड सर्वांनुमते करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीत उपाध्यक्ष संजय गांगुर्डे, संदीप अहिरे, सचिव डॉ. अनिल आठवले, सहसचिव अजय साळवे, देवचंद केदारे, खजिनदार बाबासाहेब शिंदे, सहखजिनदार कुणाल जगताप, शिवनाथ अहिरे आदींसह समितीच्या प्रमुखपदी सुनील जगताप, प्रा. डॉ. व्यंकट कांबळे, दीपक पवार, बाळासाहेब जमदाडे, संदीप वानखडे, शुद्धोधन घायतडक, सचिन सोनपसारे, महिला अध्यक्ष शोभा केदारे, उपाध्यक्ष कल्पना नेरकर आदींची निवड करण्यात आली आहे. समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी विविध कार्यक्रमासह भव्य मिरवणुकीचे आयोजन देखील करण्यात आल्याची माहिती नवनिर्वाचित समितीचे अध्यक्ष विनोद भडांगे व स्वागताध्यक्ष संतोष सोनपसारे यांनी दिली

### स्वरांतून निथळली ईश्वरभक्ती



**नाशिक : प्रतिनिधी**

स्वरांचे माधुर्य, नजाकत व उपजत अभिजात स्वर यांचे गोंदण घेऊन सूर विश्वासची मैफल छान रंगली. यातून ईश्वर भक्तीची आस उपस्थितांनी अनुभवली. नव्या पिढीतील कलाकारांच्या आविष्काराला हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात येते. त्यात मुग्धा पेंढरकर किंकर यांचे गायन संपन्न झाले. अंशुल किंकर (तबला), शुभांगी भावसार(संवादिनी), सोहा ठकार (तानपुरा) यांची त्यांना साथसंगत लाभली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. मैफलीचे हे अठ्ठेचाळीस वे पुष्प होते. विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक असून, संकल्पना विनायक रानडे यांची आहे. विश्वास हब, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे कार्यक्रम झाला.

### गरिबांसाठी सहेरी, इफ्तार किट

**वडाळागाव : प्रतिनिधी**

सध्या रमजान महिना सुरू असून, रमजान महिन्यात संपूर्ण महिनाभर



विधवा तसेच आर्थिक दृष्टी दुर्बल गटातील गरजूंना हसनैन फाउंडेशन या संस्थेने मदतीचा हात पुढे केला असून, संस्थेच्या वतीने रोजा (उपवास) करिता सहेरी व इफ्तारचे किट तयार करून दररोज संस्थेच्या माध्यमातून शहरातील विविध भागात त्यांच्या घरी जाऊन घरपोच करत आहे. संस्थेचे कार्य बघून पुण्यकर्म करणाऱ्याच्या उद्देशाने दानशूर पुढे येऊन संस्थेला हातभार लावात आहे.

# कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या मागण्यांवर लवकरच निर्णय

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे आश्वासन

**नाशिक : प्रतिनिधी**

**कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या मागण्यांसंदर्भात लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले.**



राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी संपूर्ण राज्यात तहसीलदार, जिल्हाधिकारी, आयुक्त, शिक्षण विभाग या सर्वांना निवेदन देत आपल्या प्रश्नांकडे शिक्षणमंत्र्यांचे व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एल्गार पुकारला. सरकार सत्तेवर येऊन तीन महिने उलटले आहे. परंतु कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या आश्वासित प्रलंबित मागण्यांसंदर्भात शासनाने कुठलीही चर्चा अथवा बैठक घेतलेली नाही. अद्यापपर्यंत प्रश्न प्रलंबित असल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर पसरलेला आहे.

विधानमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारचे व शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी सर्वदूर राज्यात शांततेच्या मार्गाने कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांनी आपापल्या तालुक्यात तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना तसेच शिक्षण विभागाला निवेदन देत सरकारचे लक्ष वेधले. त्याचाच एक भाग म्हणून राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाच्या वतीने मुंबई येथे विधानभवनात शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना महासंघाच्या मागण्यांचे निवेदन दिले.

याप्रसंगी बोलताना शिक्षणमंत्र्यांनी अधिवेशन संपल्यानंतर आठ ते दहा दिवसांत प्रलंबित मागण्यांसंदर्भात बैठक घेऊन महत्त्वाच्या मागण्या तात्काळ मार्गी लावण्याबाबत आम्ही सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रलंबित विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. आमदार सत्यजित तांबे यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीला शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्यासह महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर, सचिव प्रा. लक्ष्मण रोडे, उपाध्यक्ष प्रा. रवींद्र भदाणे, सदस्य प्रा. नामदेव शेजवळ, प्रा. तनपुरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### 'मविप्र' तंत्रनिकेतनमध्ये २० रोजी 'जॉब फेअर'

**नाशिक : प्रतिनिधी**

मविप्र संचलित गंगापूररोडवरील राजर्षी शाहू महाराज तंत्रनिकेतनमध्ये बॉश इंडिया फाउंडेशनतर्फे दि. २० रोजी सकाळी १० वाजता जॉब फेअर 'भव्य रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात विविध क्षेत्रांतील नामांकित २० कंपन्या आणि त्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या कंपन्यांमध्ये साधारणत: ३५० रिक्त जागा भरण्यात येणार आहेत. बारावी, पदवीधर, आयटीआय, कौशल्य विकास, डिप्लोमा, डिग्री, केअर गिव्हर सर्व्हिस अशा सर्व अभ्यासक्रमांच्या उमेदवारांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, शहर संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, प्राचार्य प्रशांत पाटील आणि बॉश इंडिया फाउंडेशनच्या सहाय्यक प्रकल्प संचालक स्नेहा जंगम यांनी केले आहे.



### मोबाइल घेऊन पळणारा चोवीस तासांत गजाआड

**शिलापूर : प्रतिनिधी**

चालत्या रेल्वेतून हाताला झटका मारून मोबाइल हिसकावून पळून गेलेल्या आरोपीस २४ तासांच्या आत अटक करण्यात नाशिकरोड रेल्वे पोलिसांना यश आले.

सूरज हरिराम पाल, रा. खालची पेठ, इगतपुरी, नाशिक हे अंत्योदय एक्स्प्रेसमधून इगतपुरी ते नाशिक जनरल डब्यातून प्रवास करीत असताना नाशिकरोड रेल्वे स्टेशन येण्याअगोदर एका अनोळखी इसमाने गाडी हळूहळू चालत असताना सूरजपाल यांच्या हाताला झटका मारून मोबाइल हिसकावून पळ काढला होता. याबाबत रेल्वे पोलिसांत गुन्हा दाखल होताच या गुन्ह्यांच्या अनुषंगाने एक टीम बनवून फिर्यादीकडून या आरोपीचे वर्णन घेऊन सहायक फौजदार संतोष उफाडे पाटील यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेऊन शाहरुख अकबर पटेल, रा. देवळाली गाव, नाशिकरोड यास २४ तासांच्या आत अटक करून त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलीस अधीक्षक स्वाती भोर, उपविभागीय अधिकारी सूर्यकांत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सचिन बनकर, उपनिरीक्षक राजेश सोनवणे, सहायक फौजदार संतोष उफाडे पाटील, विलास इंगळे व राज बच्छाव यांनी केली.

दरम्यान, या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच नागरिकांनीही सतर्क राहावे आणि संशयित व्यक्ती दिसल्यास त्याची माहिती तत्काळ पोलिसांना देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# मेळा बसस्थानक स्वच्छतेकडे लक्ष द्या

## ना. सरनाईक : महामार्ग स्थानकाचा बीओटीवर विकास

**नाशिक: प्रतिनिधी**

मेळा बसस्थानकातील स्वच्छता आणि सुरक्षेच्या बाबत एसटीच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गांभीर्याने लक्ष पुरवावे, असे आदेश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मेळा बसस्थानकाच्या स्वच्छतेकडे गेल्या काही महिन्यांत दुर्लक्ष झाल्याने बसस्थानकाला अवकळ प्राप्त झाली आहे. त्यामुळे आमदार देवयानी फरांदे यांनी परिवहनमंत्र्यांकडे तक्रारी केल्या होत्या. त्याची दखल घेत ना. सरनाईक यांनी मंत्रालयात बैठक घेतली. या बैठकीला



आमदार फरांदे यांच्यासह उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक उपस्थित होते.

यावेळी बोलताना फरांदे यांनी मेळा बसस्थानकासाठी लाखो रुपये खर्च केले आहेत. मात्र योग्य देखभाल, दुरुस्ती होत नाही, तसेच महामार्ग बसस्थानकाचे रूप पालटणे गरजेचे आहे. नाशिकचे मध्यवर्ती बसस्थानक म्हणून महामार्ग बसस्थानकाचा वापर होणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाची तीस हजार चौरस मीटर जागा आहे.

आगामी सिंहस्थ लक्षात घेऊन या स्थानकाचा विस्तार करणे गरजेचे आहे. यावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी महामार्ग बसस्थानक बीओटी तत्त्वावर विकसित करू, तसेच मेळा बसस्थानकाच्या स्वच्छतेकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी या बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या. या स्थानकाला आपण अचानक भेट देऊ, असेही प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

### रेल्वे पोलिसाने वाचविले आत्महत्या करणाऱ्याचे प्राण

**शिलापूर : प्रतिनिधी**

धावत्या मालगाडीखाली आत्महत्या करू पाहणाऱ्या एका तरुणाचे प्राण रेल्वे पोलिसांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे वाचले. या रेल्वे पोलिसाचे कौतुक होत आहे.

नाशिकरोड रेल्वे पोलीस हवालदार संदीप उगले मध्यरात्री प्लॅटफॉर्म एकवर पेट्रोलिंग करत असताना एक इसम प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवरून उतरून मालगाडीसमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांना दिसून आले. उगले यांनी क्षणाचाही विलंब न लावता स्वत:चा जीव धोक्यात घालून रेल्वे ट्रॅकवर उडी मारून अभिषेक अशोक काचकुंडे (रा. अंबड) याचा जीव वाचविला. त्याला बाजूला घेत विचारपूस केली असता त्याने मित्रासोबत भांडण झाल्याने नैराश्यातून रेल्वे स्टेशन येथे जीव देण्यासाठी आल्याचे सांगितले.

त्यावरून त्यास समजावून सांगून त्याचे मूळ गावी देवगिरी एक्स्प्रेसमध्ये बसवून दिले. संदीप उगले यांच्या कामगिरीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. प्रभारी अधिकारी सचिन बनकर यांनी त्यास धन्यवाद देत कौतुक केले.

# बी. टी. पाटील यांना बडतर्फ करा

## मनसे विद्यार्थी सेनेची निवेदनाद्वारे मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक मनपा प्रशासनाधिकारी बी. टी. पाटील यांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे, या मागणीचे निवेदन मनसे विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाने मनपा उपायुक्त साताळकर यांना दिले.



प्रशासनाधिकारी बी. टी. पाटील यांनी जवळपास ५२ हून अधिक शिक्षकांचे बेकायदेशीरपणे महापालिकेच्या सेवेत समायोजन केले. त्यामुळे शिक्षण विभागात संतापाची लाट उसळली आहे. जिल्हा परिषदेसह अन्य आस्थापनांमधून महापालिकेच्या सेवेत एकतर्फी वर्ग करण्यात आलेल्या शिक्षक तसेच मुख्याध्यापक व उपशिक्षकांना केंद्रप्रमुखपदी बेकायदेशीरपणे भरती दिल्याप्रकरणी शासनाकडून बी. टी. पाटील यांचे चौकशीचे व बदलीचे आदेश देण्यात आले आहे. यातून पाटील यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला आहे. त्यामुळे अशा भ्रष्टाचारी प्रशासनाधिकारी बी.टी. पाटील यांची बदली न करता यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, तसेच कोणत्या शिक्षकांकडून पदोन्नतीसाठी, केंद्रप्रमुख करण्यासाठी किती रुपये घेतले याची माहिती घेऊन त्या शिक्षकांची सुद्धा चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अन्यथा मनसेतर्फे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य शशिकांत चौधरी, जिल्हाध्यक्ष बब्बू पाटील, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहराध्यक्ष ललित वाघ, विभाग अध्यक्ष बाळा नवले, मयूर पाटील, मयूर जैन, दर्शन बोरसे, वैभव रौंदळ आदी उपस्थित होते.

# देवळाली कॅम्पला ठाकरे यांचा सत्कार

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

ज्या भागात पक्षाला जनाधार नव्हता, त्या भागात दहा वर्षांपूर्वी सचिन ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कमळ फुलविले. त्यांच्या अभ्यासू व दूरदृष्टीला पक्षाने न्याय दिला. त्यांच्या माध्यमातून देवळालीचा विकास साधला जाणार असल्याचे प्रतिपादन भाजप प्रदेश नेते विजय साने यांनी केले.



केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आलेल्या गॅझेटनुसार देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या नामनिर्देशक सदस्यपदी सचिन ठाकरे यांची नियुक्ती झाल्यानंतर कॅन्टोन्मेंट कायद्यातील तरतुदीनुसार काल बोर्डाच्या विशेष सभेत त्यांचा शपथविधी झाला. अध्यक्षस्थानी पदसिद्ध अध्यक्ष ब्रिगेडियर आशिष भारद्वाज होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक मनी यांनी सभेचे विषयपत्रिका सादर केली.

यावेळी सचिन ठाकरे यांना सदस्यपदाची व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. यावेळी त्यांचा माजी खासदार हेमंत गोडसे, ब्रिगेडियर आशिष भारद्वाज यांनी सत्कार केला. ब्रिगेडियर भारद्वाज यांनी नवनिर्वाचित सदस्य ठाकरे यांचा सत्कार करत शहर विकासासाठी कार्यरत राहण्याचे सूचित केले.

व्यासपीठावर भाजपचे प्रदेश नेते विजय साने, माजी आमदार बाळासाहेब सानप, मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे, महाराज बिरमानी, रिपाइंचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, उद्धव निमसे, प्रकाश दायमा, शशिकांत जाधव, संभाजी मोरुस्कर, माजी उपाध्यक्ष बाबूराव मोजाड, छाया हाबडे, सुरेखा कुलथे, पंकज शेलार, सुभाष खालकर, हिरेन उदानी, आमीन खान आदी पदाधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सुधाकर गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रशांत कापसे यांनी मानले.

# जिल्हा समावेशित कृती केंद्राचे उद्‌घाटन

## मिशन आत्मनिर्भर : दिव्यांग विद्यार्थ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

**मिशन आत्मनिर्भर अंतर्गत जिल्हा समावेशित कृती केंद्र नाशिक येथे सुरू झाले आहे. समग्र शिक्षा, जिल्हा परिषद नाशिक, इम्पथी फाउंडेशन आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या समावेशित कृती केंद्राचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.**



**या सेवांचा लाभ मिळणार**

- ० ते १८ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत थेरपी सेवा व शैक्षणिक मार्गदर्शन.
- दैनंदिन कौशल्ये विकसित करून स्वावलंबी बनविणे.
- शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी पालक आणि शिक्षक मार्गदर्शन.
- वैद्यकीय सुविधा, शस्त्रक्रिया, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि यूडीआयडी कार्ड मार्गदर्शन.
- व्यवसायपूर्व कौशल्य प्रशिक्षण व मार्गदर्शन.
- सर्व विद्यार्थ्यांसाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी समाजात पूरक वातावरण

या केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, रेमेडियल टीचिंग, लर्निंग ॲक्टिव्हिटी आणि पालक समुपदेशन यांसारख्या सर्व सेवा एका छताखाली उपलब्ध आहेत. भविष्यात दिव्यांग विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर होण्यासाठी नियमित थेरपी सेवा व शिक्षण घ्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी पालकांना केले.

शिक्षण विभागाच्या वतीने शासकीय कन्या विद्यालयामागील विस्तारित इमारतीतील ३ खोल्या शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव यांनी या समावेशित कृती केंद्रासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. इमारतीचे नूतनीकरण इम्पथी फाउंडेशन मुंबई यांनी केले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक थेरपी साहित्य, शैक्षणिक साहित्य आणि तज्ज्ञ डॉक्टर प्रथम एज्युकेशन फाउंडेशनने उपलब्ध करून दिले.

या कार्यक्रमाला इम्पथी फाउंडेशनचे एम. आर. सुंदरेश्वरम, विश्वस्त मितुल रमेश दमानी, दिनेश झोरे, कपिल, सचिन चौधरी, गटशिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी, प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक गजेंद्र आंबेकर व त्यांची टीम तसेच दिव्यांग विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. मिशन आत्मनिर्भर अंतर्गत जिल्हा समावेशित कृती केंद्राच्या धर्तीवर इतर १५ गट संसाधन केंद्रातही अशाच प्रकारची केंद्रे लवकरच सुरू होणार असल्याचे आशिमा मित्तल यांनी सांगितले. या केंद्रात बहुविध तज्ज्ञ टीममार्फत एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या थेरपी सेवा दिल्या जातील. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इम्पथी फाउंडेशन, प्रथम एज्युकेशन सोबतच उपशिक्षणाधिकारी धनंजय कोळी, डॉ. मिता चौधरी, जिल्हा समन्वयक विजया अवचार, वनिता मंडलिक यांनी परिश्रम घेतले.



### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांचा सन्मान

**नाशिक : प्रतिनिधी**

अशोक स्तंभ शिवजन्मोत्सव समिती मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष व्यंकटेश मोरे व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमानाने उत्तराखंडातील २८ जानेवारी ते २४ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा विजय पथक मिळविणाऱ्या खेळाडूंचा व त्यांच्या शिक्षकांचा सन्मान सोहळा शिवजन्मोत्सव समिती अशोक स्तंभ मित्र मंडळातर्फे पार पाडला.

**या खेळाडूंचा झाला सन्मान**

संजीवनी जाधव, पूनम सोनूने (ॲथलेटिक्स), ऋतुजा शहारे (खो खो), सायली वाणी, तनिषा कोटेचा (टेबल टेनिस), मृण्मयी साळगावकर, (रोइंग), आकांक्षा शिंदे (जुदो), आर्या बोरसे (नेमबाजी), राखी गहलोत (कॅनोइंग), मुकुंद आहेर, साईराज परदेशी (वेटलिफ्टिंग), उज्ज्वला घुगे, आकांक्षा कातकाडे (रग्बी) सहभागी झालेले खेळाडू आकाश शिंदे, अनुष्का आंबेकर, करण आघाव, अक्षदा निगळ, धनश्री सांगळे, कावेरी महाले, सेजल सिंग कोमल जगदाळे, श्रुती चंदे, मनोज महाले, तनुजा वाघ.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, रोइंगपटू दत्तू भोकनळ, नाशिकची माका अध्यक्ष नरेंद्र छाजेड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी श्रम घेतले. संस्थापक अध्यक्ष व्यंकटेश मोरे, सचिन मोरे, आनंद फरताळे, समीर व्यवहारे, अक्षय भडांगे, हर्षल निकम, करण परदेशी आदी उपस्थित होते.



# ठाणगाव येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसलेंना अभिवादन

**ठाणगाव : वार्ताहर**

**ठाणगाव येथे जनसेवा सेवाभावी संस्थेच्या वतीने हिंदवी स्वराज्य संकल्पक छत्रपती शहाजीराजे भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अटल फाउंडेशन जिल्हाध्यक्ष व जनसेवा सेवाभावी संस्था संस्थापक अध्यक्ष रामदास भोर होते. त्यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

जनसेवेचे कार्याध्यक्ष बबन काकड, सामाजिक कार्यकर्ते के. एल. शिंदे यांनी छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या जीवनाविषयी माहिती दिली. शहाजीराजांनी सर्वप्रथम हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले त्यासाठी त्यांनी अथक संघर्ष केला, तसेच स्वराज्य स्थापनेच्या कार्यात छत्रपती शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या प्रेरणेतूनच हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यांचे शौर्य, चरित्र आणि विचार सदैव प्रेरणा देत राहील अशी भावना काकड व शिंदे यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रगतशील शेतकरी शांताराम शिंदे, रामहरी रेवगडे, अण्णासाहेब शिंदे, मोहन शिंदे, सुरेश शिंदे, सुदाम शिंदे, सोमनाथ शिंदे, भीमा शिंदे, शिवाजी शिंदे, राजेंद्र काकड, मदन शिंदे, नितीन रेवगडे, सागर शिंदे, एकनाथ शिंदे, नाना शिंदे, दत्तात्रय शिंदे, भानुदास शिंदे, बाळासाहेब शिंदे, अर्जुन शिंदे, विठोबा गाडेकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

**मिळकत विभाग (मुख्यालय),**
**राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२**
**ई-निविदा सुचना क्र. ०३ (सन २०२४-२५)**

**कामाचे नांव :-** नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नाशिक पश्चिम विभागातील आकाशवाणी केंद्र गंगापुर रोड येथील सर्व्हे नं. ७०५ मधील छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव मनपाच्या अटीशर्तीनुसार १० वर्षे कालावधी करिता लिव्ह ॲण्ड लायसेन्स निविदा पध्दतीने व्यवस्थापन व देखभाल दुरूस्तीसाठी देणे बाबत.

नाशिक महानगरपालिका नाशिक, जलतरण तलाव, मिळकत विभागाच्या कामाची ई-निविदा सुचना क्र.३ सन २०२४-२०२५ दि. १९/०३ /२०२५ पासुन दि. २६/ ०३ /२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजे पावेतो मा. शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल निविदा स्विकृतीची अंतिम दि.२६/०३/२०२५ राहील.

**टीप - यापुढील सर्व आवश्यक सुचना/शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.**

| | |
|---|---|
| **Sd/-xxx**<br>**अति. आयुक्त (शहर)**<br>**नाशिक महानगरपालिका, नाशिक** | **Sd/-xxx**<br>**आयुक्त तथा प्रशासक**<br>**नाशिक महानगरपालिका, नाशिक** |

जनसंपर्क/जा.क्र/३९०/२०२५ दि.१८/०३/२०२५ "पर्यावरण बचे, तो प्राण बचे ।"



# सिन्नर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ब्ल्यू क्रॉस लॅबोरेटरीची शिष्यवृत्ती

**सिन्नर : प्रतिनिधी**

**येथील सिन्नर महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील १२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १५००० अशी एकूण १ लाख ८० हजार रुपयाची शिष्यवृत्ती नुकतीच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आली.**

ब्ल्यू क्रॉस लॅबोरेटरी कडून संगणक शास्त्र विभागात शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या मागास व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दरवर्षी दिली जाते. महाविद्यालयातील प्रथम वर्ष संगणक शास्त्र विभागात शिकत असलेले ठाकूर राहुल अमरनाथ, वाजे प्रसाद अमरनाथ, पाटोळे आदित्य शिवाजी, भोसले सुमित मच्छिंद्र, गुप्ता अंशुकुमार वीरेंद्र, द्वितीय वर्ष संगणक शास्त्र विभागात शिक्षण घेत असलेले जगताप विवेक पंढरीनाथ, शिंदे अभिषेक धनराज, शिंदे साहेबराव गंगाधर, हारक जयेश प्रकाश, सोनावणे रोहित उत्तम, तसेच तृतीय वर्ष संगणक शास्त्र विभागात शिकत असलेले मते अनिकेत गणेश, सोनावणे विवेक पुरुषोत्तम हे विद्यार्थी या शिष्यवृत्तीचे लाभार्थी ठरले आहेत.याप्रसंगी महाविद्यालयाचे अधीक्षक के. सी. गोसावी, लेखापाल डगळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. श्रीमती एन. व्ही. लहामगे आदींसह शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी उपस्थित होते.

# बुलेटच्या ३५ सायलेन्सरवर फिरविला रोड रोलर

**शिरूर :** रस्त्यावरुन बुलेट चालवत सायलेन्सरचा



मोठा आवाज व फटाके फोडणारे किंवा कर्कश आवाज करणारे बुलेट चे सायलेन्सर पोलीसांनी कारवाई करत जप्त केले होते . अश्या ३५ सायलेन्सरची रोड रोलर च्या मदतीने विल्हेवाट लावण्यात आली असून यापुढे ही अशी कारवाई सुरुच राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले. केंजळे म्हणाले पोलीस स्टेशनचा वाहतूक शाखा मार्फत शिरूर शहरातील बुलेट मोटर सायकल वर वेळोवेळी कारवाई करून फटाके फोडणारे किंवा कर्कश आवाज करणारे बुलेट चे सायलेन्सर जमा करण्यात आले होते. या सायलेन्सरची रोड रोलरच्या मदतीने नवीन पोलीस स्टेशनचा इमारती समोर या सायलेन्सर वर रोड रोलर फिरवून विल्हेवाट लावण्यात आली. पोलीस अधीक्षक पकंज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढे ही वाहतूकीला व रहदारीस शिस्त लावण्याकरीता कडक कारवाई करण्यात येणार आहे .रस्त्यावरुन बुलेट चालवत सायलेन्सरचा मोठा आवाज फटाके फोडणारे किंवा कर्कश आवाज करणारे सायलेन्सरवर यापुढे ही अशीच कारवाई करण्याबरोबर अश्याप्रकारचे आवाज काढणा-या सायलेन्सरची विक्री करणा-या दुकानदारांना नोटीसा काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर चारचाकी गाड्यांच्या काळ्या काचा करण्यारांच्या विरोधात ही कारवाई सुरु करत असल्याचे केंजळे यांनी सांगितले.

**अकोला:** शिकायचं असेल तर पैसे दे, अशा पद्धतीने काही टवाळखोर तरुण बाहेरगावच्या विद्यार्थ्यांसमोर असा तगादा अर्थातचं पैशाची मागणी करत आहेत. मागील काही दिवसांपासून हे प्रकार वाढले आहेत.

## मुळ दस्तऐवज व पावती गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मौजे आडगांव** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **गट नंबर / सर्व्हे नंबर २६८** यांसी **प्लॉट नंबर ४ (बी-४)** यांसी **क्षेत्र २४८.०० चौरस मीटर** ही मिळकत **दिगंबर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.** चे सभासद **विशाल राजमल मनिखेडकर व शोभा राजमल मनिखेडकर** यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीबाबत मे.दुय्यम निबंधक नाशिक यांचे कार्यालयात **कायम फरोक्त खरेदीखताचा दस्त क्र.९३२६**, तारीख ३१/८/१९९९ रोजी नोंदविलेला असून, **सदरचा दस्त सदरचे मिळकत मालकांकडून गहाळ झालेला आहे**. सदरहु मुळ दस्त व पावतीचा बराच शोध घेतला असता कोठेही आढळुन येत नसुन त्याकरीता **मे.आडगांव पोलिस स्टेशन यांचेकडे वस्तु मिसिंग रजिस्टर नंबर २०३/२०२५ अन्वये नोंद केलेली आहे**. सबब, उपरोक्त मुळ खरेदीखत व त्याची मुळ पावती कोणासही मिळुन आल्यास त्यांनी **७ दिवसांचे आत** खालील पत्त्यावर आणुन देणेची विनंती सदर नोटीसीव्दारे करण्यात येत आहे. कळावे, ही नोटीस. दिनांक १७/३/२०२५.

**ॲड.तुषार छाया नंदकुमार कुलकर्णी**
जीएफ-२,ठक्कर्स बझार,नवीन सिबीएस.,नाशिक.मो.९४२३९६५५५०

## जाहीर नोटीस (गहाण घ्यावयाच्या मिळकतीबाबत)

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** गांवचे शिवारातील मिळकती यांसी.... **अ) सिटी सर्व्हे नं.१९१०** यांसी **क्षेत्र ३८.५ चौ.मी.** व त्यावरील **बांधीव मिळकत** यांसी **बांधीव क्षेत्र ५८.६८ चौ.मी.** आणि **ब) सिटी सर्व्हे नं.१९००/१** यांसी **क्षेत्र ४१.८१ चौ.मी.** व त्यावरील **बांधीव मिळकत** यांसी **बांधीव क्षेत्र ४१.८१ चौ.मी.** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसुप्रमाणे. उपरोक्त नमुद मिळकती ह्या मिळकत मालक **वाहिद खान महम्मद खान (कर्जदार)** यांच्या मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जेउपभोगातील असून त्यांना प्राप्त हक्क व अधिकारात त्यांनी उपरोक्त मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचे खात्रीशीरपणे सांगुन आमचे पक्षकार फायनान्स कंपनीकडे उपरोक्त नमुद मिळकतींवर तारण कर्जाची मागणी केलेली आहे व सदर कर्जासाठी उपरोक्त कलम अ व ब मध्ये नमुद दोन्ही मिळकती तारण देण्याचे लेखी मान्य व कबुल केलेले आहे. सबब, उपरोक्त मिळकती गहाण देण्यास कोणाचीही काहीही हरकत असल्यास अगर सदर मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध अगर बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७ (सात) दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर साक्षांकीत प्रतीसह समक्ष हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकतीचे टायटल निर्वेध व बोजारहीत समजून आमची पक्षकार फायनान्स कंपनी कर्जाबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करेल व त्यानंतर कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. आमचे कार्यालया व्यतिरिक्त किंवा परस्पर वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.कळावे, ही जाहीर नोटीस. दि.१८/०३/२०२५.

| | |
|---|---|
| **समीर चंद्रशेखर रत्नपारखी,**<br>**ॲडव्होकेट**<br>ऑफीस नं.३१०, सारडा संकुल,<br>एम.जी.रोड, नाशिक.<br>मो.९६२३१९३७८५,९१७५७२६५२९ | **श्रीराम फायनान्स लि.**<br>**तर्फे शाखाधिकारी पंकज घुगे**<br>मो.नं.८८८८८५३३३५.<br>फोन नं.०२५३-२४७१४८५/८६,<br>माहितीवरुन सांगणेवरुन.<br>शाखा गोविंद नगर,नाशिक यांचेकडील |

## पेठ नगरपंचायत, पेठ

संपर्क ०२५५८-२२५५१० ई-मेल-nppeth@gmail.com

जा.क्र/नपपे/२२१/२०२५ दिनांक- १८/०३/२०२५

**जाहीर निविदा सूचना**
**(आरोग्य विभाग)**
**सन २०२५-२६**

पेठ नगरपंचायत ता. पेठ, जि. नाशिक आरोग्य विभागाकरीता खालील नमूद केलेल्या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्मची किंमत (रुपये) | बयाणा रक्कम (रुपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | पेठ नगरपंचायत क्षेत्रातील भटकी मोकाट कुत्रे यांना प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० महाराष्ट्र प्राणी संरक्षक कायदा १९७६ प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार पकडून त्यांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे. व त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देणे. | २००/- | ५००/- | १ वर्ष |

उपरोक्त नमूद कामाकरिता इच्छुक ठेकेदार यांनी **दिनांक: १९/०३/२०२५ ते २५/०३/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेत आपली निविदा पेठ नगरपंचायत कार्यालयात सादर करावी. सदर कामाचे निविदा फॉर्म, अटी व शर्ती, दरपत्रक तसेच कामाबाबत सविस्तर माहिती पेठ नगरपंचायतीच्या आरोग्य विभागात पहावयास मिळतील. तसेच अटी व शर्तीची निविदा स्वीकारली जाणार नाही. निविदा मंजूर किवा नामंजूर करणेचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे.

| | | |
|---|---|---|
| **(ऋषिकेश पाटील)**<br>**मुख्याधिकारी** | **(अफ्रोजा शेख)**<br>**उपाध्यक्षा** | **(करण करवंदे)**<br>**अध्यक्ष** |

**पेठ नगरपंचायत, पेठ, जि. नाशिक**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**स्वछ, सुंदर बसस्थानकासाठी स्वारस्य अभिव्यक्ती सूचना मागवत आहे**

रा.प. महामंडळाच्या वतीने **२३ जाने-२५** पासून "**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान**" राज्यातील ५८० बसस्थानकांवर राबविण्यात येत आहे. प्रवाशांना दर्जेदार आणि गुणात्मक सेवा देण्याच्या उद्देशाने स्वच्छ बसेस बसस्थानके, सुंदर बसस्थानक परिसर आणि टापटीप प्रसाधनगृहे या त्रिसुत्रावर आधारित बसस्थानक परिसराचे सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरण करणे यामध्ये अभिप्रेत आहे. यासाठी राज्यातील सर्व बसस्थानकावर स्वखर्चाने स्वच्छता, सुशोभीकरण व सौंदर्यीकरण करणे यासाठी त्या परिसरातील लघु, मध्यम, मोठे उद्योजक, व्यापारी, सहकारी संस्था यांच्याकडे स्वारस्य अभियात्रि सूचना मागविण्यात येत आहे.

१ बसस्थानकाच्या मुख्य इमारतीची किरकोळ डागडुजी करणे, विद्युत उपकरणाची दुरुस्ती करून विद्युत दिवे, पंखे इत्यादी अनुषंगिक गोष्टी शुल्यवस्थित करणे.
२. बसस्थानकाच्या मुख्य इमारतीची रंगरंगोटी करणे.
३. बसस्थानकावरील प्रसाधनगृहांची किरकोळ दुरुस्ती करून ते स्वच्छ निटनेटके व निर्जंतुक ठेवण्याच्या दृष्टीने व्यवस्था निर्माण करणे
४. बस स्थानकाच्या प्रत्येक पलाटावर गावाचे मार्गदर्शक फलक व प्रवाशांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांचे नाम फलक विहित नमुन्यात तयार करणे
५. बसस्थानक व परिसराची दैनंदिन स्वच्छता, सुशोभिकरण व सौदर्यीकरण करणे.
६. इतर कामे

**वरील सर्व कामांची, देखभाल व दुरूस्ती १ वर्षासाठी असेल.**
**संस्थेचे काम उत्कृष्ट असेल तर आपल्याशी केलेला करार पुढील २ वर्षासाठी वाढविण्यात येईल.**

याबदल्यात बसस्थानकांमध्ये संबंधीत संस्थेला त्यांच्या स्वतःच्या उत्पादनाची अथवा सेवेची वर्षभरासाठी जाहिरात प्रसिध्दी व विक्री करण्याची मुभा रा.प. महामंडळाव्दारे देण्यात येत आहे. त्यासाठी पुढील मार्गदर्शक तत्वे अंगिकरण्यात येतील.

१. संबंधित संस्थेला बसस्थानक परिसरामध्ये वाहतुकीला अडथळा येणार नाही अशा ठिकाणी दर्शनी भागात १० फुट X १० फुट आकाराची मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. येथे संबंधीत संस्था स्वखर्चाने तात्पुरता स्टॉल उभारून आपल्या उत्पादन अथवा सेवेची जाहिरात अथवा थेट विक्री करू शकते. (प्रस्थापित वाणिज्य अस्थापणाच्या हेतूला धक्का लागणार नाही याची दक्षता घ्यावी).
२. वाहतूकीला अडथळा होणार नाही अशा ठिकाणी बसस्थानक परिसरामध्ये दर्शनी भागात १० फुट X १५ फुट आकाराचे होर्डिंग्स स्वखर्चाने उभारून (संख्या-१) संबंधित कंपनी स्वता:च्या उत्पादनाची अथवा सेवेची जाहिरात करू शकते.
३. बसस्थानकाच्या मुख्य इमारतीमध्ये आपल्या उत्पादन व सेवेची जाहिरात करण्यासाठी (प्रवाशी चढ-उताराला अडथळा होणार नाही अशा पध्दतीने) ६X३ आकाराच्या कापडी स्टॅंडीज (संख्या ३ ते ५) याची मुभा संबंधीत कंपनीला देण्यात येईल.
४. बसस्थानकाच्या मुख्य इमारतीवर प्रत्येक फलाटावर लावण्यात येणारे गावाचे मार्गदर्शक फलकावर त्या एकूण फलकाच्या आकाराच्या ९ तृतीयांश (१/३) जागेवर संबंधीत संस्थेच्या उत्पादन अथवा सेवेची जाहिरात करता येऊ शकेल.
५. बसस्थानकावर प्रवाशांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांच्या नाम फलकांवर एकूण फलकाच्या आकाराच्या १ पंचमांश (९/५) भागावर संबंधित संस्था आपल्या उत्पादन अथवा सेवेचे नाव लिहू शकते.

उपरोक्त कामासोबत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे योग्य पालन करणाऱ्या संस्था अथवा उद्योग समुहांना स्थानिक बसस्थानकांची स्वच्छता सौदर्यकरण व सुशोभीकरण करण्यासाठी स्वारस्य अभिव्यती सूचनेच्या माध्यमातून विभागातील बसस्थानकासाठी (एक, दोन अथवा सर्व बसस्थानकांसाठी) निमंत्रीत करण्यात येत आहे. ज्या संस्था अथवा समूहांना यामध्ये स्वारस्य असेल त्यांनी आपला प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये विभाग नियंत्रक यांच्याकडे **१५** दिवसांत सादर करावा. (विहित नमुना विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे). त्यातील उत्कृष्ट प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्था अथवा समुहाता पुढील १ वर्षासाठी नियुत्रि देण्यात येईल

**(कृपया आमली पदार्थ, संबाखू, गुटखा, मद्य तत्सम पदार्थांचे उत्पादक व सेवा करणाया संस्था अथवा कायद्याने जाहिरात करण्यासाठी प्रतिबंधित उत्पादने व सेवा करणाऱ्या समूहाने या स्वारस्य अभिव्यक्ती सूचनेत भाग घेवू नये.)**

**विभाग नियंत्रक**
**रा.प.नाशिक**

# धुळ्यात २६ हजार रुपयांच्या बनावट नोटा; एकजण पोलिसांच्या ताब्यात

**धुळे :** चलनात बनावट नोटा आणून त्याद्वारे फसवणूक केली जात असते. अशी बनावट नोटा चलनात आणणारी टोळी सक्रिय असून धुळ्यामध्ये २६ हजार रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या आहेत. भारतीय चलनातील बनावट नोटांसह एका इसमाच्या धुळ्याच्या आझाद नगर पोलिसांनी ताब्यात घेत नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. बनावट नोटा चलनात आणल्या जात आहेत. या नोटा चलनात आणणारी टोळी सक्रिय झाली असून धुळे जिल्ह्यात मागील महिन्यातच पोलिसांनी कारवाई केली होती. मागील महिन्यात शिरपूर येथे पोलिसांनी कारवाई करत तब्बल ४ लाख ११ हजार ५०० रुपयांच्या नकली नोटा आढळून आल्या होत्या. यात चौघांना ताब्यात घेण्यात आले.

## टायटल व्हेरीफिकेशनकरीता जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तालुका जिल्हा नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे सातपुर** शिवारातील **सर्व्हे नं.४८७/ब/१** पैकी **प्लॉट नं.२७** यांसी क्षेत्र २८५.०० चौ.मी. यावर मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे बांधण्यात आलेल्या **हरफुल अपार्टमेंट विंग ए** या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील **फ्लॅट नं.५** यांसी **बांधीव क्षेत्र २८.०० चौ.मी.** ही फ्लॅट मिळकत **मे.श्री निळकंठ कन्स्ट्रक्शन** भागीदारी संस्था तर्फे भागीदार **कै.जयवंतसिंग हरफुलसिंग यादव** तर्फे वारस **श्री.विजयकुमार जयवंतसिंग यादव** यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जेउपभोगातील असून त्यांनी सदर फ्लॅट मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे सांगुन आमचे पक्षकारांशी मिळकतीचा व्यवहार निश्चित केलेला आहे. सबब, अंतीम खरेदीखता पूर्वी मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधता तपासणेकामी प्रस्तुत नोटीस टायटल व्हेरीफिकेशनकामी प्रसिध्द केलेली आहे.

तथापि, सदर फ्लॅट मिळकती बाबत कुणाचाही कोणत्याही प्रकारे गहाण,दान, लिन,लिज,बक्षिसपत्र,मृत्युपत्र,विसार पावती,साठेखत,ज.मु.पत्र, खरेदीखत अगर अन्य कुठलाही, कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध अगर बोजा वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले दिवसापासून **०७ दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी समक्ष हरकत नोंदवावी. मुदतीत कुणाच्याही हरकती न आल्यास, वरील मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस. नाशिक. दि.१८/०३/२०२५.

**ॲड.सारिका रणजित मोरे**
पत्ता :- एन-४२/सी/एफ-२/१२/७, शिवशक्ती चौक, सिडको नाशिक.मो.९२०९२०५२२९

## श्री संताजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.नाशिक तर्फे गहाण घ्यावयाच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे गंगापुर** या गांवचे शिवारातील स्थावर मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ६५/१/२/१/१** यांसी **प्लॉट नंबर ३८** यांसी **क्षेत्र ५६.०० चौरस मीटर** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही **श्री.राहुल रमेश घटी** यांचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकत ही **श्री.सचिन नामदेव भोर** यांचेकडून नोंदणीकृत **खरेदीखत नं. नसन-१-६५२१/२०२३**, दिनांक २६/०६/२०२३ अन्वये घेतलेली आहे. सदर मिळकतीचे मालक **श्री.राहुल रमेश घटी** यांनी उपरोक्त मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे खात्रीलायकरित्या सांगून सदर मिळकतीवर तारण कर्जाची मागणी आमचे अशिल पतसंस्थेकडे केलेली आहे. सबब, सदर मिळकतीचे टायटल तपासणेकामी सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध,बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, विसार पावती,बक्षिसपत्र,साठेखत,मुखत्यारपत्र, विकसन करारनामा, मृत्यूपत्र, बँकेस तारण अथवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क/ हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या हरकती सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **७ (सात) दिवसांचे आत** सर्व कागदपत्रांनिशी खालील नमुद केलेल्या पत्त्यावर अगर पतसंस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी हरकती पुराव्यासह द्याव्यात. मुदतीत हरकती न आलेस वरील मिळकत निर्वेध व बोजारहित समजुन पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर व कागदपत्रांशिवाय आलेल्या व परस्पर वृत्तपत्रात दिलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.१८/०३/२०२५.

**मनोज बळीराम दैवे,ॲडव्होकेट**
**शारदा विठ्ठल पवार,ॲडव्होकेट**
ऑफीस नं.७,शिवराम संकुल,कान्हेरेवाडी,सीबीएस.,नाशिक.मो.९८२३२४७४८२

## कर्ज वसुली अधिकारी कार्यालय-I/II
## कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी-३)

अनुसूची-१३
परिशिष्ट क्र. २२
[नियम ३७ (१) पहा]
सर्व मान्यताप्राप्त पर्यायांद्वारे

पहिला मजला, एम.टी.एन.एल. टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर ३०-ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

**आर.पी. क्र. १७१ चे २०१९** **लिलावाची तारीख : ०९/०५/२०२५**

**स्थावर मालमत्तेची विक्री सूचना**

**आयकर कायदा, १९६१ च्या दुसऱ्या अनुसूचीच्या नियम ३७, ३८ आणि ५२ (१)(२) तसेच, कर्जवसुली आणि दिवाळखोरी अधिनियम, १९९३ अन्वये स्थावर मालमत्तेची विक्री सूचना**

**बँक ऑफ बडोदा**
**विरुद्ध**
**श्री. विमल शिवाजी दुशिंग व इतर**

प्रति,
**सीडी-१. श्रीमती. विमल शिवाजी दुशिंग**
**सीडी-२. श्री. श्यामराव नामदेव दुशिंग**
**सीडी-३. श्री. परशराम धोंडीराम दुशिंग**
**सीडी-४. श्रीमती. सिंधुबाई साहेबराव दुशिंग**
**सीडी-५. श्री. साहेबराव कोंडाजी दुशिंग**
सर्व रा.: मु. पो. हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक- ४२२२०२

ज्याअर्थी तुम्ही वरील प्राधिकृत कर्जदार हे प्राधिकृत धारक बँक/वित्तीय संस्था यांचे व्याज व खर्चासह **रु. २१,२६,४४८.०० (एकवीस लाख सव्वीस हजार चारशे अठ्ठेचाळीस रुपये)** भरण्यात अपयशी ठरल्याने **मा. प्राधिकृत अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी-३)** यांच्या सूचनेनुसार सदर कर्जाच्या वसुलीसाठी **टी.ओ.ए. क्र. १६३३/२०१६** अन्वये **पुनर्प्राप्ती प्रमाणपत्र क्र. १७१/२०१९** जारी केले आहे. आणि, सदर उल्लेख केलेल्या संबंधित अधिकाऱ्याने कर्जवसुलीच्या उद्देशाने खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या पुनर्प्राप्ती प्रमाणपत्र जारी केलेल्या प्राधिकृत कर्जदाराकडून तारण/जप्त मालमत्तेच्या विक्रीचा आदेश दिला आहे.

सबब, स्थगितीचा कोणताही आदेश प्राप्त न झाल्यास तर सदर मिळकत विक्रीसाठी जाहीर लिलाव प्रक्रिया **दिनांक ०९/०५/२०२५ रोजी दुपारी १.०० ते दुपारी २.०० वाजेदरम्यान** राबविण्यात येईल. लिलाव आणि बोली प्रक्रिया https://www.bankeauctions.com. या वेबसाईटच्या माध्यमातून राबविली जाईल. त्यासाठी प्राधिकृत लिलाव प्रक्रिया सेवाप्रदाता यांची माहिती **: नाव : सी-१ इंडिया प्रा. लि., श्री. भाविक पांड्या, मोबाईल क्र. 8866682937, ई-मेल- maharashtra@c1india.com.** लिलाव प्रक्रियेसाठी बँक ऑफ बडोदाचे प्राधिकृत सेवाप्रदाता अधिकाऱ्याची माहिती **: नावः श्री. सुबोध कुमार, मोबाईल क्र. 9911834637, ई-मेल :- sarnas@bankofbaroda.co.in**

खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार वरील प्रतिवादी/प्रमाणपत्र धारकांच्या मालमत्तेची विक्री करण्यात येईल. सदर मालमत्तेशी संबंधित देणी आणि दावे, जे निश्चित झाले आहेत ते प्रत्येक लॉटसमोरील अनुसूचित नमूद केल्याप्रमाणे राहतील. तसेच, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या लॉटनुसार मालमत्ता विक्रीस ठेवली जाईल. मालमत्तेच्या काही भागाच्या विक्रीद्वारे निर्धारित वसूली रक्कम प्राप्त झाली तर उर्वरित मालमत्तेची विक्रीप्रक्रिया त्वरित थांबवली जाईल. तसेच, कोणताही लॉट विक्री होत असताना, सदर प्रमाणपत्रात नमूद केलेले थकबाकीची रक्कम + व्याज + विक्रीप्रक्रियेबाबतचा खर्च यासह विक्रीप्रक्रिया राबविणाऱ्या अधिकाऱ्यास अदा केल्यास किंवा सदर रक्कम, व्याज आणि खर्चापोटीची पूर्ण रकमेची भरपाई करण्यात आल्याचा समाधानकारक पुरावा सादर केल्यास विक्रीप्रक्रिया थांबवली जाईल.

सार्वजनिक विक्रीप्रक्रियेसाठी सर्वसामान्य नागरिकांना किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत बोली लावण्यासाठी निमंत्रित केले जात आहे. तथापि, या विक्रीसंदर्भात कोणतीही जबाबदारी असलेल्या अधिकारी किंवा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीला बोलीप्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. त्याने सदर मिळकत मिळवण्याचा किंवा त्यात कोणत्याही प्रकारे स्वारस्य दाखविण्याचा प्रयत्न करू नये.

**सदर विक्रीप्रक्रिया ही आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्धारित अटी आणि त्यांअंतर्गत तयार केलेल्या नियमांप्रमाणे तसेच पुढील अटींवर आधारित असेल :**

१. संलग्न अनुसूचीत नमूद केलेले तपशील हे संबंधित अधिकाऱ्याला असलेल्या माहितीच्या आधारावर देण्यात आले आहेत. तथापि, या जाहीर सूचनेत कोणतीही चूक, चुकीची माहिती किंवा काही उल्लेख राहून गेला असल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची नसेल.

२. अनुसूचित नमूद केल्यानुसार राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीत मालमत्ता विक्री केली जाणार नाही.

३. बोली वाढविण्यासाठी आवश्यक असलेली किमान रक्कम निश्चित केली जाईल. जर बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदाराबाबत कोणताही वाद उद्भवला तर, त्या लॉटची पुन्हा लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री केली जाईल किंवा तो लिलाव रद्द केला जाऊ शकतो.

४. कोणताही लॉट सर्वाधिक बोली लावणाऱ्या बोलीदारास विक्री केला जाईल. मात्र, तो/ती/ते कायदेशीरदृष्ट्या बोली लावण्यास पात्र असले पाहिजेत आणि त्यांनी लावलेली बोली राखीव किंमतीपेक्षा कमी नसावी. तथापि, विक्री अधिकारी यासंदर्भात विवेकाने निर्णय घेईल. बोलीची किंमत अत्यंत कमी किंवा अव्यवहार्य वाटल्यास त्यास नकार देण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

५. प्रत्येक इच्छुक बोलीदाराला निर्धारित अनामत रक्कम (ईएमडी) डिमांड ड्राफ्ट (डीडी)/पे ऑर्डरच्या स्वरूपात **'RECOVERY OFFICER, DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT-3)'** यांच्या नावे भरावी लागेल. किंवा आरटीजीएस/एनईएफटी किंवा **बँक ऑफ बडोदा** यांच्या नावाने थेट बँकेत खाते क्र. **10430100022945 (आयएफएससी कोड: BARBOVASHIX)** यावर जमा करावी. बोलीदाराने मालमत्तेच्या तपशीलासह बोली अर्ज हा पॅन कार्डची प्रत, रहिवाशी पुरावा, ओळखपत्र, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, तसेच कंपनीच्या वतीने अर्ज करत असल्यास अधिकृत प्रतिनिधी असल्याबाबतची कागदपत्रे व अनामत रक्कम भरल्याचा पुरावा/पावती अपलोड करणे बंधनकारक राहील. याव्यतिरिक्त अनामत रक्कम जमा केलेली असल्यास सदर अर्जदार कोणत्याही परिस्थितीत लिलावप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र राहणार नाही.

| निर्धारित अनामत रक्कम (ईएमडी), राखीव किंमत आणि बोली वाढ खालीलप्रमाणे निश्चित केली जाईल | | | | |
|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | मिळकतीचे वर्णन | अनामत रक्कम (रुपयांत) | राखीव किंमत (रुपयांत) | बोली पटीत (रुपयांत) |
| १. | **गाव- हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्थित व अस्तित्वात असलेली शेतजमीन गट नं. ३३८ चे क्षेत्रफळ १ हे. ४८ आर.** | ६,१०,०००/- | ६१,००,०००/- | २५,०००/- |

देय तारीख आणि वेळेनंतर प्राप्त झालेली ईएमडी फेटाळली जाईल आणि ईएमडीसाठी अदा केलेली रक्कम ई-लिलाव अर्जात दिलेल्या पर्यायांद्वारे अर्जदारांना परत केली जाईल. त्यासाठी बोलीदाराकडे सक्रिय ई-मेल आयडी आणि इंटरनेट कनेक्शनसह संगणकप्रणाली उपलब्ध असणे ही त्याची/तिची जबाबदारी असेल. जेणेकरून तो/ती लिलावात सहभागी होऊ शकेल. ऑनलाईन बोली लावताना कनेक्टिव्हिटीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवल्यास ती संपूर्ण जबाबदारी बोलीदाराची राहील आणि यासंदर्भात कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत.

लिलावासाठी दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली वाढवली गेल्यास, इतर बोलीदारांना त्यांची बोली वाढविण्याची संधी मिळावी म्हणून लिलावाची वेळ आणखी ५ मिनिटांनी वाढवली जाईल. वाढीव ५ मिनिटांच्या या कालावधीत कोणतीही पुढील वाढ न झाल्यास, लिलाव प्रक्रिया समाप्त केली जाईल.

चल/अचल मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी किंवा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार तत्काळ भरावी लागेल. ठरलेल्या वेळेत देयक न भरल्यास संबंधित मालमत्ता त्वरित पुन्हा लिलावासाठी उपलब्ध करून दिली जाईल.

यशस्वी बोलीदाराला ईएमडीच्या समायोजनानंतर विक्री रकमेपैकी २५% रक्कम वरील तपशीलानुसार नमूद केलेल्या खात्यात/डिमांड ड्राफ्ट/ बँकर चेक/पे ऑर्डरद्वारे पुढील दिवशी जमा करावी लागेल. पुढील दिवस रविवार किंवा सार्वजनिक सुटीचा असल्यास त्यानंतरच्या पहिल्या कामकाजाच्या दिवशी ही रक्कम भरावी लागेल. खरेदीदाराला उर्वरित ७५% विक्री रक्कम मालमत्ता विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी भरावी लागेल. यात त्या दिवसाचा समावेश राहणार नाही. १५ वा दिवस हा रविवार किंवा सार्वजनिक सुटी असल्यास त्यानंतरच्या पहिल्या कामकाजाच्या दिवशी वरीलप्रमाणे निर्दिष्ट पद्धतीने ही रक्कम भरावी लागेल. याव्यतिरिक्त, खरेदीदाराने 'कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी-III) येथे वसुली अधिकाऱ्याकडे पाउंडेज शुल्कदेखील जमा करावे लागेल. हे शुल्क १,०००/- रुपयांपर्यंत २% आणि त्या रकमेवरील अधिकच्या भागासाठी १% असेल. हे शुल्क 'Registrar, DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT-III)' यांच्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावे लागेल. निर्धारित कालावधीत देयक भरण्यात अपयशी ठरल्यास, लिलाव खर्च वजा करून ठेवलेली रक्कम शासनाच्या नावे जप्त केली जाऊ शकते आणि संबंधित खरेदीदाराला मालमत्तेवरील सर्व हक्क तसेच, त्यानंतरच्या विक्रीतून मिळणाऱ्या कोणत्याही रकमेवर दावा करता येणार नाही. अशा परिस्थितीत, मालमत्ता नव्या विक्री जाहीरनाम्यानंतर पुन्हा लिलावात विक्रीसाठी ठेवली जाईल.

सर्वोच्च बोलीदाराला 'कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी-III)' येथील वसुली अधिकाऱ्याद्वारे विक्रीची पुष्टी होईपर्यंत संबंधित मालमत्तेवर कोणताही हक्क किंवा मालकी हक्क प्राप्त होणार नाही. लिलाव प्रक्रियेत अपयशी ठरलेल्या बोलीदारांनी जमा केलेली ईएमडी रक्कम ऑनलाईन पद्धतीने जमा केल्यास ती ऑनलाईन पद्धतीनेच परत केली जाईल. डिमांड ड्राफ्ट (डीडी)/बँकर चेक (बीसी)/पे-ऑर्डरद्वारे जमा केलेली ईएमडी रक्कम प्रत्यक्ष हस्तांतरित करून परत केली जाईल. ई-लिलाव ईएमडी अर्जासोबत पाठवलेल्या छायाप्रतींसह मूळ ओळखपत्र (ओळखपत्र पुरावा) आणणे बंधनकारक आहे. ईएमडी रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. ई-लिलाव ईएमडी अर्जात नमूद व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव विक्री प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यासाठी किंवा त्याच्या जागी पर्याय बदलण्याची विनंती स्वीकारली जाणार नाही. एकापेक्षा अधिक मालमत्ता विक्रीसाठी उपलब्ध असल्यास, त्यांची विक्री सोयीप्रमाणे केली जाईल आणि विक्री जाहीरनाम्यात नमूद क्रमांकानुसारच विक्री करणे बंधनकारक राहणार नाही.

'अनिवासी भारतीय असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या पासपोर्टच्या छायाप्रतीसह फोटो असलेला पृष्ठभाग जोडणे आवश्यक आहे', तसेच त्यांची बोली 'भारतीय दूतावास (एम्बसी) द्वारे प्रमाणित करून पाठवावी लागेल. 'संबंधित चल/अचल मालमत्ता "जशी आहे, जिथे आहे" या तत्त्वावर विक्री केली जात आहे आणि ती प्रकाशन शुल्क, महसूल व इतर बोजा/बांधिलकींना अधीन राहील. स्वाक्षरीकर्त्याकडे कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार राखीव आहे. बोली अव्यवहार्य वाटल्यास कोणतेही कारण न देता लिलाव स्थगित करण्याचा अधिकारही स्वाक्षरीकर्त्याकडे राखून ठेवलेला आहे.

**या विक्री जाहीरनाम्याचा तपशील www.drt.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.**

| मालमत्तेचे वेळापत्रक: | | | | |
|---|---|---|---|---|
| लॉट क्र. | विक्री केल्या जाणाऱ्या मिळकतीचे वर्णन | संबंधित मालमत्तेवर किंवा तिच्या काही भागावर लावलेला महसूल | सदर मिळकतीवर लागू असलेल्या कोणत्याही बोजाचे तपशील | सदर मिळकतीवर दावे केलेले असल्यास, तसेच तिच्या स्वरूप आणि मूल्यावर होणाऱ्या इतर कोणत्याही ज्ञात परिणामांचे तपशील |
| १. | **गाव- हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्थित व अस्तित्वात असलेली शेतजमीन गट नं. ३३८ चे क्षेत्रफळ १ हे. ४८ आर.** | **अज्ञात** | **अज्ञात** | **अज्ञात** |

**टीप : लिलावाच्या दिनांक ०९/०५/२०२५ रोजी कर्जदारांविरुद्ध एकूण अंदाजे रु. ४३,१९,६०६.६९/- थकबाकी प्रलंबित आहे. वरीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्तांची पाहणी तारीख ०५/०५/२०२५ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० या वेळेत निश्चित करण्यात आली आहे. बोली निश्चितीची अंतिम तारीख ०७/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.**

वरील मजकूर आज रोजी माझी सही व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दिला. **ता. १४/०२/२०२५**

STAMP

स्वाक्षरी/-
**(दीपा सुब्रहमनियन)**
वसूली अधिकारी-II
कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी-३)

पान १ वरून...

## पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना माफी नाही

त्यांची तक्रार ऐकून घेत असताना हंसापुरी भागात २०० ते ३०० लोकांच्या जमावाने हातात काठ्या घेऊन दगडफेक सुरु केली. या जमावाने हंसापुरीत १२ दुचाकींचे नुकसान केले. काही लोकांवर घातक शस्त्रांनी हल्ला केला. त्यानंतर भालदारपुरा भागात सायंकाळी साडेसात वाजता ८० ते १०० लोकांच्या जमावाने पोलिसांवर हल्ला केला. तेव्हा पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अश्रुधुर आणि सौम्य बळाचा वापर केला. यावेळी जमावाने एक क्रेन आणि काही चारचाकी वाहने जाळली. या सगळ्यात एकूण ३३ पोलीस जखमी झाले. यामध्ये ३ उपायुक्त दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. एका पोलीस अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला. तर एकूण पाच नागरिक जखमी झाले. यापैकी एकजण अतिदक्षता विभागात आहे. एकूण ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. नागपूर शहरात एसआरपीएफच्या ५ तुकड्या तैनात आहेत. यावेळी पोलिसांना एक ट्रॉली भरुन दगड मिळाले. हे दगड वरती जमा करुन ठेवण्यात आले होते. शस्त्रास्त्र मोठ्या प्रमाणावर होती. यामध्ये काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न होता. या लोकांवर कारवाई केली जाईल. असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक होणार

अंमलबजावणीसाठी निवडणूक आयोग लवकरच तज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञांसोबत चर्चा करणार आहे. केंद्र सरकारकडून यासाठी आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यात येतील. याबाबत लवकरच मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जातील. मतदारांना त्यांचे आधार कार्ड लिंक करण्यासाठी एक निश्चित कालावधी दिला जाईल, तसेच, ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने ही प्रक्रिया पार पडणार आहे.

## अनैतिक संबंधातून अपहरण

पोलिसांचे पथक त्याच्या शोधार्थ रवाना झाले होते. मंगळवारी (दि. १८) दुपारी घाटात असलेल्या जंगलात त्याचा मृतदेह आढळून आल्याने संशयितांनी त्याचा खून केल्याचे उघड झाले. ज्या महिलेशी अनैतिक संबंध होते तिलाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पंचवटी पोलिसांनी संशयितांना वासिम, संगमनेर अकोले येथून ताब्यात घेतले. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता आठ दिवसांची पोलिस कोठडी मिळाली.

## एक विषारी मंत्री उघडपणे समाजात द्वेष पसरवतोय

घेरले आहे. दरम्यान, आक्रमक हिंदुत्वाचे नवा चेहरा होऊ पाहत असलेले भाजप आमदार नितेश राणे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समज दिल्याचे समजते. नितेश राणे यांनी मंगळवारी (दि. १८) विधिमंडळात मुख्यमंत्री फडणवीस यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. यावेळी फडणवीस यांनी त्यांना पुढील काही दिवस शांत राहण्याचे आदेश दिल्याचे समजते. मात्र, नितेश राणे त्यांच्या नेहमीच्या आवेशात दिसून आले. मुख्यमंत्र्यांनी तंबी दिली का, असा प्रश्न विचारल्यानंतर त्यांचा पारा काहीसा चढला.

मी मुख्यमंत्र्यांना स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण द्यायला गेलो होतो. मी मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या मंत्र्यांच्या यादीत आहे. माझे मुख्यमंत्री माझ्यावर काय बोलतात, याची चिंता तुम्ही करु नका. मी तुमच्या घरात डोकावतो का? मी इतर मंत्र्यांसारखा नाही, असा इशारा नितेश राणे यांनी दिला.

## कबरीचा मुद्दा दिल्ली दरबारी?

ते दिल्लीतील नेतृत्वाशी बातचीत करण्याची शक्यता आहे. याच भेटीत ते महाराष्ट्रातील औरंगजेबाची कबर हटवण्याचा मागणीबाबत केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करतील, अशी शक्यता आहे. औरंगजेब महाराष्ट्राचा दुष्मन होता, राष्ट्रद्रोही होता, त्याची निशाणी महाराष्ट्रात कशाला पाहिजे. जे औरंगजेबाचे उदात्तीकरण करतात, त्यांना निषेध केला पाहिजे अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केली होती.

## पंतप्रधान मोदी पूर्वजन्मीचे छ. शिवाजी महाराज

बनवण्याचा संकल्प पंतप्रधान मोदींनी केला आहे. माझ्या बारगढ मतदारसंघातील संत गिरीजा बाबा यांनी मला एक दिवस सांगितले की, देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पूर्वजन्म हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा होता. त्यांचा दुसरा जन्म मोदी आहे. त्यामुळे या देशाला जगात सर्वात शक्तिशाली राष्ट्र करण्याच्या हेतूने ते काम करत आहेत. पुरोहित यांच्या विधानाचे तीव्र पडसाद विरोधकांप्रमाणेच नेटिझन्समध्ये उमटले आहेत.

## मंत्री कोकाटे यांना हायकोर्टाचा दिलासा

एप्रिल रोजी होणार आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कोकाटे यांच्यावरील अपात्रतेची कारवाई तूर्तास टळली आहे.

माणिकराव कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण जिल्हा सत्र न्यायालयाने नोंदवले होते. या निरीक्षणावर आक्षेप घेऊन माजी मंत्री कै. तुकाराम दिघोळे यांची कन्या अंजली राठोड यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांच्या एकल खंडपीठासमोर ही याचिका मंगळवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, अंजली राठोड या प्रकरणात तक्रारदार नसल्याने ही याचिका करण्याचा त्यांना अधिकार नाही. तसेच, त्यांची याचिका ऐकण्यायोग्य नाही, असे कोकाटे यांच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सत्र न्यायालयाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली. न्यायालयाने मात्र या टप्प्यावर सत्र न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले आणि राज्य सरकारसह कोकाटे बंधूंना नोटीस बजावून २१ एप्रिल रोजी सुनावणी ठेवली आहे.

## खरा देवगड हापूसची ओळख

स्टिकर लावणे बंधनकारक असेल. प्रत्येक स्टिकर दोन भागात विभागलेला असून एक स्वतंत्र यूआयडी असतो. त्या कोडचा एक भाग स्टिकरच्या वरती आणि दुसरा भाग स्टिकरच्या खाली असतो. खरेदी करत असलेला आंबा देवगड हापूसच आहे का हे तपासण्यासाठी ग्राहकांनी ९१६७ ६६८ ८९९ या क्रमांकावर व्हाट्सअॅपच्या माध्यमातून फोटो पाठवायचा आहे. ही सिस्टीम त्या स्टिकरवरील कोड वाचते आणि स्टिकरच्या मागील नंबर लिहून पाठवण्यास सांगते. नंबर वाचण्यासाठी स्टिकर काढले असता त्याचे आपोआप दोन भाग होतात. व्हाट्सअॅपद्वारे आलेला संपूर्ण कोड सिस्टीममधील UID शी जुळला तर ग्राहकास शेतकरी, विक्रेत्याचे नाव, मुळगाव, जीआय नोंदणी क्रमांक असा तपशील पाठवला जातो. या तपशीलावरून हा देवगड हापूस आहे की नाही याची खात्री ग्राहकांना करता येऊ शकते.

## मोदींचे विल्यम्स यांना भारत भेटीचे आमंत्रण

तेव्हा मी नेहमी तुमच्या आरोग्याबद्दल विचारले होते. भारतीयांना तुमच्या कामगिरीचा नेहमीच अभिमान वाटतो. तुमची प्रेरणादायी जिद्द आणि परिश्रम पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. तुम्ही हजारो मैल दूर असलात तरी आमच्या हृदयाच्या खूप जवळ आहात. भारतातील लोक तुमच्या उत्तम आरोग्यासाठी आणि मिशनच्या यशासाठी प्रार्थना करत आहेत. तुम्ही पृथ्वीवर परतल्यावर आम्ही तुमचे भारतात स्वागत करण्यास उत्सुक आहोत.



## निपमचा ४६ वा स्थापना दिन साजरा

**नाशिक :** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंटचा ४६ वर्धापन दिन मनुष्यबळ विकास क्षेत्रात बेस्ट प्रॅक्टिसेस कारणीत करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान करून साजरा करण्यात आला. मनुष्यबळ विकास क्षेत्राला बळकटी देण्यासाठी मनुष्यबळ विकास क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करू, असे प्रतिपादन निपम अध्यक्ष राजाराम कासार यांनी अध्यक्षपदावरून बोलताना केले .

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टर फोरम पारीख मेहता, नाशिकच्या प्रसिद्ध सिने कलावंत स्मिता प्रभू, निपमचे उपाध्यक्ष राहुल बोरसे, उपाध्यक्ष विनायक पाटील, सचिव प्रकाश गुंजाळ, सहसचिव राजेंद्र आचारी, खजिनदार सुस्मित दळवी कार्यकारणी सदस्य मनोज मुळे, ब्रिजेश जाधव, श्रीकांत पाटील, जनार्दन शिंदे, रामेश्वर थोरात, यादवी पवार, हर्षदा सोनवणे, विनेश मोरे, गोविंद बोरसे, अॅडव्होकेट राजश्री महेंद्र जानोरकर, डॉक्टर प्रकाश पारीख आदी उपस्थित होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सिने कलावंत स्मिता प्रभू यांनी मनोगत व्यक्त केले. इंडियन पेन्स व स्टेशनरीच्या वर्षा वाघ, जिंदाल पॉली फिल्मच्या तेजश्री सावळे, ऑटो सेल इलेक्ट्रो मेकच्या भारंबे, एम्पायर स्पाइसेस च्या लीना शिंदे, अभिजीत टेक्नो प्राइवेट लिमिटेडच्या प्राजक्ता मोराडे.

कार्यक्रमात सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत श्रीकांत पाटील यांनी केल कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीकांत पाटील , राजेंद्र आचारी, यादवी पवार, हर्षदा सोनवणे, रामेश्वर थोरात , विनेश मोरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. निपमचे सचिव प्रकाश गुंजाळ यांनी प्रास्तविक केले. सूत्रसंचालन यादवी पवार व श्रीकांत पाटील यांनी केले आभार राहुल बोरसे यांनी मानले.

## नोटीस

| | |
|---|---|
| जमीन मालकाचे नाव - | विजन बिल्डकॉनतर्फे भागीदार रुपेश सुरजकिरण शर्मा |
| आर्किटेक्टचे नाव - | श्री. धीरज तुकाराम वाळूंज |
| आर सी सी कन्सल्टन्टस- | श्री. मिलिंद राठी |
| सर्व्हे नं. - | ८७१/१२/५६ ५७/३/८७१/१ २/५८ प्लॉट नं.५२/५३क/५४ |
| बांधकाम मंजुरी क्र. - | LND/BP/A4/RBD/340/2023 |
| सदनिका - | ३० |
| प्लॉटचे क्षेत्रफळ - | ८३६.११ चौ.मी. |
| मंजूर नकाशाची प्रत - | राका कॉलनी ४२२००३ येथे उपलब्ध |

## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशनसाठी)

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, **मौजे पाथर्डी** तालुका व जिल्हा नाशिक या गांवचे शिवारातील **सर्व्हे नंबर २०६/४** यातील **प्लॉट नंबर २४ क्षेत्र २७९.०० चौरस मिटर्स**. ही मिळकत **सौ. रत्नप्रभा रमेश कोठावदे, श्री. वसंत युवराज चव्हाण, श्री.सोमनाथ जगन्नाथ येवले** व **श्री हंसराज पांडूरंग ठोंबरे** यांनी त्यांचे निर्वेध मालकीची असल्याचे सांगून आमचेकडे टायटल सर्टिफिकेटची मागणी केली आहे. तरी सदर मिळकतीत कोणाचेही कसलेही गहाण, दान, बक्षिस, लिज, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, कोणतेही करार, इत्यादीसारखे हक्क, अधिकार, बोजे, वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेचे दिवसांपासून १० दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध समजण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या, लेखी पुरावे नसलेल्या त्याचप्रमाणे परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. कळावे.

**दिनांक १८/०३/२०२५.**

**सुशिल हेमंत अछरा,** अॅडव्होकेट
२२२-ए, शेवटचा मजला, मेघदूत शॉपिंग सेंटर,
जिल्हा न्यायालयाचे समोर, नाशिक
मोबाईल ९९७५४००३५३ Email : lost3355@gmail.com

**ग्रामपंचायत कार्यालय आंबेदिंडोरी, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

## जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय आंबेदिंडोरी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई- निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक १८/०३/२०२५ पासून ते २५/०३/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय आंबेदिंडोरी, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय आंबेदिंडोरी ता. दिंडोरी जि. नाशिक**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- सिन्नर**

## गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन - मौजे सिन्नर ३, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी सर्व्हे नं. १८३/३ मधील प्लॉट नं. ५ यांसी क्षेत्र २०४.८७ चौ. मी. आकार रु. १४७.५० पैसे. ही संपूर्ण प्रकाश सोपान शिरोळे, सतिश सोपान शिरोळे, मिराबाई सोपान शिरोळे यांचे मालकीची बिनशेती प्लॉट मिळकत.** यांसी चतुःसिमा - रे. ऑ. रा. प्रमाणे.

**२) कर्जदाराचे नांव :** **सतिश सोपान शिरोळे**
**३) संमती देणाळ-** **प्रकाश सोपान शिरोळे, मिराबाई सोपान शिरोळे**
**४) कर्जाचा प्रकार :-** **जमिन गृहतारण,**
**५) पतसंस्थेचे नांव :-** **श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक,**
**६) नोटीसचा उद्देश :-** **टायटल व्हेरिफिकेशन**

७) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ५ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक यांचे संमतीने पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.

८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ **(पाच)** दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण। गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस. स्थळ सिन्नर, दिनांक १८/०३/२०२५

**आमचे मार्फत प्रसिध्द**
श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (अॅडव्होकेट )
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

**ग्रामपंचायत- नांदूरमध्यमेश्वर ता. निफाड, जि.नाशिक**

## आठवडे बाजार जाहीर लिलाव

नांदूरमध्यमेश्वर ता. निफाड येथील ग्रामस्थ व आठवडे बाजार लिलाव घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना कळविण्यात येते की, ग्रामपंचायतीच्यावतीने येथील आठवडे बाजार कर वसुलीचा जाहीर लिलाव **शुक्रवार दिनांक २१/०३/२०२५** रोजी **सकाळी १०.०० वाजता** नांदूरमध्यमेश्वर ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित केला आहे. लिलावात सहभाग घेणाऱ्या इच्छुकांनी उपस्थित रहावे.

**टिप-** १) लिलावाच्या अटी व शर्ती लिलालवापूर्वी वाचून दाखविण्यात येतील.
२) लिलाव देण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सरपंच** **उपसरपंच** **ग्रामविकास अधिकारी**
**सर्व सन्मानिय सदस्य**
**ग्रामपंचायत नांदूरमध्यमेश्वर, ता. निफाड, जि.नाशिक**

**नमुना-ब**

## महाराष्ट्र चित्रपटगृह (विनियमन) नियम १९६६ च्या नियम ४ खालील नोटीस

सदर अर्जदार **श्री. वेदांश रविंद्र पाटील**, वडिलांचे नाव **श्री. रविंद्र पाटील** वय ३२ वर्ष रा.. ७९ शिरूड, अमळनेर, जि. जळगाव यांनी त्र्यंबकरोड येथील **महिरवणी शिवार सर्व्हे नं. २३६ जागेवर चित्रपटगृह (१ स्क्रिन) (URBAN AIR)** परवाना मिळण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

**प्रस्तावित जागेची चतु:सिमा**
**पूर्वेस गट- नं. ४५२ व ४५३, पश्चिमेस गट नं. -४५४,**
**दक्षिणेस- गट नं. ४५३/१, उत्तरेस गट नं. ४५३/२**

सदर तपशिल असून याद्वारे अशी नोटीस देण्यात येत की, सदर चित्रपटगृह परवाना देण्याकामी तसे कोणतीही व्यक्तीस हरकत असेल तर त्यांनी लेखी स्वरुपात **दि.२८/०३/२०२५** च्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात (गृह शाखा, नाशिक येथे हरकत अर्ज दाखल करावा. सदर नोटीस आज **दि. १८/०३/२०२५** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

**जिल्हा दंडाधिकारी,** **नाशिक** — **जिल्हा दंडाधिकारी** **नाशिक**

**क्र.कक्ष नं.१/पी.ओ.एल.१/३६९२/१६**
**नाशिक, दिनांक-१८/०३/२०२५**

**शुध्दीपत्रक**

**दि. चौ. अर्ज नं. ९/२०२५**
**सिन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्याया...**
**श्री. अरुण निवृत्ती सानप व इ.** **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** **सा.वाले**

वर नमूद केसचे कामी दि. १५/०२/२०२५ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिन्नर (माळेगाव एमआयडीसी) मध्ये औद्योगिक क्षेत्रातील **भुखंड क्र. ओ-३५** असे चुकीने झाले असून ते **भुखंड क्र. अे-३५** असे वाचण्यात व समजण्यात यावे ही चुकदुरुस्ती.

## नारायणगाव बाजारपेठेत भीषण आग

**नारायणगाव :** नारायणगाव येथील बाजार पेठेतील मुथ्था मार्केटमधील दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड दुकानाला भीषण आग लागली. मंगळवारी पहाटे पाच वाजता लागलेल्या या आगीची झळ शेजारील दुकानांनाही लागली.

जुन्नर आणि राजगुरूनगर येथील अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी वेळेत दाखल झाल्याने मोठा अनर्थ टळला. नारायणगावमधील एसटी बसस्थानकाशेजारी मुख्य बाजारपेठेत नंदराम मुथ्था मार्केटमध्ये धवल सुरेश चव्हाण यांच्या मालकीचे दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड आहे. आग लागल्याची माहिती वैभव मुथ्था व रज्जाक काझी यांनी अग्निशमन दलाला दिली.

**ग्रामपंचायत चोंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक**

**निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**

ग्रामपंचायत चोंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक चे १५वा वित्त आयोग योजने अंतर्गत साहित्य खरेदी व इतर कामे करणे कामी कोटेशन व -१ पद्धतीने टेंडर मागणी करणेबाबत नोंदणीकृत पुरवठादार व ठेकेदाराकडून खालील सील बंद निविदा मागविण्यात येत आहे. १) घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी ट्रायसायकल/इतर बॅटरीवर चालणारे वाहन खरेदी करणे(रु.८०,०००/-), २) सामुदायिक संकुलाचे बांधकाम करणे (रु.१,५३,१२४/-), ३) लहान बोअर पाईप/ठिबक सिंचन (रु.२५,०००/-), ४) गावांना पाणीपुरवठा करणे (रु.१,००,०००/-), ५) टाकी/जलसाठा/तलावाचे देखभाल आणि निर्जंतुकीकरण करणे(रु.१,५८,१२३/-), ६)ग्रामपंचायत भवन फर्निचर(रु.१,५४,८७५/-), व ७) चिल्ड्रन पार्कचे बांधकाम व देखभाल करणे(रु.१,५४,८६५/-). सीलबंद निविदा दि. १९/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ पर्यंत मागवित आहे. निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत प्रशासनाने राखून ठेवले आहे.

**सही/-ग्रामसेवक** **सही/-सरपंच** **सही/-उपसरपंच**
**ग्रामपंचायत चोंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत मेंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक**

**निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**

ग्रामपंचायत मेंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक चे १५वा वित्त आयोग योजने अंतर्गत साहित्य खरेदी व इतर कामे करणे कामी कोटेशन व B-1 पद्धतीने टेंडर मागणी करणेबाबत नोंदणीकृत पुरवठादार व ठेकेदाराकडून खालील सील बंद निविदा मागविण्यात येत आहे. १) ड्रेनेज बांधकाम करणे (रू.१,४८,२३८/-), २) कचरा व्यवस्थापन उपकरणे (रु.१,४९,६४७/-). ३) पिण्याच्या पाण्याचा नवीन स्रोत निर्माण करणे (रु.१,००,०००/-), ४) कमी पाणी वाया घालणारी जलशुद्धीकरण यंत्रणा (रु.१,९७,८८४/-) व ५) ग्रामपंचायत भवन बांधणे (रु.१,७८,७३२/-). सीलबंद निविदा दि. १९/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ पर्यंत मागवित आहे. निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत प्रशासनाने राखून ठेवले आहे

**सही/-ग्रामसेवक** **सही/-सरपंच** **सही/-उपसरपंच**
**ग्रामपंचायत मेंढी, ता.सिन्नर, जि.नाशिक**

**जाहीर नोटीस** नि.नं:०६ प्रोसेस जमा — **अॅड. रेखा महेंद्र शिंदे, सटाणा, जि.नाशिक**

**जावक क्रमांक ६२४/२५ दि.१८/३/२०२५ वारसा प्रमाणपत्र चौ. अ.नं.४५/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात.......**

**१) श्रीमती लताबाई दिपक बर्वे**, वय-५२ वर्षे, **२) श्री. राम दिपक बर्वे**, वय-३२ वर्षे, **३) सौ. रोहिणी रविंद्र जाधव**, वय-२७ वर्षे, रा. शिव साईराम अपार्टमेंट, मेरी दिंडोरीरोड, तारवाला नगर, पंचवटी नासिक **४) सौ. सोनी सतिष पवार**, वय-२५ वर्षे, रा. इंदिरानगर, भोकर, अहमदनगर, **५) श्रीमती रेशमाबाई गंभीर बर्वे**, वय ७४वर्षे नं. १,२ रा. श्री संत रोहिदास नगर, जय भवानी मार्ग, गल्ली नं. ३, आर. के. क्लासेस, कासम बाग, मालाड पुर्व, मुंबई **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील व अर्जदार नं. ५ चा मुलगा नामे **दिपक गंभीर बर्वे** हे **दिनांक १३/०८/२००६** रोजी मयत झालेले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे कथन करुन मयत **दिपक गंभीर बर्वे** यांचे नावावर असलेली मौजे सुराणे, ता.बागलाण, जि.नाशिक येथील **गट नं. १६१, क्षेत्र हे. ०.८३ आर, आकार रु.१.१८ पैसे** या मिळकतीला मयताचे नांव कमी होऊन वारसांची नांवे लावणेकामी अर्जदारांनी मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **दिपक गंभीर बर्वे** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक २४/४/२०२४** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे, वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक १८/०३/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक**

**जाहीर नोटीस** नि.क्र.३३ प्रोसेस जमा — **अॅड. एम.एच.गांगुर्डे**

**रे.मु.नं.९६/२०२०**

**दिंडोरी येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो.कनिष्ठ स्तर याचे कोर्टात..**

**१) मनोहर राजाराम धात्रक** **वादी**
**विरुद्ध**
**१) हिगरामण सीताराम पगारे, वगैरे** **प्रतिवादी**

ज्याअर्थी वादीने **मौजे-उमराळे बुर्दुक**, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील **गट नं.४८ जुना सर्व्हे नं.१६/१ यांसी क्षेत्र ०१ हे.६८ आर, पोटखराबा ०० हे.०१ आर यांसी एकूण क्षेत्र ०१ हे.६९ आर आकार ०१ रु.२५ पैसे** याबाबत मालकी हक्काचे ठरावाकरिता व निरंतर ताकीदिचे हुकुमाचे मागणीकरिता या मे.कोर्टात दावा दाखल केला आहे, त्याअर्थी सदरील **प्रतिवादी नं. ४ बबन गमा पगारे**, रा.ओझरमिग, ता.निफाड, जि.नाशिक यांना दाव्यांमधील पत्यावर नोटीस काढलेली होती. परंतु प्रतिवादी हे सदर पत्यावर राहत नसलेचे बेलीफ रिपोर्ट दाखल आहे. तरीही प्रतिवादी याना सदर दाव्याची नोटीसची बजावणी व्हावी याकरिता हि जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे,सदरील दाव्याची सुनावणीची पुढील **तारीख: २५/०४/२०२५** रोजी अशी नेमलेली आहे,सबब प्रतिवादी यांनी सदर दिवशी कोर्टात दुपारी २:३० वाजता समक्ष अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून सर्व कागद्पत्रासह आपले म्हणणे मांडावे,न पेक्षा सदर केसचे कामकाज एकतर्फा चालविणेत येईल कळावे. ही जाहीर नोटीस. दिंडोरी दि:१५/०३/२०२५

**क. लिपिक** (शिक्का) **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिंडोरी** **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिंडोरी**

**जाहीर नोटीस** नि.नं:०६ प्रोसेस जमा — **श्री. संजय आर. अहिरे, श्री.बी.एन.बोरसे, अॅडव्होकेट, सटाणा (नाशिक)**

**जावक क्रमांक ६९१/२५ दि.१७/३/२०२५ वारसा प्रमाणपत्र चौ. अ.नं.५३/२०२५**

**सटाणा येथील मे. ज्युडि. मॅजि. साहेब वर्ग १, सटाणा यांचे कोर्टात......**

**१) गोरख धर्मा नवरे** वय- ४१ वर्षे, **२) काळु धर्मा नवरे** वय-३७ वर्षे, **३) गणु धर्मा नवरे** वय- ३५ वर्षे **४) संजय धर्मा नवरे** वय-२५ वर्ष सर्वांचा धंदा- १ ते ४ सर्वाचा धंदा मजुरी सर्व रा. ब्राम्हणगाव, ता. बागलाण, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाला**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे चुलत आजी नामे **कै. कासुबाई अर्जुन नवरे** ही **दि. ०२/०५/१९७५** तसेच चुलत चुलता **कै. अशोक अर्जुन नवरे दि. २४/११/१९६८,** चुलत चुलत आत्या **कै. वत्सलाबाई वालचंद माळी दि. १५/०८/२०१६** रोजी **मौजे ब्राम्हणगाव** ता. बागलाण जि. नाशिक येथे मयत झालेले असून अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस आहेत. म्हणुन तसे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे मागणीप्रमाणे चुलत आजी **कै. कासुबाई अर्जुन नवरे,** चुलत चुलत चुलता **कै. अशोक अर्जुन नवरे**, चुलत आत्या बहिण **कै. वत्सलाबाई वालचंद माळी** यांना अर्जदार हेच कायदेशिर वारस असलेबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्धीपासून **३०** दिवसांच्या आत अगर **दि.१६/४/२०२५** रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर होऊन आपले लेखी वा तोंडी म्हणणे दाखल करावे. वरिल मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही ऐकले जाणार नाही. आज **दि.१८/३/२०२५** रोजी माझी सही व मे कोर्टाचे प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक** (शिक्का) **दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक**

**जाहीर नोटीस** नि.नं:०५ प्रोसेस जमा — **सुनील माणिकराव पाटील (अॅडव्होकेट) दिंडोरी न्यायालय**

**दिवाणी चौकशी अर्ज नंबर ७/२०२५**

**दिंडोरी येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर नाशिक यांचे न्यायालयात,**

**१) सौ.पुष्पा उत्तम भोये**, वय-३८, धंदा-शेती रा. मु. पो. जातेगाव बु.ता. त्र्यंबकेश्वर,जि. नाशिक **२)सौ.निर्मला राजेंद्र भोये**, वय-३८, धंदा-शेती, रा.मांगधे, पो.जाहुले, ता .सुरगाणा, जि.नाशिक, **३)सौ.रेखा मोहन जाधव,** वय-२९ धंदा-शेती, रा.शिवपाडा, पो.ननाशी,ता. दिंडोरी,जि.नाशिक **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्व्ये वारस दाखल मिळणेबाबत..**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **किसन रावजी राऊत** हे **तारीख: १९/१०/२०२३** रोजी कवडासर ता, दिंडोरी, जि.नाशिक येथे मयत झाले आहे. त्याचे मृत्यू पश्चात त्याचे नावे असलेले कवडासर ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील शेतजमीन मिळकती गट नं.१९३,२७१ /अ,२७२ / ब चे रेकॉर्डला वारस नोंद होणेकामी अर्जदार यांनी **किसन रावजी राऊत** चे मृत्यू पश्चात अर्जदार हे कायदेशीर वारस आहे असा वारस दाखला मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जदारांना ते **किसन रावजी राऊत** यांचे कायदेशीर वारस आहेत, असा वारस दाखला अर्जदारास देणेबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकिलामार्फत तारीख: **२५/०४/२०२५** रोजी **सकाळी १०:३० वाजता** या न्यायालयात उपस्थितीत राहून म्हणणे मांडावे. आपण हजर राहिला नाही अथवा कोणाचीही हरकत आली नाही तर सदरचे अर्जदारांना त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून सदरचे वारस दाखल्याबाबत आवश्यक ते हुकूम करणेत येतील याची नोंद घ्यावी आज **दिनांक: १७/०३/२०२५** रोजी मे.न्यायालयाचे आदेशाअन्व्ये व शिक्यानिशी दिली असे.

**क. लिपिक** (शिक्का) **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिंडोरी** **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर दिंडोरी**


## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे.
**संपर्क-९८६०१३६५३६**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे. श्री गिफ्ट अॅण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक.
**संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

---

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### पाहिजेत

भरवज, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे इलेक्ट्रीक रिक्षासाठी ड्रायव्हर पाहिजे. **संपर्क- ९३२६१३८६५९**

---

महात्मा नगर (नाशिक) येथे बंगल्यासाठी विवाहित चौकीदार जोडप्याची गरज आहे. माणसाला ड्रायव्हिंगचा अनुभव असल्यास मदत होईल. स्त्रीला घरकामात मदत करावी लागेल. बंगल्याच्या परिसरात राहण्याची सोय केली जाईल. वयोमर्यादा: ४० वर्षापर्यंत. ९६५७०४९९९१ वर संपर्क साधावा.

---

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

---

बा.ब.बहुउद्देशीय संस्था संचलित, डिस्कव्हरी पब्लिक स्कूल, वडाळीभोई, खंडेराव मंदिराजवळ, ता.चांदवड, जि.नाशिक
**मुख्याध्यापक-** १ पद, **शिक्षक-** ९ पद, **सफाई कामगार-**१ पद, सिक्युरिटी गार्ड-१ पद, **वाहनचालक (वाहनासह)**-५ पद
**मुलाखत- वरील स्थळी**
दिनांक २१/०२/२०२५ ते दिनांक २५/०२/२०२५. वेळ स.११ ते ४
**संपर्क- ९४२२२५३०८४/ ९३७०४२२१२२**

### पाहिजेत

नामांकीत डेअरी प्रॉडक्ट कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे आहे.
संपर्क- **77750001666**

---

आश्रमशाळा, कन्येशाळेसाठी त्वरित लेडीज शिक्षिका पाहिजेत, निराधार, घटस्फोटीत, विधवा महिलांना प्राधान्य.
व्हॉट्सअप-**8862008788** वर फोटोसहीत त्वरित माहिती पाठवा.

### विकणे आहे

बोरगड नाशिक येथील १५३ वार जागेत ४ BHK कॉर्नर रो बंगलो त्वरित विकणे आहे.
संपर्क : ९५६१०४९४६१

### देणे आहे

विराज व्हरटेक्स, कॉलेज रोड ऑफिस भाड्याने देणे आहे
६०० स्केअर फुट, १ कार पार्किंग, स्वयं संचालित **संपर्क** - ९३७३२७१८७५ / ९३२३९०३५३९

### वधू पाहिजे

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

### Name changed

I HAVE CHANGE MY OLD NAME RAVINDRA MHALU MUJGULE. MY NEW NAME IS RAVINDRA MHALU MUDGULE AT POST-PANCHALE,TAL-SINNAR, DIST-NASHIK (M.S.) ADHAR No. 8774 8216 9957

---

I NO- JC392389P RANK NB SUB NAME BORSE MANOJKUMAR MOTIRAM S/O MOTIRAM UNIT- 14COSR C/O 56 APO HAVE CHANGED MY SPOUSE NAME FROM SHARDA SAHEBRAO TO **SHARDA MANOJKUMAR BORSE**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

## महत्त्वाचे



### भाटगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अर्चना साबळे यांची अविरोध निवड

**येवला :** शहरालगतच्या भाटगाव ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकला आहे. झालेल्या सरपंच निवडीत अर्चना योगेश साबळे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. येथील माजी सरपंच मंगल संतोष गुंजाळ यांच्यावर राजीनामा न दिल्याने अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर सरपंच निवडीसाठी आज भाटगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या कार्यालयात नविन सरपंच निवडीसाठी सदस्यांची विशेष बैठक बोलविण्यात आली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा अध्यक्ष वसंतराव पवार यांच्या नेतृत्त्वाखालील पॅनलच्या अर्चना साबळे यांच्या नावावर सरपंचपदासाठी शिक्कामोर्तब करण्यात आले. निवडणूक अधिकारी म्हणून मंडल अधिकारी जयश्री शेटे तसेच तलाठी डरमाळे व ग्रामसेवक वडीदके यांनी निवडणुकीचे काम पाहिले. यावेळी उपसरपंच वसंतराव पवार,चित्रा कांबळे, मंदाबाई जाधव,सुनंदा पवार,उज्वला गुंजाळ,अनिल माळी,जिजाबाई पवार हे सदस्य उपस्थित होते.

### खडकजांब शिवारात दुर्दैवी अपघात; पत्नी ठार, पती गंभीर जखमी

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील खडकजांब शिवारात मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल शिवा पंजाब समोर धोकादायक स्थितीत उभ्या असलेल्या कंटेनरवर कार आदळून भीषण अपघात झाला. या अपघातात कारमध्ये असलेल्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर कारचालक पती गंभीर जखमी झाला. ही घटना १२ मार्च रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास घडली. चांदवड तालुक्यातील खडकजांब शिवारात हॉटेल शिवा पंजाबसमोर टाटा कंपनीचा कंटेनर (क्रमांक एमएच ०४ एलवाय ९०१३) महामार्गावर धोकादायक स्थितीत उभा होता. चांदवडकडून नाशिककडे जाणारी एसेंट कार (क्रमांक एमएच १२ एनबी ३७१५) या कंटेनरला पाठीमागून धडकली. या भीषण अपघातात प्रीती अनिल शिंदे (वय ३२, रा. सातपूर, नाशिक) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचे पती अनिल पांडुरंग शिंदे (वय ३३, रा. सातपूर, नाशिक) हे गंभीर जखमी झाले. अनिल शिंदे हे स्थापत्य अभियंता आहेत. अनिल शिंदे यांनी वडनेरभैरव पोलिसात दिलेल्या तक्रारीत, कंटेनर चालकाने कंटेनरला पाठीमागे कोणतेही रिफ्लेक्टर न लावता आणि इतर वाहनचालकांसाठी कोणतीही काळजी न घेता धोकादायक स्थितीत उभा केल्याचा आरोप केला आहे.याप्रकरणी वडनेरभैरव पोलिसांनी अज्ञात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस नाईक ब्राह्मणे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### कसबे-सुकेणे येथे मागील भांडणाची कुरापत काढून मारहाण

**ओझर : वार्ताहर**

मागील भांडणाची कुरापत काढून दोघा जणांनी एकास शिवीगाळ करुन मारहान केल्याची घटना कसबे-सुकेणे येथे घडली. रविवार दिनांक १६ रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास राजाराम विष्णू कोपटे, वय ७१ वर्षे, धंदा कापड दुकान, रा. क्रांती चौक कसबे सुकेणे हे घरासमोर त्यांचे ओट्यावर बसलेले असतांना भुषण रामदास सदावर्ते व सागर रामदास सदावर्ते दोन्ही राहाणार कसबे सुकेणे हे तेथे आले व त्यांनी मागील कौटुंबिक भांडणाची कुरापत काढुन राजाराम कोपटे यांना वाईटसाईट शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच भुषण सदावर्ते याने लोखंडी पाईपने कोपटे यांच्या पाठीवर व कमरेवर मारहाण करून दुखापत केली. त्याचवेळी राजाराम कोपटे यांच्या घरातील लोक भांडण सोडविण्यास आले असता त्यांना ही भूषण व सागर सदावर्ते यांनी वाईट साईट शिवीगाळ करुन धक्काबुक्की व जिवे मारण्याची धमकी दिली असल्याची तक्रार राजाराम कोपटे यांनी ओझर पोलिस ठाण्यात नोंदविल्यावरून ओझर पोलिसांनी भूषण सदावर्ते व सागर सदावर्ते यांचे विरूद्ध गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास हवालदार जालिंदर चौघुले हे करत आहेत.

### चांदवडमध्ये गौरव मोटर्स दुकानात चोरी; ७० हजारांचे बुशिंग लंपास

**चांदवड : वार्ताहर**

येथील रेणुका कॉम्प्लेक्समधील गौरव मोटर्स या दुकानात सोमवारी (दि. १७) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी सदर दुकान फोडून सुमारे ७० हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रिक मोटारीसाठी वापरले जाणारे पितळी बुशिंग लंपास केले. गौरव मोटर्स हे दुकान चांदवड बस स्थानकासमोर असलेल्या रेणुका कॉम्प्लेक्समधील गाळा नंबर ३५ मध्ये आहे. हे दुकान इलेक्ट्रिक मोटर्स व सबमर्सिबल पंपाच्या स्पेअर पार्ट विक्रीचे आहे. सोमवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या दुकानाच्या मागील बाजूचे शटर तोडून आत प्रवेश केला व दुकानातील इलेक्ट्रिक मोटारीसाठी वापरल्या जाणाऱ्या सुमारे ७० हजार रुपये किमतीच्या पितळी बुशिंग चोरून नेल्या. याबाबत दुकानमालक ईश्वरभाई रामजीभाई पटेल यांनी चांदवड पोलिसात तक्रार दाखल केली असून अधिक तपास चांदवड पोलीस करीत आहेत.

### शांततेत रंगपंचमी उत्सव साजरा करावा : महाजन

**येवला :** गेल्या दीडशे वर्षांची रांगपंचमीची आमने सामने येत रंगांचे सामने खेळण्याची परंपरा उत्सवप्रिय येवलेकरानी जपली आहे. आज बुधवारी शहरातील टिळक मैदान आणि डीजे रोडवर सायंकाळी रंगपंचमीचे सामने रंगणार आहे. परंपरा जपताना कायदा-सुव्यवस्था राखून शांततेत रंगपंचमी साजरी करावी, असे आवाहन शहर पोलीस निरीक्षक धीरज महाजन यांनी केले. रंगपंचमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहर पोलीस ठाण्यात रविवारी दुपारी तीन वाजता पोलीस निरीक्षक महाजन यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील रंगपंचमी उत्सव समितीची बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत व्यंगचित्रकार प्रभाकर झळके,माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी, शिवसेना शहरप्रमुख संजय कासार , शाहू शिंदे,राजेंद्र लोणारी,संजय कुक्कर,गुड्डू जावळे, सुनील जाधव,ए.ए.शेख,जरार शेख, डॉ. भूषण शिणकर,योगेश सोनवणे आदींसह नागरिक उपस्थित होते. दिवसभर पोलिसांची नजर राहणार असून, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन केले आहे.

# पिण्यासाठी सोडले कडवाला आवर्तन

## वडांगळीसह १३ गावे पाणीयोजनेला संजीवनी


**सिन्नर : प्रतिनिधी**

**पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागल्याने कडवा कालव्याला आवर्तन सोडण्यात आले आहे. या वर्तनामुळे आवर्तनामुळे वडांगळीसह १३ गाव पाणीयोजनेला संजीवनी मिळाली आहे. याशिवाय शून्य ते ७२ किलोमीटर अंतरातील कालव्याकडेच्या जवळपास १ हजार विहिरींना कालव्याचा पाझर होऊन पाणी उतरणार असल्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या त्याचा सिंचनासाठीही लाभ होणार आहे. पूर्व भागात पाणीटंचाई जाणू लागल्याने पिण्यासाठी कडवा कालव्यातून आवर्तन सोडावे, अशी मागणी खासदार राजाभाऊ वाजे यांनी पाटबंधारे विभागाकडे केली होती.**

१९० दशलक्ष घनफूट इतके पाणी या पिण्याच्या आवर्तनातून सोडले जाणार आहे. त्यातून वडांगळी येथील ७२ किलोमीटर अंतरावरील वडांगळीसह १३ गाव पाणीपुरवठा योजनेचा साठवण बंधारा भरून घेतला जाणार आहे. त्यातून पाणी उरल्यास पुढे ते पांगरी येथील पाणीपुरवठा योजनेच्या डांबर नाल्यात टाकले जाणार आहे. हे आवर्तन केवळ पिण्याच्या पाण्यासाठी असून, शेतकऱ्यांनी डोंगळे टाकून पाणी चोरी करू नये किंवा सिंचनासाठी पाणी घेण्याचा प्रयत्न करू नयेत, अशा सूचना कार्यकारी अभियंता शितल सहाणे यांनी केले आहे. रब्बीच्या आवर्तनातच कालव्यातील सर्व डोंगळे काढून टाकण्यात आले आहेत. मात्र तरीही पाणी चोरी होऊ नये यासाठी तीन शाखा अभियंता, कालवा निरीक्षक, मोजणीदार अशा ९ लोकांची कालव्यावर निगराणी ठेवण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. १५ मार्च रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास कडवा कालव्याला २५० क्यूसेक क्षमतेने आवर्तन सोडण्यात आले होते. त्यानंतर हळूहळू प्रवाह ३५० क्यूसेक पर्यंत वाढवण्यात आला. मंगळवारी (दि.१८) अवघ्या तीन दिवसात कालव्याचे पाणी वडांगळी येथील ७२ किलोमीटरला पोहोचले. त्यातून पाणीपुरवठा योजनेचा एमआय टँक भरण्यास प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

**रब्बीत भिजले होते क्षेत्र**

जानेवारी महिन्यात रब्बी पिकासाठी ६५० दशलक्ष घनफूट इतके सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात आले होते. तब्बल २४ दिवस आवर्तन सुरू राहिल्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी रब्बीचे आवर्तन बंद करण्यात आले. प्रवाही, उपसा आणि विहिरींच्या माध्यमातून या आवर्तनातून ५५०० हेक्टर क्षेत्राला पाण्याचा लाभ झाला होता.



पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर केवळ पिण्याच्या पाण्यासाठी कडवा कालव्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. पाणीचोरी रोखण्यासाठी कालव्याकडेच्या भागातील विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे. याशिवाय गरज पडेल तेथे पोलीस बंदोबस्त ही घेतला जाणार आहे.

**– मिलिंद बागूल,**
उपअभियंता, कडवा



### मनमाडला रॉयल सामाजिक संस्थेतर्फे रोजा इफ्तार पार्टी

**मनमाड : प्रतिनिधी**

सध्या देशात हिंदू-मुस्लिम समाजात द्वेषाची भावना पसरवून दोन समाजात तेढ निर्माण करून दंगली घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू असतानाच मनमाड शहरातील रॉयल सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने सर्वधर्मसमभाव जोपासत रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. येथील सिकंदरनगरमध्ये या रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मालेगाव अप्पर पोलीस अधीक्षक तेजबिर सिंग संधू, उपविभागीय पोलीस अधीक्षक बाजीराव महाजन, पोलिस निरीक्षक विजय करे, नांदगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे सचिव आमिन शेख, डॉ. फहिम कुरेशी, नरहरी उंबरे व सर्वधर्मीय धर्मगुरू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष खालिद शेख यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी खालिद शेख, डॉ. नाझीम शेख, शकील तांबोळी, अकिब शेख, सलीम शेख, झहीर फिटर, फारुख शेख, फारुख पठाण, आरिफ सय्यद, हनीफ शेख, नदीम शेख, शारूख सय्यद, शारीख राठोड, लतिफ मणियार, जब्बार कुरैशी, इम्रान कादरी, इम्रान सर अफजल शेख, इम्रान शफी शेख, तौकिर पठाण, आबीद वकील, हजीक शेख युनुस चाचा, शकील भाई क्रेन वाले, रिजवान खान, दानिश शेख, जुनेद तांबोळी, नदीम भाई किराणा यांनी परिश्रम घेतले.

# बालकांना संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे

## आशिमा मित्तल : महिला व बालविकासचा आढावा

**नाशिक : प्रतिनिधी**

बालकांना पोषण आहार देऊन सुदृढ करण्यासोबतच त्यांच्यासाठी बौद्धिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. पोषण आहारासोबतच सर्जनशील शिक्षण, खेळ आणि मानसिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.



महिला व बालविकास विभागाची आढावा बैठक काल जिल्हा परिषदेच्या रावसाहेब थोरात येथे काल दि.१७ महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

बैठकीत सुपोषण अभियान, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, बालसंवर्धन कार्यक्रम, लेक लाडकी योजना, पोषण अभियान, अंगणवाडी बांधकाम व पायाभूत सुविधा यांच्यासह विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी अंगणवाडीमधील भौतिक सुविधा, वीज जोडणी, नळपाणीपुरवठा, शौचालय सुविधा वजनकाटे उपलब्धता आयआयटी मुंबई स्तनपान विषयक प्रशिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण, शंभर दिवस अभियान आढावा व कार्यवाही, लोकसेवा हक्क कायदा या विषयांचा आढावा घेतला. अंगणवाडीचे काम केवळ पोषण आहार पुरविणे हेच नसून शालेय वयापूर्वीच्या मुलांसाठी योग्य आहारासह त्यांच्या मेंदूच्या वाढीस चालना देणारे बौध्दीक उपक्रम राबवून बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याची महत्वाची जबाबदारी अंगणवाडीची असल्याचे सांगितले. अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉक्टर बागूल यांनी बालमृत्यू,माता मृत्यू व लसीकरण याबाबत आढावा घेतला. महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रतापराव पाटील यांनी देखील विविध विषयांबाबत मार्गदर्शन करताना सर्व योजनांचा नियमितपणे आढावा घेण्याच्या व क्षेत्रीय भेटी वाढवण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीत ग्रामपंचायत विभागाचे सहायक गटविकास अधिकारी प्रशांत पवार, सर्व प्रकल्पाचे बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका व विस्तार अधिकारी सांख्यिकी व कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.



### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा कार्यकर्ता मेळावा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता हा समाजातील तळागाळातील घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असतो परंतु माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, प्रशासनातील मुजोरी, माहिती नाकारण्याची वाढती प्रवृत्ती, सरकारी कार्यालयातील सरकारी बाबू हे खूप निर्ढावलेले आहेत हे जनतेला व कार्यकर्त्यांना सहजा सहजी माहिती उपलब्ध करून देत नाहीत. त्यामुळे आपला महासंघातील प्रत्येक कार्यकर्ता हा प्रशिक्षित असला पाहिजे कोणताही स्वार्थ न ठेवता आकसभावना मनात न ठेवता सदविवेक बुद्धीने माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे, असे प्रतिपादन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी केले

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र यांच्या वतीने सिडकोतील संत सेना भवन येथे नाशिक जिल्ह्यातील पदाधिकारी व सदस्य यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या पुढाकाराने नुकताच कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. नाशिक खंडपीठात राज्य महिती आयुक्त हे मनमानी पद्धतीने कार्यभार करीत आहेत. कार्यालयातील उपसचिव सांगळे व कातकाडे हे अर्जदारांना उडवाउडवीचे उत्तरे देतात, या कार्यालयात एका दिवसात जवळपास २०० पेक्षा जास्त सुनावण्या घेऊन अर्जदारांची बोळवण केली जाते. माहिती अधिकार कायद्याला ही मंडळी दुबळा बनवण्याचे काम करीत आहेत. असेच सुरु राहिल्यास माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने उपोषणाचे हत्यार उपसावे लागेल असे राज्य कार्यकारिणी सदस्य साहेबराव वाघ यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जेष्ठ आरटीआय कार्यकर्ते राहुल भारती, उपाध्यक्ष शंकर वडवले, उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष महेश पाटील, युवा कार्यकर्ते अभिषेक बसेवेकर, ठाणे जिल्हाध्यक्ष अशोक पडवळ, धुळे जिल्हा अध्यक्ष पुनमचंद मोरे, नाशिक जिल्हाध्यक्ष सुभाष दराडे, इगतपुरी तालुका अध्यक्ष किरण धुमाळ नागेश मोरे, पंढरीनाथ कन्नोर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुभाष दराडे यांनी केले. तर आभार किरण धुमाळ यांनी मानले.

# कळवण बाजार समिती उपसभापतिपदी बागूल

**कळवण : प्रतिनिधी**

कळवण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतिपदी पंढरीनाथ बागूल यांची संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान उपसभापती सोमनाथ पवार यांनी आवर्तन पध्दतीने राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसभापती पदासाठी सहायक निबंधक मंगेश कुमार शहा यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात संचालक मंडळाची विशेष सभा घेण्यात येऊन निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली.



निर्धारित वेळेत उपसभापतीसाठी पंढरीनाथ बागुल यांनी एकमेव अर्ज दाखल केल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. बागुल यांच्या निवडीची घोषणा करताच त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला. नामनिर्देशन पत्रावर सूचक म्हणून बाळासाहेब गांगुर्डे तर अनुमोदक म्हणून यशवंत गवळी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी नवनिर्वाचित उपसभापती पंढरीनाथ बागुल यांचा बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, कळवणचे नगराध्यक्ष कौतिक पगार राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, युवा नेते भूषण पगार यांनी सत्कार केला. उपसभापती निवडीसाठी बैठकीस संचालक यशवंत लक्ष्मण गवळी, सुधाकर नामदेव खैरणार, बाळासाहेब गुलाब गांगुर्डे, दिलीप धवळू कुव प्रविण, सुदामराव देशमुख, सोमनाथ महारू पवार, दत्तु मुरलीधर गायकवाड संचालिका सुनिता शिवाजी जाधव, रेखा राजाराम गायकवाड, बाळासाहेब महादू वराडे, ज्ञानदेव लक्ष्मण पवार, भरत भावराव पाटील, शितलकुमार वसंत अहिरे, योगेश पांडूरंग महाजन, योगेश भाऊसाहेब शिंदे शशिकांत शिवाजी पवार सचिव रविंद्र नारायण हिरे आदी उपस्थित होते. उपसभापती बागुल यांच्या निवडीचे आमदार नितीन पवार, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयश्री पवार, ऋषीकेश पवार यांनी केले आहे.

### सद्गुरू, सत्कर्म, नामस्मरण मोक्षप्राप्तीचे प्रमुख मार्ग

#### साध्वी अर्पिता मानस भारतींचे निरूपण

**नाशिक : प्रतिनिधी**

तुलसी मेरे राम को रिझ भजो या खिज म्हणजेच भगवंताचे नाव कसेही घ्या त्याचे फळ मिळणारच. महर्षी नारद मुनींच्या रूपाने सद्गुरू मिळाल्यानंतर वाल्ह्याचा (रत्नाकर) वाल्मिकी झाला. एवढी ताकद भगवंताच्या नामस्मरणामध्ये आहे. सद्गुरू, सत्कर्म व नामस्मरण हे मोक्ष प्राप्तीचे प्रमुख मार्ग असून, त्याचा अंगीकार प्रत्येक मनुष्याने करावा, असे आवाहन साध्वी अर्पिता मानस भारती यांनी केले.

पंचवटीतील अमृतधाम परिसरातील औदुंबरनगर येथील दत्त मंदिर प्रांगणात औदुंबरनगर मित्र मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या संगीतमय श्रीराम कथेत त्या बोलत होत्या. यावेळी माजी नगरसेविका पूनम मोगरे, रुची कुंभारकर, फौजी महाराज सूर्यवंशी वसंतराव पुंड यांची उपस्थिती होती. त्या पुढे म्हणाल्या की, आपण केलेली चांगली वाईट कर्मा नुसार संतती जन्माला येत असते. पुत्र सुपुत्र निघाला तर तो स्वतः कमवेल परंतु कुपुत्र जर निघाला तर तो आसलेल्या संपत्तीचा ही नाश करेल. चांगली संतती जन्माला येणे हे पूर्व सुकृताचे फळ



असते. मनुष्यास अंतकाळी भगवंताचे नामस्मरण झाले की तो मोक्षास प्राप्त होतो. परंतु त्यासाठी आयुष्यभर नामस्मरणाची सवय असली पाहिजे. सत्य जीवनात आले की त्या ठिकाणी मोह राहत नाही. भगवंताची भक्ती मनुष्याच्या जीवनामध्ये क्रांती घडवून आणते.

सत्याचे दर्शन घडवितात ते खरे संत असतात. संत आणि गंगा हे दोघेही एक सारखेच आहेत. गंगेत किंवा कथेमध्ये डुबकी घेतल्यानंतर दोघेही पापाचे क्षालन करतात. परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करावी. श्रीराम कथेचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष रमेश वानखेडे, मोहन सहाने, एकनाथ पगार, प्रभाकर दिडोळकर, क्षीरसागर, सुनील पाटील आदींनी केले आहे.

# प्रगल्भ विचारांचा मनुष्य आनंदी

## गंगाधर महाराज कवडे; श्री वरदविनायक मंदिरात सप्ताह

**नाशिक : प्रतिनिधी**

**संसारामध्ये संस्कार आहे, स्वत:साठीच न जगता समाजहित ज्यांच्या विचारात आहेत अशा प्रगल्भ विचाराचा मनुष्य संसारात केवळ आनंदच उपभोगतो. स्वच्छ दृष्टिकोन ठेऊन केलेले विधायक कार्य हे सामाजिक कार्य असून, ती एकप्रकारे तप साधना असल्याचे विचार शब्दप्रभू गंगाधर महाराज कवडे यांनी व्यक्त केले.**

हिरावाडी येथील वरदविनायक मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त वै. हभप श्री रामनाथ महाराज शिलापूरकर यांचे प्रेरणेने व मधू



सूर्यवंशी, एकनाथ सांगळे यांचे कुशल मार्गदर्शनाने सुरू असलेल्या नाम सप्ताहातील कीर्तनात सारासार विचार करा उठा उठी नाम धरा कंठी विठोबाचे या अभंगावर ते बोलत होते. महाराज म्हणाले की, सारासार विचार जीवनात असावा. सृष्टीचक्र हे एकमेकावर आधारलेले म्हणजेच प्रत्येकाचे जीवन एकमेकांवर आधारलेले आहे. जगामध्ये आपले काही नसून श्वास सुद्धा आपला नाही हे समजने हा ही सारासार विचार आहे. मनुष्य हा समग्र सृष्टीचा मुकुटमनी आहे, किंबहुना मनुष्याशिवाय सृष्टीला शोभा नाही. मनुष्याने आत्मकेंद्रित न राहता समाजकेंद्रित राहिले पाहिजे, असे मतही कवडे महाराज यांनी व्यक्त केले. याप्रसंगी हभप एकनाथ कुमावत गुरुजी, फौजी महाराज सूर्यवंशी, सुरेश महाराज मगर, कैलास महाराज वेलजाळी, दादाजी अहिरे गोरख सूर्यवंशी, बाळा ( संदीप ) जाधव, रामदास श्रीशेठ, जगतगुरू तुकाराम महाराज गुरुकुलाचे विद्यार्थी व वारकरी बांधव उपस्थित होते. उर्वरित नाम सप्ताह सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एकनाथ महाराज सांगळे, मधुकर सूर्यवंशी, विष्णू कुडके, विजू मोरे, किशोर खैरनार, नितीन मोरे, ज्ञानेश्वर पवार, सागर नाईक यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### येवल्यात ट्रक-दुचाकी अपघातात दोन गंभीर जखमी



**येवला : प्रतिनिधी**
शहरातील येवला-मनमाड राज्य महामार्गावर एस. एस. मोबाइल शोरूमसमोर ट्रक आणि दुचाकी यांच्यात अपघात होऊन दुचाकीवरील दोन व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत. यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, दुपारी दोन वाजेच्या दरम्यान नगर-मनमाड महामार्गावर एस. एस. मोबाइल शोरूमसमोर एका दुचाकीला ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात होऊन यात रोहिदास रामभाऊ शेलार, राहणार न्यायडोंगरी, तालुका नांदगाव, ज्ञानेश्वर मच्छिंद्र जाधव, रा. चिचोंडी, ता. येवला हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, सदर जखमींना येवला येथे प्राथमिक उपचार करण्यात येऊन पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे. दरम्यान, या महामार्गावर अवैधरीत्या थाटलेल्या दुकानांमुळे सातत्याने अपघात होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

### उगावच्या विद्यार्थ्यांची अखिल भारतीय गंधर्व मंडळ परीक्षेत बाजी



**निफाड शहर : प्रतिनिधी**
निफाड येथील कुलस्वामिनी व्यक्तिविकास संस्थेचे कुलस्वामिनी संगीत व भरतनाट्यम विद्यालय तसेच महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथील विद्यार्थ्यांनी निफाड येथे झालेल्या अखिल भारतीय गंधर्व परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश मिळवले. यात पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांमध्ये आरव मेधनेपाटील, पुष्कर शिंदे, प्रणीत ढोमसे, विश्वजित डुंबरे हार्मोनियममध्ये प्रथम श्रेणी, प्रजीत क्षीरसागर, कृष्णा काळे, इंद्रजित पानगव्हाणे आदी तबलामध्ये द्वितीय श्रेणी, कृष्णा गाजरे, भावेश सुतार, विदित ढोमसे तबलामध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण येऊन घवघवीत यश मिळवले आहे. सदर विद्यार्थ्यांना उगाव हायस्कूलमध्ये पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन प्राचार्य कैलास गवळी, पर्यवेक्षक नंदराम ढिकले, सुहास सुरळीकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सदर विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे, कुलस्वामिनी संगीत व भरतनाट्यम विद्यालयाचे संचालक सुहास सुरळीकर, अभिजित सुरळीकर, प्राचार्य कैलास गवळी, पर्यवेक्षक नंदराम ढिकले आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे. सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी केले तर आभार बापू आव्हाड यांनी मानले.

## निधन वार्ता



### डॉ. भैरवनाथ अंकार

**सिन्नर :** येथील डॉ. भैरवनाथ दत्तात्रय अंकार (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, भाऊ असा परिवार आहे. पत्रकार राजेंद्र अंकार यांचे ते बंधू होत.



### विवेक मोरे

**सिन्नर : प्रतिनिधी**
येथील व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते विवेक पांडुरंग मोरे (५०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, बहीण असा परिवार आहे.



### तुळसाबाई नाठे

**नाशिक :** चांदोरी येथील रहिवासी प्रगतिशील शेतकरी सुकदेव नाठे यांच्या पत्नी तुळसाबाई सुकदेव नाठे (७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रामनाथ व कैलास नाठे यांच्या त्या मातोश्री होत.



### परशरामजी ओझा

**नाशिकरोड :** उपनगरच्या इच्छामणी गणेश मंदिर ट्रस्टचे विश्वस्त, इच्छामणी विद्या मंदिर शाळेचे विश्वस्त व संतोष बेकरीचे संस्थापक परशरामजी ओझा (९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रवींद्र ओझा व संजय ओझा यांचे ते वडील होत.

# सुट्टीच्या दिवशी कोषागारे कार्यालये सुरूच राहणार

**नाशिक : प्रतिनिधी**
**अर्थिक वर्षअखेरचा ताळेबंद सादर करण्यासाठी तसेच आयकर विवरणपत्रांसह वर्षांचे हिशेब पूर्ण करण्याच्या कामांना गती आली आहे. त्यातच ३० व ३१ ला रविवार आणि रमजान ईदची सुट्टी असली तरी यादिवशी कोषागारे कार्यालये सुरू राहणार आहेत.**

शासकीय कार्यालयांत सद्या मार्चएन्डची धावपळ सुरू आहे. शासकीय निधी शिल्लक राहू नये, यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. त्यातच ३० ला रविवार आणि ३१ ला रमजान ईदची सुट्टी आहे. मात्र, या दिवशी शासकीय कोषागारे सुरू राहणार आहेत. आगाऊ कर भरणा करण्यासाठी अवघ्या ५ दिवसांचा कालावधी हातात आहे. ३१ मार्चपर्यंत शासकीय बिले दाखल करणे, मंजूर करणे आणि निधी खर्च करणे आवश्यक आहे. स्टॅम्प ड्युटी भरण्यासाठीही होणारी गर्दी लक्षात घेता त्यासाठी सुटीच्या दिवशीही बँकासह कोषगार कार्यालये सुरूच ठेवण्याचे ओदश शासनाने दिले आहेत. मार्च महिन्यात तीन प्रकारच्या करांचा भरणा केला जातो. त्यात प्रोफेशनल टॅक्स, जीएसटी आणि ॲडव्हान्स टॅक्स अर्थात अग्रीम करांचा भरणा १५ मार्च रोजी करावयाचा असतो. परंतु त्याला ३१ मार्चपर्यंत

**निधी परत जाऊ देऊ नका**
नाशिक भारतीय स्टेट बँकेची कोषागार शाखा, नाशिकरोड व देवळाली कॅम्प शाखा, जिल्हयातील तालुका मुख्यालयी असलेल्या उपकोषागार शासकीय व्यवहारास प्राधिकृत केलेल्या स्टेट बॅकेच्या शाखा तसेच सुरगाणा येथील बँक ऑफ बडोदा शाखा ३१ मार्च रोजी रात्री बारापर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिले आहेत. दि.३० व ३१ मार्च रोजी सर्व कार्यालये, जिल्हा कोषागार कार्यालय, उपकोषागार कार्यालये व शासन व्यवहार करणाऱ्या बँका कार्यालयीन कामकाजासाठी सुरू राहणार आहेत. अधिकाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहून निधी परत जाणार नाही. याची काळजी घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# अन्यायकारी शासन निर्णय रद्द करा प्राथमिक शिक्षक समितीची मागणी



**नाशिक : प्रतिनिधी**
शासनाने १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय त्वरित रद्द करावा. २०२४-२५ ची संचमान्यता त्याच्या आधारेच अंतिम केली आहे. ही बाब शिक्षण कायद्यातील तरतुदी आणि २८ ऑगस्ट २०१५ च्या निर्णयाच्या विसंगत आहे. त्यामुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार असून, या विरोधात आता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती आक्रमक झाली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी (दि.१७) धरणे आंदोलन देत हा अन्यायकारी शासन निर्णय रद्दची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली.

या निर्णयामुळे एकीकडे शिक्षक अतिरिक्त ठरतील. दुसऱ्या बाजूने काही शाळांमध्ये शिक्षकच नसतील. परिणामी, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार नाही. विद्यार्थ्यांना स्थानिक शाळेतून परगावी इतर शाळेत दाखल करावे लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विशेषत: मुलींची गळती वाढेल. शिक्षणाचे प्रमाण कमी होणार असल्याचाही धोका या शिक्षकांनी व्यक्त केला आहे. १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा कमी असल्यास एक शिक्षक मंजूर केला आहे. ही बाबही शिक्षक हक्क कायद्याच्या तरतुदीच्या विसंगत असल्याचे या समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळेच १५ मार्च २०२४ चा अद्याप रद्द न केलेला शासन निर्णय रद्दसाठी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन दिले. यावेळी राज्य नेते काळूजी बोरसे, राज्य कोषाध्यक्ष केदू देशमाने, विभागीय सहसचिव प्रकाश सोनवणे, जिल्हा सरचिटणीस साहेबराव पवार आदींसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मनसेच्या वतीने शिवजयंती उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**
मनसेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार जल्लोषात साजरी करण्यात आली. मनसेच्या 'राजगड' कार्यालयाबाहेर भव्य असे स्टेज बांधण्यात आले होते. अखिल महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार साजऱ्या करण्यात आलेल्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, अनंत सांगळे, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, धीरज भोसले, योगेश दाभाडे, संदीप दोंदे, सचिन सिन्हा, शहर उपाध्यक्ष विशाल भावले, ज्ञानेश्वर बगळे, मिलिंद कांबळे, विजय अहिरे, संतोष कोरडे, राकेश परदेशी, अर्जुन वेताळ, नितीन माळी, गणेश जायभावे, किशोर वडजे, अविनाश पाटील, कौशल पाटील, अतुल पाटील, राजू परदेशी, प्रफुल बनबैरू, नितीन सूर्यवंशी, अमोल गोजरे, महिला सेना जिल्हाध्यक्ष ज्योती शिंदे, शहराध्यक्ष अरुणा पाटील, कविता कुलकर्णी, मेरा आवारे, गोपी पगार, रोहित गावकर, वैभव रौंदळ, मयूर पाटील, नवनाथ जाधव, नितीन अहिरराव, अमोल भांबर, विश्वास उफाळे,दिनेश विश्वकर्मा, गणेश झोमन, विजय बोराडे, पंकज कोठावदे, हिम्मत पाटील व महाराष्ट्र सैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी पाणी फेरतपासणी करून अहवाल द्या

## काँग्रेसची निवेदनाद्वारे प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे मागणी



**नाशिक : प्रतिनिधी**
गोदावरीच्या पाण्याची फेरतपासणी करून अहवाल सादर करावा, अशी मागणी करणारे निवेदन काँग्रेस सेवादलाच्या वतीने प्रदूषण नियंत्रण महामंडळाला देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने जानेवारी ते डिसेंबर २०२४ चा गंगा-गोदावरीच्या पाण्याचा अहवाल नुकताच सादर केला. त्यात गंगा-गोदावरीचे पाणी पिण्यायोग्य आहे, असे अहवालात म्हटले आहे, परंतु ज्या ठिकाणचे पाण्याचे नमुने प्रदूषण नियंत्रण महामंडळाने घेतले आणि ते तपासले त्या ठिकाणची परिस्थिती पाहता खरंच प्रदूषण नियंत्रण महामंडळाने तेथीलच पाण्याचा नमुने घेऊन त्याची तपासणी केली का? दक्षिणेकडची काशी समजली जाणारी गोदावरी नदी ही नाशिक शहरातून जाते. नदीत महापालिकेच्या अनेक ड्रेनेजलाइन नदीपात्रात सोडल्या जातात. सर्वप्रथम प्रदूषण नियंत्रण महामंडळाने महानगरपालिकेला कायदेशीर नोटीस देऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणं अपेक्षित आहे. प्रदूषण नियंत्रण महामंडळाने कुठल्या पाण्याचे नमुने घेऊन तपासले आणि ते पाणी पिण्यायोग्य आहे का याचा खुलासा करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

प्रदूषण नियंत्रण महामंडळाने गंगा-गोदावरीच्या पाण्याचा अहवाल सादर केला आहे, तो संशयास्पद वाटत असल्याने गोदावरीचे पाणी घेऊन त्याचा अहवाल नाशिककरांसमोर सादर करण्याची मागणी नाशिक शहर काँग्रेस सेवा दलाच्या वतीने या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, शहर काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर, विजय पाटील, गौरव सोनार, संतोष हिवाळे, संदीप वाघ, इमरान अन्सारी, शेबाज मिर्झा, सिद्धार्थ गांगुर्डे, अशोक लहामगे, अरुण जाधव, उमेश चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांना स्वरक्षणाचे धडे देण्याऐवजी पुरुषांवर संस्कारांची गरज

## एचपीटीच्या प्रांगणात चित्ररूपात अवतरले शिवराय



**नाशिक : प्रतिनिधी**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समग्र जीवनाचे दर्शन चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्यात आले. शिवप्रेमी चित्रकार रमेश बाळाजी जाधव यांनी रेखाटलेल्या १३० चित्रांचे प्रदर्शन एचपीटी आर्ट्स ॲण्ड आरवायके सायन्स महाविद्यालयातील भूगोल व इतिहास विभागाच्या वतीने मंगळवारी भरविण्यात आले.

पन्हाळगड वेढ्यातून बाहेर पडून विशाळगडाकडे कूच करताना बाजीप्रभू देशपांडेंनी लढविलेली खिंड, अफजलखानाचा वध आणि वधाचा पोवाडा शिवाजी महाराजांसमेर गाताना शाहीर अज्ञानदास, शाहीस्तेखानची कापलेली बोटे, सूरतवर स्वारी, शहाजीराजेंच्या पित्याचा मृत्यू, औरंगजेबाच्या नजरकैदेतून सुटका मिळविण्यासाठी महाराजांनी लढविलेली शक्कल, राज्याभिषेकप्रसंगी नजराणे स्वीकारताना महाराज, आजारी पडून अंथरुणाला खिळलेले महाराज असे विविध प्रसंग या प्रदर्शनात चित्र स्वरूपात मांडण्यात आले. प्रदर्शन पाहण्यासाठी कॅम्पसमधील महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. चित्ररूपात छत्रपती शिवराय कॅम्पसमध्ये अवतरल्याची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

याप्रसंगी चित्रकार रमेश जाधव, उपप्राचार्य डॉ. प्रशांत देशपांडे, भूगोल विभागप्रमुख डॉ. प्रमोदकुमार हिरे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अतुल ओहाळ, दोन्ही विभागांचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रगती देशमुख यांनी केले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रा. हरपाळे, प्रा. भामरे, प्रा. सौ. पठारे, प्रा. भोंग, प्रा. प्रदीप पवार, प्रा. रामदास भोंग, प्रा. अंबादास महाले आदींनी परिश्रम घेतले.

**ॲड. देशपांडे यांचे व्याख्यान**
महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने याच दिवशी 'नैसर्गिक न्यायतत्त्वे आणि भारतीय राज्यघटनेतील तरतुदी' या विषयावर माजी विद्यार्थी ॲड. ईशम देशपांडे यांचे व्याख्यान झाले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय न्याय देऊ नये, न्यायाला आधार असला पाहिजे, प्रत्येक मुद्दा विचारात घेतला पाहिजे ही मुख्ये न्यायतत्त्वे असल्याचे ॲड. देशपांडे यांनी सांगितले. राज्यशास्त्र विभागप्रमुख व उपप्राचार्य डॉ. प्रशांत देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. अश्विनी घनबहादूर, प्रा. हरेश खैरनार, डॉ. संजय आहिरे, डॉ. अशोक वसावे, डॉ. गणेश गिरी आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## एचपीटीच्या वार्षिक समारंभात लीना बनसोड यांचे मत

**नाशिक : प्रतिनिधी**
मुलींना आणि महिलांना स्वरक्षणाचे धडे देण्याची गरज नाही, तर मुले आणि पुरुषांवर संस्कार करण्याची गरज आहे, असे परखड मत नाशिक विभागाच्या आदिवासी आयुक्त लीना बनसोड यांनी शनिवारी येथे मांडले.

एचपीटी आर्ट्स ॲण्ड आरवायके सायन्स महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व विद्यार्थी गुणगौरव समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी गोखले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे होते. याप्रसंगी सर्वोत्कृष्ट विद्यार्थी ओम उपाध्याय म्हणून याला, तर सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून शुभदा खरे हिला गौरविण्यात आले. विविध स्पर्धा आणि परीक्षांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, तर विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विजयकुमार वावळे

# औरंगजेबाच्या कबरीविरोधात बजरंग दल आक्रमक!

## जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करत कबर हटवण्याची केली मागणी



**नाशिक : प्रतिनिधी**
विश्व हिंदू परिषदेने औरंगजेबाची कबर हटवा, अशी मोहीम सुरू केल्यानंतर आता त्याचे पडसाद नाशिक जिल्ह्यात दिसू लागले आहेत. बजरंग दलातर्फे सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी निदर्शने करण्यात आली. शासनाने तात्काळ छत्रपती संभाजी महाराजनगरातील औरंगजेबाची कबर हटवावी, अन्यथा नाशिकचे कारसेवक या कबरीच्या दिशेने कूच करत ती उद्ध्वस्त करतील, असा इशारा यावेळी विश्व हिंदू परिषदेने जिल्हाधिकारी जलद शर्मा यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, उझबेगी परकीय आक्रमक बाबर याचा वशंज क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर छ. श्री संभाजी महाराजनगर या शहरात आहे. वास्तविक औरंगजेबाचा मृत्यू अहिल्यादेवीनगर येथे झाला व नंतर त्याचे प्रेत काढून ते छ. श्री संभाजीनगर येथे पुरले व त्या ठिकाणी त्याची कबर करण्यात आली. याच औरंगजेबाने शीख गुरू तगेबहादूर यांची हत्या केली होती. शीख गुरू गोविंदसिंह यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून यांना जिवंतपणी मारण्यात आले. काशीविश्वेश्वराचे मंदिर याने फोडले, मथुरेला असणाऱ्या सुंदर मंदिराचा यानेच विध्वंस केला.

सोरटी सोमनाथाचे मंदिर पुन्हा एकदा यानेच फोडले. त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गड यावर हल्ले केले. हजारो हिंदूंच्या प्रेतांच्या राशी गावाबाहेर रचून हिंदूंची भयानक क्रूर कत्तल केली. छत्रपती शाहू महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंचे मोठ्याप्रमाणावर धर्मांतरण केले. अशा क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर ही पूर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच अनंत यातनांचे प्रतीक आहे. त्यामुळे ही कबर पूर्णपणे नष्ट करावी.

# ज्येष्ठ नगरसेवकांनी मार्गदर्शक व्हावे

## भाजप संघटनमंत्र्यांच्या भूमिकेमुळे अस्वस्थता

**नाशिक : प्रतिनिधी**
महापालिका निवडणुकीचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयाच्या हाती असून, ६ मे रोजी होणाऱ्या सुनावणीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. नाशिक महापालिकेत प्रशासक राजवट असून, निवडणुका कधी होणार याची वाट न पाहता भाजपने आपली तयारी सुरू केली आहे. आगामी महापालिका निवडणुकीत भाजप तरुणाईला संधी देणार असून, वय वर्ष पंचावन्न झालेल्या माजी नगरसेवकांनी मार्गदर्शकाची भूमिका घ्यावी, असे आवाहन भाजप संघटन मंत्री रवि अनासपुरे यांनी केले. अनासपुरे यांच्या या भूमिकेमुळे ज्येष्ठ नगरसेवकांमध्ये मात्र अस्वस्थता पसरल्याचे समजते आहे.

नाशिक पूर्व मतदारसंघात येणाऱ्या नाशिकरोड व पंचवटी विभागातील भाजप पदाधिकाऱ्यांची म्हसरुळ परिसरात नुकतीच बैठक झाली. यावेळी अनासपुरे यांनी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे विधान करताना तरुणाईला अधिक संधी देण्याचे संकेत त्यांनी दिले. परंतु ही भूमिका ज्येष्ठ नगरसेवकांना कितपत पचनी पडेल, हे पुढच्या काही दिवसांत समजणार आहे. दुसरीकडे पक्षाने घेतलेल्या या निर्णयाचा भाजपातील युवा पदाधिकाऱ्यांकडून स्वागत होत आहे. गेल्या महापालिका निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवत ऐतिहासिक यश मिळवले होते. पाच वर्षे सत्ता उपभोगल्यानंतर तीन वर्षांपासून महापालिकेत प्रशासक राजवट आहे. परंतु आता पक्षाने तरुणाईला संधी द्यावी, अशी भावना वारंवार युवा पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जाते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप युवा पदाधिकाऱ्यांनी जिवाचे रान केले. आणि त्याचा फायदा पक्षाला झाला. सतरंज्या उचलण्याचे काम देण्यापेक्षा संधी द्यावी, अशी भावना शहरातील भाजपातील युवा पदाधिकारी, कार्यकर्त्यांची आहे. विधानसभेत भाजपात जोश संचारला असून, महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा सत्तेचे स्वप्न पडू लागली आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तीनही विधानसभांवर भाजपने दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे भाजप पदाधिकाऱ्यांचा कमालीचा आत्मविश्वास असून, महापालिका निवडणूक स्वबळावरच घेण्याची मागणी होत आहे.

भाजपने तरुणाईवर लक्ष केंद्रित केले असून, महापालिकेत जास्तीत जास्त युवा पदाधिकाऱ्यांनाच उमेदवारीत प्राधान्य देणार असल्याचे समजते आहे. नाशिकरोड व पंचवटी या दोन्ही विभागांत भाजपची ताकद असून, या दोन्ही विभागात ज्येष्ठ नगरसेवक गेल्या वेळी निवडून आले आहेत. मात्र, आगामी निवडणुकीत पक्षाने वयाचे कारण देऊन त्यांना थांबवले जाऊ शकते. संबंधित ज्येष्ठांना उमेदवारी नाकारल्यास ते काय भूमिका घेणार, याकडे लक्ष असेल. मागील निवडणुकीत महापालिकेतील सत्ता मोदींच्या करिष्म्यावर व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमुळे आल्याचा दावा भाजप कार्यकर्ते करतात. त्यामुळे ज्येष्ठांना उमेदवारी नाकारल्यास पक्षाचे काहीएक नुकसान होणार नसल्याची भावना भाजपात आहे. मात्र जेथे पर्यायच नाही, तेथे पक्षाला ज्येष्ठ नगरसेवकाबाबत निर्णय घेऊ शकत नाही, असेही बोलले जात आहे.

## महत्त्वाचे



## गोवंश मांस विक्री करणारा सराईत जेरबंद

**पंचवटी : वार्ताहर**

गोवंश जनावरांची कत्तल करून मांस विक्री करणाऱ्या एका सराईतास जेरबंद करण्यात आले असून, त्याच्याकडून गोमांस आणि कार असा दोन लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हेशाखा युनिट एकने ही कामगिरी केली आहे. अवैधरीत्या गोमांस वाहतूक करणारे व विकत घेणाऱ्यांवर कारवाईच्या सूचना पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिल्या होत्या. त्याअनुषंगाने (दि.१८) गुन्हेशाखा युनिट एकचे पोलिस अंमलदार राम बर्डे व राहुल पालखेडे यांना मिळालेल्या माहितीनुसार स्विफ्ट कारमध्ये गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल केलेले मांस गाडीमध्ये विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांना माहिती देऊन त्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यावरून पोलिस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, हवालदार महेश साळुंके, पोलिस अंमलदार विलास चारोस्कर यांच्या पथकाने भद्रकाली नाशिक येथे सापळा रचून स्वीप्ट कार (एम.एच. ०४-डी. एन. ३११६) या गाडीतील अमीर असद कुरेशी (२९ रा. कादरी मशीदजवळ, मुगलपुरा, संगमनेर) यास पकडले असता त्याच्या ताब्यातून ४०० किलो गोवंश जनावरांचे मांस मिळून आले. गोमांस संगमनेर येथून नाशिक शहरातील नटू चौधरी, रा. बागवानपुरा, भद्रकाली, नाशिक यांना देण्यात येणार होते. सुमारे ४००० किलो वजनाचे गोमांस व स्विप्ट कार असा एकूण २ लाख ८० रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. अमीर असद कुरेशी याच्या विरोधात भद्रकाली पोलिस स्टेशन, संगमनेर शहर, मुंबई नाका पोलिस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल आहेत.

## शिंदे गावात आरोग्य शिबिर



**शिंदे : प्रतिनिधी**

चैतन्य संस्था व सारथी महासंघ प्रेरित सहारा ग्रामीण महिला स्वय:सिद्ध संघ शिंदे व प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिरात थायरॉइड, सिकलसेल व रक्तातील सहा तपासण्या करण्यात आल्या. शिबिराचे आयोजन सहारा संघाच्या मॅनेजर रामेश्वरी म्हस्के, कविता कर्डेल, आरोग्य अधिकारी नितीन बददे, प्रयोगशाळा वैज्ञानिक सार्थक रोकडे यांनी केले होते. यावेळी युनी डेरियंड लिमिटेड व संस्कृती स्वयंसेवा संस्था धारवाड यांच्या माध्यमातून मुली, महिलांना मोफत सॅनेटरी पॅडचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. वनश्री पलोड, प्रकल्प समन्वयक भारती बागूल, डॉ. सोनाली केकाणे, समुपदेशक ज्योती भट्टीवाल, मनीषा उघडे, वेदांत पांडे, आरोग्य केंद्रातील अश्विनी काळुंगे, वंदना साळवे, आरोग्यसेवक प्रतीक सोनवणे, आशा गट प्रवर्तक अरुणा आव्हाड, मनीषा साळवे, ललिता सोनवणे, ज्योती सोनवणे, संघाच्या अध्यक्षा आशा जाधव, सपना गांगुर्डे, सुमन शेलार यांच्यासह असंख्य महिला उपस्थित होत्या.

## शिंदे-भगूर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे : जाधव

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

शिंदे-भगूर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांनी केला आहे. या कामाचा दर्जा तत्काळ न सुधारल्यास ग्रामस्थ संबंधित कार्यालया समोर आंदोलन छेडतील असा इशाराही जाधव यांनी दिला आहे. नानेगाव, चिचोंले, पळसे फॅक्टरी ते शिंदे रस्ता (ग्रामा.१२० व ०३) भगूर जुना रस्त्याच्या कामासाठी तत्कालीन खा. हेमंत गोडसे यांनी अथक प्रयत्न करुन जवळपास २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करत प्रत्यक्ष कामाला देखील सुरुवात करण्यात आली असली तरी संबंधित में. आकार कन्स्ट्रक्शन, नाशिक या कंपनीने काम करताना रस्त्याचा कामाचा दर्जा हा शंभर टक्के घसरवला आहे.



रस्त्याच्या मधोमध असणारा डांबरीकरणाचा अगदी एखाद्या इंचाचा देखील थर नसावा कारण सहज हाताने निघत असल्याने कामाचा दर्जा लक्षात येत आहे.तर संबधितांना कामा संदर्भात विचारणा केली असता केवळ डांबर निघालेल्या भागावर मलमपट्टी करुन शिंदेकरांची बोळवण ठेकेदाराने केली आहे. त्यामुळे सदर कामाचे ऑडिट करूनच मे. आकार कन्स्ट्रक्शन नाशिक या संबंधित कंपनीला पेंमेट द्यावे, अन्यथा शिंदे ग्रामस्थ संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करतील, असा कणखर इशारा सरपंच बाजीराव जाधव यांनी दिला आहे.
शिंदे स्मशानभूमी पासून थेट नानेगाव चाफुली ते भगूर हा जुना रस्ता असून, या रस्त्याचे मजबुतीकरण व्हावे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले, मात्र तत्कालीन खासदार गोडसे यांनी देखील शिंदेकरांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करुन एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला खरा पण या रस्त्याच्या कामाला ठेकेदार केवळ आपल्याला अधिक पैसे शिल्लक कसे रहातील, असा विचारानेच त्यांनी रस्त्याची खडी व डांबरीकरणाचा थर हा अर्धा एक इंच घेतलेला असल्याने या रस्त्याच्या कामाचा दर्जा ढासाळला असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात संबंधितांशी विचारणा केली असता केवळ समोरून उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करत केवळ डांबर निघाल्याच्या जागेवर मलमपट्टी करून नागरिकांची बोळवण केली असल्याचे सरपंच जाधव यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# शहरातील रिक्षाचालक पोलिसांच्या रडारवर!

### पाच दिवसांत १२६६ जणांवर कारवाई

**पंचवटी : वार्ताहर**

**शालिमार येथील रिक्षाचालकाने एका कारचालकाबरोबर केलेल्या मुजोरीनंतर पोलिस यंत्रणा कामाला लागली आहे. पोलिसांनी गेल्या पाच दिवसांत विविध भागात मोहीम राबवत तब्बल १२६६ जणांवर कारवाई केली.**



शहरात काही रिक्षाचालकांची गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात मुजोरी वाढली आहे. प्रवाशांशी उद्धट बोलणे, वाहतुकीचे नियम न पाळणे, फ्रंट शीट वाहतूक करणे, मुदतबाह्य रिक्षा रस्त्यावर चालवणे, विनानंबर रिक्षा चालवणे, गणवेश परिधान न करता रिक्षा चालवणे अशा रिक्षाचालकांच्या विरोधात कारवाई सुरू केली आहे. दि.१३ ते १७ मार्चदरम्यान पोलिसांनी राबविलेल्या मोहिमेत १२६६ रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली.

पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली. शालिमार परिसरात एका रिक्षाचालकाने मुजोरी करत किरकोळ वादातून मारुती स्विफ्ट कार अडवून चालकाला शिवीगाळ करून दमदाटी करून वाहनाची ड्रायव्हर साइडची काच फोडण्याचा प्रकार घडून त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याची दखल घेत पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली.

त्यानंतर आता वाहतुकीचे नियम न पाळणे, फ्रंट शीट वाहतूक करणे, मुदतबाह्य रिक्षा रस्त्यावर चालवणे, विनानंबर रिक्षा चालवणे, गणवेश परिधान न करता रिक्षा चालवणे अशा रिक्षाचालकांविरुद्ध धडक मोहीम राबविण्यात आली. शहरातील चारही युनिटमध्ये कारवाई करण्यात आली.

| अशी झाली कारवाई | |
|---|---|
| फ्रंट शीट | ३६७ |
| विनानंबर रिक्षा | ८ |
| गणवेश नसणे | ७२२ |
| मुदतबाह्य रिक्षा | ८ |
| इतर | १६१ |
| एकूण | १२६६ रिक्षाचालक |



## जुन्या नाशकातील जुनी रहाड खुली करा

### ठाकरे गटाचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

जुन्या नाशकात अमरधाम रोडवरील शिवाजी चौकात ८५ वर्षांपूर्वीच्या रहाडीचा शोध लागला असून, बुधवारी (दि.१९ ) होणाऱ्या रंगपंचमीसाठी ही रहाड खोदून ती खेळण्यासाठी खुली करावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटातर्फे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नाशिक शहराला रहाडींचा जुना इतिहास आहे. जुन्या नाशकातील ही रहाड खूप जुनी असल्याने रंगपंचमी खेळण्यासाठी खोदकाम करून ती खुली करावी, अशी या परिसरातील नागरिकांची इच्छा आहे. त्यांच्या विनंतीचा आदर बाळगून ही रहाड खुली करावी, असे निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त कर्णिक यांना भेटलेल्या शिष्टमंडळात शिवसेना ठाकरे पक्षाचे उपनेते सुनील बागुल, राज्य संघटक विनायक पांडे, सहसंपर्कप्रमुख दत्ताजी गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, महानगर संघटक सचिन बांडे, शिवसेना पदाधिकारी दिलीप मोरे, गुलाब भोये, संजय परदेशी, ऋषी वर्मा, सुभाष शेजवळ, संदेश फुले, मसूद जिलानी, नी श्रलेश साळुंखे, सुनील जाधव, संजय चिंचोरे, ऋषी चौधरी, राजू राठोड, संतोष कहार, सुनील गोडसे, राजेंद्र वाकसरे, नीलेश कुसमुडे आदींचा समावेश होता.



## नरेंद्राचार्य महाराजांचा पादुका दर्शन सोहळा

### ७० विद्यार्थिनींना सायकल वाटप

**इंदिरानगर : प्रतिनिधी**

स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. जनम संस्थानच्या सामाजिक उपक्रमांतर्गत शालेय ७० गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी नाणीज धाम येथे पादुका पूजन कार्यक्रम दरवर्षी होत असतो. त्याच धर्तीवर नाशिकमध्ये देखील हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथे पादुका पूजनाचा सोहळा झाला.

पादुका पूजनाच्या कार्यक्रमाच्या अगोदर पादुकांची पंचवटी रामकुंड, मालेगाव स्टँड, रविवार करंजा, रेड क्रॉस सिग्नल, मेहेर सिग्नल, सीबीएस ठक्कर बाजार व अनंत कान्हेरे मैदान या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. शोभायात्रेत विविध प्रकारचे पथके सहभागी झाली होती. सोहळ्याच्या ठिकाणी पादुकांचे आगमन झाल्यानंतर तेथे प्रथम सिद्ध पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. जनम संस्थानाच्या वतीने शाळेत पायी जाणाऱ्या विद्यार्थिनींना सत्तर सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी भाविकांनी सुश्राव्य प्रवचनाचा लाभ घेतला. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार, महंत भक्तिचरणदास महाराज, महंत श्रीदास महाराज, भाजपा नेते लक्ष्मण सावजी, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, संस्थानाच्या संघटना विभागाचे उदय रानभरे उपस्थित होते.

## राष्ट्रवादी अजित पवार गटाची सभासद नोंदणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा तळागाळातील जनमाणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सभासद नोंदणीस शहरात सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष गायकवाड, ज्येष्ठ नेते राजेंद्र चव्हाण, माजी नगराध्यक्ष नामदेव लोंढे, युवकचे जिल्हा कार्याध्यक्ष आदित्य गव्हाणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष कदम, विधानसभा अध्यक्ष राजेंद्र घुमरे, शहरध्यक्ष सुभाष कुंभार, युवक तालुकाध्यक्ष योगेश आव्हाड उपस्थित होते.

## उपनद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी जनजागृती करा : खत्री

**नाशिक : प्रतिनिधी**

प्लास्टिक बंदीबाबत गोदावरी नदी व इतर नद्या किनारी गर्दीच्या ठिकाणी जनप्रबोधन करून नदीचे प्रदूषण रोखा यासाठी समितीने कामकाज करावे, असे निर्देश मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी दिले.





उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश तसेच विभागीय आयुक्त यांचे गोदावरी प्रदुषण नियंत्रणाबाबत दरमहा उपसमितीची आढावा बैठक घेण्यासाठी गोदावरी प्रदुषणाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारीबाबत निर्देशान्वये निर्देशानुसार बुधवारी (दि. १८) सकाळी ११.३० वाजता आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या दालनात बैठक झाली.

यावेळी उपसमितीच्या बैठकीत उपसमिती अध्यक्ष मनीषा खत्री, निरीचे प्रतिनिधी गोयल, दीपक चव्हाण, सहमाहिती उपसंचालक दीपक चव्हाण, अतिरिक्त आयुक्त प्रदिप चौधरी (शहर), स्मिता झगडे, अजित निकत , मयुर पाटील अधीक्षक यांत्रिकी अविनाश धनाइत, सुनीता कुमावत, प्र. उपआयुक्त गोदावरी संवर्धन कक्ष सुनीता कुमावत आदी उपस्थित होते. यावेळी मलनिस्सारणविषयक बाबी, एसटीपी प्लॅन्ट, डी-काँक्रिटीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, प्लास्टिक बंदी तसेच इतर नदी प्रदूषणासंदर्भातील विषयांवर चर्चा करण्यात आली. रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत सर्व शासकीय इमारती यांचा अहवाल आयुक्त खत्री यांनी मागविला. कार्यकारी अभियंता जितेंद्र पाटोळे, संदेश शिंदे, जनसंपर्क अधिकारी, योगेश कमोद, राजेश पालवे, कार्यकारी अभियंता नगर नियोजन विभाग तसेच अशासकीय सदस्य राजेश पंडित व निशिकांत पगारे हे उपस्थित होते.

## मुकुंदबुवा देवरस यांना कीर्तन शिरोमणी पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्राच्या उभारणीत कीर्तनकारांचा मोलाचा वाटा आहे. कीर्तनकार होते म्हणून देश संस्कारित झाला. आज युवापिढी धर्माकडे वळते आहे, हो किमया कीर्तनकारांमुळेच घडली आहे. समाजाला प्रेरणा देण्याचे काम कीर्तनकारांनी केले असल्याचे प्रतिपादन कैलास मठाचे मठाधिपती स्वामी संविदानंद सरस्वती यांनी केले.



**पहिला कीर्तनशिरोमणी पुरस्कार मुकुंदबुवा देवरस यांना प्रदान करताना स्वामी संविदानंद सरस्वती. शेजारी अन्य मान्यवर.**

अखिल भारतीय ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, समाज सहाय्यक संस्था व सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थांच्या वतीने देण्यात आलेल्या कीर्तनशिरोमणी पुरस्काराच्या वितरणप्रसंगी ते बोलत होते. या पुरस्काराचे वितरण स्वामी संविदानंद सरस्वती यांच्या हस्ते करण्यात आले. पहिला पुरस्कार नागपूरचे कीर्तनकार मुकुंदबुवा देवरस यांना प्रदान करण्यात आला. शाल, स्मृतिचिन्ह, १५ हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्रीकृष्णबुवा सिन्नरकर उर्फ कृष्णानंद भारती स्वामी महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी 'इस्कॉन'चे नृसिंह कृपादास प्रभु, आखाडा परिषदेचे मुख्य प्रवक्ते भक्तिचरणदास महाराज, कीर्तनकार चारुदत्त आफळे महाराज, 'सावाना'चे सुरेश गायधनी, वैद्य विक्रांत जाधव, सचिन पाडेकर, अनिल देशपांडे, प्रवीण कुलकर्णी यांच्यासह नाशिककर उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर चारुदत्त आफळे यांचे कीर्तन झाले.

सत्काराला उत्तर देताना मुकुंदबुवा देवरस म्हणाले, की आज कीर्तनात आमची चौथी पिढी आहे. वडिलांना साथ करीत असताना कीर्तनकार झालो. समाजाने कीर्तनकार जगवला हे मी पाहिले आहे. पूर्वी पैसा कमी मिळायचा. मात्र, सहा महिने पुरेल इतके धान्य मिळायचे. आता मात्र उलट झाले आहे. आजचा सत्कार ही माझ्या घराण्याची पुण्याई असल्याचे समजतो.

# नाशिक बाजार समिती सभापतिपदाची आज निवडणूक

### शिवाजी चुंभळे यांचे नाव निश्चित; सहलीसाठी गेलेले संचालक नाशकात

**पंचवटी : वार्ताहर**



**नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवीदास पिंगळे यांच्यावर अविश्वास ठराव दाखल केल्यानंतर अविश्वास ठराव १५/० ने मंजूर करण्यात आला. त्यानंतर पुन्हा शिवाजी चुंभळे यांच्यासमवेत गेलेले संचालक सहलीवर पाठविण्यात आले. आज बुधवार (दि.१९ ) रोजी सभापतिपदाची निवडणूक होणार असून, सभापतिपदासाठी माजी शिवाजी चुंभळे की कल्पना चुंभळे यांच्या नावाची जोरदार चर्चा होत असून, जवळपास शिवाजी चुंभळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, सहलीवर गेलेले संचालक मंगळवारी (दि.१८) दुपारी नाशिकमध्ये दाखल झाले असून, आज सकाळी ११ वाजता थेट बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत दाखल होणार आहे.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवीदास पिंगळे हे बाजार समितीत मनमानी पद्धतीने कामकाज करत असल्याच्या कारणावरून पिंगळे यांच्या पॅनलमधून निवडून आलेल्या संचालकांनी माजी सभापती शिवाजी चुंभळे यांच्या नेतृत्वाखाली १५ संचालकांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे सोमवार (दि.३) रोजी अविश्वास ठराव दाखल केला होता. त्याअनुषंगाने मंगळवार (दि.११) रोजी बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत झालेल्या विशेष सभेत देवीदास पिंगळे यांच्याविरोधात १५ संचालकांनी हात वर करून मतदान करून त्यांच्या विरोधातील ठराव मंजूर केला. आज बुधवार (दि.१९ ) रोजी बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत सकाळी ११ वाजता प्राधिकृत अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली व बाजार समितीचे सचिव प्रकाश घोलप यांच्या उपस्थितीत सभापतिपदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवीदास पिंगळे यांच्याविरोधात जाऊन माजी सभापती शिवाजी चुंभळे यांच्या सोबत गेलेल्या संचालकांना खबरदारी म्हणून चुंभळे यांनी अविश्वास ठराव दाखल केल्यानंतर पुन्हा सहलीवर पाठवण्यात आले होते. दरम्यान, महिनाभरात दुसऱ्यांदा सहलीवर गेलेले संचालक सभापती निवडीसाठी मंगळवार दि.१८ रोजी दुपारी नाशिकमध्ये दाखल झाले होते. आज सभापती निवडणूक ११ वाजता असल्याने सर्वच्या सर्व १५ संचालक सकाळी बाजार समितीत दाखल होणार आहेत.

### कल्पना चुंभळे यांनाही संधीची शक्यता

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीत आता सत्ता बदल घडत असून, कल्पना चुंभळे या पहिल्यांदाच बाजार समितीत निवडून आल्या आहेत. नाशिक बाजार समितीत आजपर्यंत एकाही महिला संचालकाच्या गळ्यात सभापतिपदाची माळ पडली नाही. तर आजपर्यंत केवळ उपसभापतिपदावर संधी मिळाली होती. परंतु माजी सभापती शिवाजी चुंभळे यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीत सत्तांतर घडत असल्याने कल्पना चुंभळे यांच्या रूपाने येणाऱ्या काळात महिला सभापतिपदाची माळ पडण्याची शक्यता आहे.

### प्रत्येक संचालकाला पदाची शक्यता

सभापती देवीदास पिंगळे यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून गेलेल्या संचालकांची मोट बांधण्यात माजी सभापती शिवाजी चुंभळे यांनी यशस्वी प्रयत्न केले आणि ते प्रत्यक्षात यशस्वी देखील झाले आहेत. चुंभळे यांच्या पॅनलमधून निवडून आलेले संचालक कल्पना चुंभळे, राजाराम धनवटे, प्रल्हाद काकड, धनाजी पाटील, तानाजी करंजकर या संचालकांसह पिंगळे यांच्या गटातून निवडून आलेले ज्येष्ठ संचालक संपतराव सकाळे, उपसभापती विनायक माळेकर, युवराज कोठुळे, भास्कर गावित, जगन्नाथ कटाळे, सविता तुंगार, चंद्रकांत निकम, जगदीश अपसुंदे, संदीप पाटील यांनाही येणाऱ्या काळात पद मिळण्याची शक्यता आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, बुधवार, दि. १९ मार्च २०२५



◀◀ गोदावरी पाणी फेरतपासणी करून अहवाल द्या ◀◀ पान ६

▶▶ औरंगजेबाच्या कबरीविरोधात बजरंग दल आक्रमक! ▶▶ पान ६



# सिंहस्थासाठी नवीन घाटांची निर्मिती

## सिंहस्थ बैठक : विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांची माहिती

**नाशिक : प्रतिनिधी**


**सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेता नदीकिनारी नवीन घाटांची निर्मिती केली जाणार असल्याचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी सांगितले.**

यात नंदिनी संगम, दसक पंचक वरच्या बाजूला, आनंदवलीजवळ, कपिला संगम येथे नवीन घाटांची निर्मिती केली जाणार आहे. सिंहस्थाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी मंगळवारी (दि.२८) संबंधित विविध विभागांची बैठक घेतली. यावेळी सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

वाहनांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने वाहनतळांची संख्या आणि क्षेत्रफळ वाढविले आहे. नाशिक धुळे, नाशिक छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक पुणे या रोडवर ४० ते ७० हेक्टर दरम्यान वाहनतळांचे क्षेत्रफळ तयार करण्यात येणार आहे. यासाठी अगोदरच्या आराखड्यात बदल करून वाहनतळाचे क्षेत्र वाढविण्यात आले असून, वाहनतळांची संख्याही वाढविण्यात येणार आहे. यासाठी सा. बां. विभागाने तयार केलेल्या आराखड्याची तपासणी पोलीस विभाग करणार आहे, अशी माहिती विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी दिली. पोलिसांनी २० हजार लोकांच्या निवासाचा आराखडा तयार केला असून, शहरात सिंहस्थाच्या नियोजनासाठी येणाऱ्या यंत्रणांच्या निवासासाठी ही व्यवस्था करण्यात येईल. यासाठी अस्तित्वातले शासकीय निवासस्थाने, मंगल कार्यालये, गेस्ट हाऊस यांची यादी तयार करण्यात आली आहे. या आराखड्याचीही डिजिटल पाहणी करण्यात आल्याचे आयुक्त गेडाम यांनी सांगितले. प्रयागराजच्या धर्तीवर पोलीस आणि स्मार्टसिटीने मिळून सीसीटीव्ही आणि पब्लिक ॲड्रेस सिस्टिमचा आराखडा अंतिम केला आहे. जलसिंचन विभागाला अतिरिक्त घाट तयार करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जलसिंचन विभागाने त्र्यंबकपासून ओढ्यापर्यंत ७ जागा जलसिंचन विभागाने शोधल्या असून, गुरुवारी या जागांची पाहणी करण्यात येईल.

प्रयागराजच्या धर्तीवर पोलीस विभागाने २० हजार लोकांच्या निवासाचा आराखडा तयार केला आहे. घाटांची संख्या वाढविण्यासाठी जलसंपदा विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. साधुग्रामची जागा कमी पडण्याची शक्यता असल्याने आरक्षण असलेली जागा सोडून इतर जागा भाड्याने घेता येईल का, याचीही चाचपणी करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात साधुग्रामसाठी सध्या शंभर ते सव्वाशे एकर जागा असून, याशिवाय अतिरिक्त पावणेचारशे ते चारशे एकरची गरज पडणार आहे. ती शोधण्याचे आदेश महापालिका आणि जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. ही जागा तात्पुरत्या स्वरूपात भाड्याने घेण्यात येईल. या जागेचा वापर भाविकग्रामसाठी करण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रयागराजमध्ये वायरलेस सिस्टिम वापरण्याची पद्धत होती. त्याच धर्तीवर नाशिकमध्ये पोलीस विभाग सोडून इतर विभागांसाठी वायरलेसचे युनिट किती लागतील याची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. फायर फायटिंग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, इलेक्ट्रिसिटी यांच्यावर ही जबाबदारी टाकण्यात आली असून, सर्व विभाग एकत्रिपणे ही संख्या ठरवतील.





### ४ हजार सीसीटीव्ही बसवणार

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर मिळून ४ हजार कॅमेऱ्यांची गरज पडण्याची शक्यता आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधील प्रत्येक रस्त्याच्या टप्प्याटप्प्यावर कॅमेरे बसविण्यात येणार आहे.

# सिंहस्थासाठी लॅण्ड बँक करा

## प्रवीण गेडाम यांचे मनपाला निर्देश

**नाशिक : प्रतिनिधी**



सिंहस्थासाठी येणारे भाविक आणि यंत्रणांमधील अधिकारी आणि कर्मचारी यांची संख्या बघता त्यांच्या निवासासाठी जागेचा शोध घ्यावा लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने विविध विभागांच्या मिळकती शोधून त्याची लॅण्ड बँक तयार करावी, असे आदेश विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत.

प्रयागराज येथे त्रिवेणी संगम असून, तो शहराबाहेर आहे. त्यामुळे तेथील प्रशासनाने येणाऱ्या सिंहस्थासाठी येणाऱ्या भाविकांची निवासव्यवस्था शहराच्या बाहेरील भागात केली होती. त्यामुळे शहराला अडचण आली नाही, मात्र नाशिकस्थित कुंभमेळा हा शहराच्या मध्यभागी असल्याने भाविक आणि यंत्रणांच्या निवासासाठी अतिरिक्त जागा पडल्यास प्लॅन बी तयार ठेवावा लागेल. यासाठी लॅण्ड बँक तयार करावी लागेल. लॅण्ड बँक तयार असल्यास साधुग्रामची जागा कमी पडल्यास प्लॅन बीप्रमाणे त्वरीत पर्यायी जागांचा वापर करता येईल. पर्यायी जागा तयार ठेवण्यासाठी महापालिकेला त्यांच्या मिळकती शोधून त्यांची लिस्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहे. अनेकवेळा आपल्याच मिळकती कुठे असतात हे महापालिकेला माहीत नसते. अशावेळी आतापासूनच मिळकती शोधून त्यांची यादी करावी व त्यांचे डिजिटल मॅपिंग तयार ठेवावे. जेणेकरून त्या जागा त्वरित वापरण्यात येतील, अशी माहिती विभागीय आयुक्त गेडाम यांनी दिली.

### त्र्यंबकेश्वरमध्ये १०० एकर जागा शोधणार

त्र्यंबकेश्वरमध्ये येणाऱ्या भाविकांची संख्या बघता त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकग्राम उभारणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला अतिरिक्त १०० एकर जागेचा शोध घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्र्यंबक मध्ये प्रयागराज तीर्थ जवळ ३५ एकर जागा निश्चित आहे.

## महत्त्वाचे


### अतिरिक्त आयुक्तपदी करिष्मा नायर

**नाशिक :** नाशिक



महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी करिष्मा नायर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पाश्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील जव्हार येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या संचालक व सहायक जिल्हाधिकारी म्हणून त्या कारभार पाहत होत्या. त्यांनी गटविकास अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, सहायक जिल्हाधिकारी आदी पदांवर काम केले आहे. दरम्यान, नायर यांच्या रूपाने महापालिकेला आता तिसरे अतिरिक्त आयुक्त मिळणार आहे. सिंहस्थ प्राधिकरणासाठीची तयारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आल्याची चर्चा मनपा अधिकारी वर्गात होती. नायर या २०२१ च्या आयएएस कॅडरच्या आहेत.

### दिनकर पाटील यांचा उद्या नागरी सत्कार



**नाशिक** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रदेश सरचिटणीसपदी दिनकर पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. यानिमित्ताने नाशिक शहर व जिल्ह्याच्या वतीने दिनकर पाटील यांचा नागरी सत्कार उद्या गुरुवार दि. २० रोजी दुपारी १२ वाजता कालिदास कलामंदिर येथे करण्यात येणार आहे.

या नागरी सत्कार सोहळ्यास राज्य पातळीवरील पदाधिकारी व नेते उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन ज्येष्ठ नेते डॉ. प्रदीप पवार, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, प्रदेश उपाध्यक्ष महिला सेना सुजाता डेरे यांनी केले आहे.

### जेडीसी बिटकोच्या कॅडेट्सना प्रमाणपत्र




**ओझर :** नाशिकरोड येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या जेडीसी बिटको इंग्लिश मीडियम हायस्कूलमधील 'एअर विंग एनसीसी'च्या यशस्वी कॅडेट्सना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक दावल नंदन, पर्यवेक्षक शशिकांत त्रिभुवन, यांच्या हस्ते ''ए -प्रमाणपत्र'' परीक्षेतील उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी एन सी सी ऑफिसर देवेंद्र हातखंबकर, शिक्षक विलास बनगर उपस्थित होते. नंबर वन महाराष्ट्र एअर स्कॉड्रन एनसीसी मुंबई युनिटमार्फत जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या ''ए - प्रमाणपत्र'' परीक्षेत शाळेतील २३ कॅडेट्स सहभागी झाले होते. ही परीक्षा देण्यासाठी कॅडेट्सना दोन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. भविष्यातील शिक्षण आणि नोकरीच्या संधी यादृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या या परीक्षेत १९ कॅडेट्स ए- श्रेणीत तर ४ कॅडेट्स बी-श्रेणीत उत्तीर्ण झाले होते. सर्व यशस्वी कॅडेट्सचे शाळेतील सर्व सदस्य आणि व्यवस्थापन यांनी कौतुक केले आहे.

## बनवेगिरीला चाप : त्रयस्थ संस्थांकडून शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण

# सहा लाखांपैकी सव्वा लाख मालमत्तांची तपासणी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून शहरातील मालमत्तेचे त्रयस्थ संस्थेकडून सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. शहरात निवासी, बिगर निवासी औद्योगिक अशा ५ लाख ९६ हजार मालमत्ताधारकांपैकी १ लाख ३१ हजार ८१६ मालमत्तेचे सर्वेक्षण झाले आहे. शहरातील एकूण मालमत्ताधारकांपैकी किती जणांची महापालिकेकडे नोंद आहे, याची माहिती जमा करून वर्गवारी तयार केली जात आहे.

शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करून प्रत्येक मालमत्तेस युनिक आयडी दिला जाणार असून, अद्ययावत पद्धतीने मालमत्तेचे सर्वेक्षण केले जाणार आहे. सहाही विभागांत ब्लॉक तयार करून मालमत्तेच्या नोंदीची माहिती युनिक आयडी स्वरूपात पालिकेकडे कायमस्वरूपी संकलित असेल.

यापूर्वी शहरातील मालमत्तांचे २०१६-१७ साली कर संकलनने सर्वेक्षण केले आहे. त्यानंतर



मालमत्तेचे कधीही सर्वेक्षण झालेले नाही. दरम्यान, अनेक मालमत्ताधरकांची नोंद झालेली नाही.

काहींनी मालमत्तेची नोंद व्यावसायिक असूनही निवासी म्हणून नोंद केली आहे. असले प्रकारही या सर्वेक्षणातून येणार समोर येणार आहे. या सर्वेक्षणासाठी हवी असणारी पूर्वतयारी करूनच कामाला सुरुवात झाली आहे. तांत्रिकी बाबीकडे सर्वेक्षणात लक्ष दिले आहे. मोहिमेतील महत्त्वाची बाब म्हणजे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा मोठा उपयोग या कामासाठी केला जाणार आहे. त्यादृष्टीने प्लॅनिंग केले आहे. शहरात एकाचवेळी हे सर्वेक्षण न करता टप्प्याटप्प्याने काम हाती घेतले जाणार आहे.

त्यावेळी प्रत्येक विभागातील मालमत्ताची तपासणी करताना ब्लॉक निश्चित केली जाईल आणि त्या त्या ब्लॉकमधील प्रत्येक मालमत्ता धारकाच्या मालमत्तेला युनिक आयडी मिळेल. या सर्वेक्षणातून पालिकेच्या हाती नवीन नोंदीची आकडेवारी येईल. महत्त्वाचे म्हणजे या सर्वेक्षणातून शहरात किती मालमत्ता नव्या आहेत हे समजणार आहे. अशा मालमत्ताधारकांना नोटीस देऊन त्यांची रीतसर नोंदणी केली जाईल.

अनेक जणांनी निवासी मालमत्तांची नोंदणी करून व्यावसायिक वापर करत असल्याचे प्रकरणे सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधितांना त्यांच्या वापरानुसार कर लावण्यात येईल.

### मालमत्ताधारकांची अशी असेल माहिती

मालमत्तांचे सर्वेक्षण करताना पालिका आपल्याकडे संबंधित प्रॉपर्टीधारकाचा इमेल आयडी, शिवार, पिन कोड, सर्व्हे नंबर, मालमत्ता पाहून दोन्ही बाजूचे फोटो, हाउस इंडेक्स नंबर, मोबाइल नंबर, जीपीस लोकेशन, उतारा आदींची माहिती संकलित केली जाणार आहे. या माध्यमातून संपूर्ण शहरातील मालमत्ताधारकांची सखोल व परिपूर्ण माहिती पालिकेकडे असेल.

### या संस्थांकडे जबाबदारी

गेल्या पंचवीस वर्षांपासून महापालिकेत भरती न झाल्याने याचा फटका घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीवर झाला आहे. घरपट्टी, पाणीपट्टी बिल वेळेत मिळत नसल्याने याचा फटका वसुलीवर होत आहे. हे पाहता कर संकलन विभागाने आर्यन, ऋषीकेश व छत्रपती शिवाजी महाराज या संस्थांना मालमत्ता सर्वेक्षणाचे काम दिले आहे.

### व्हॉट्सॲपवर मिळणार सुविधा

प्रत्येक विभागासाठी युनिक आयडी असेल. त्यासाठी महापालिकेचा एक व्हॉट्सॲप ग्रुप असेल. त्यात ज्या ग्राहकांचे मोबाइल क्रमांक असतील त्यांना नगररचना, करसंकलन विभाग, घनकचरा, नगररचना, उद्यान, ड्रेनेज अशा बारा विभागांची लिस्ट मोबाइलवर येईल. नागरिकांना संबंधित विभागाशी काम असेल त्यांना त्या विभागावर क्लिक करून सुविधा मिळवता येणार आहे.

> शहरातील सर्व मालमत्ता चे सर्वेक्षण सुरू झाले असून यामध्ये ज्यानी आतापर्यंत मालमत्तेची नोंद केली नव्हती. त्यांची नोंद या सर्वेक्षणात होणार आहे.
>
> **-अजित निकित,** उपायुक्त कर, विभाग, मनपा



# सिन्नरला ७७ दिव्यांगांना अंत्योदय शिधापत्रिकेचे वितरण

**सिन्नर : प्रतिनिधी**

दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या तालुक्यातील ७७ दिव्यांग बांधवांना सिन्नर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या वतीने अंत्योदय शिधापत्रिकेचे वितरण करण्यात आले.

तहसीलदार सुरेंद्र देशमुख, पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे, पुरवठा निरीक्षक राजेंद्र पोळ, पुरवठा लिपिक सोनाली आहेर, मुरलीधर चौरे, प्रहारचे जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे, शशिकांत सावंत, अमोल वाजे, मेघा दराडे आदींसह मान्यवरांच्या उपस्थितीत या शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. तहसीलमधील पुरवठा विभागाच्या पुढाकारामुळे ७७ दिव्यांगांच्या कुटुंबातील सदस्यांना आता अंत्योदय शिधापत्रिकेवरील धान्यासह शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. प्रहारचे जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे यांनी यासाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे, तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांच्याकडे पाठपुरावा केला होता. याप्रसंगी प्रहारचे तालुकाध्यक्ष दौलत ढोली, नामदेव आडके, भगवान पगार, नंदू शिरसाठ, चंद्रकांत पवार, आनंद सातभाई, महेश भोसले, वैभव वेलजाळी, मालन आव्हाड, सिमाताई वाकळे, कविता खैरनार आदी उपस्थित होते.

# इतर मागासच्या जागा अतिरिक्त ठरणाऱ्या ठिकाणी आरक्षण सोडत

**नाशिक : प्रतिनिधी**

मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या तसेच चुकीच्या प्रभागरचनेमुळे निवडणूक न झालेल्या ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. समर्पित आयोगाच्या अहवालातील शिफारशींनुसार इतर मागास प्रवर्गाच्या रिक्त जागा अतिरिक्त ठरत असल्यास आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

जिल्ह्यातील १७८ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीत एकूण २६९ रिक्त जागा असून, त्यात थेट सरपंचांच्या चार जागा रिक्त आहेत. यात मागास प्रवर्गाच्या १७८ जागा आहेत.

मागास प्रवर्गाच्या रिक्त जागा समर्पित आयोगाच्या शिफारशींनुसार अतिरिक्त ठरत असल्यास त्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करण्यात याव्यात, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित ठेवावयाच्या जागा आरक्षण चक्रानुक्रमे फिरण्याच्या तत्वानुसार कोणत्या प्रभागात देय होतील ते निश्चित करण्यात यावे.

आवश्यकतेनुसार या जागांचे महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. या प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित होतील हे निश्चित करण्यात यावे.

सोडतीनंतर त्यानुसार महिलांसाठी सुधारित आरक्षण अधिसूचित करण्यात यावे, असे आदेश दिले आहेत.

### आरक्षण सोडत कार्यक्रम

१ सोडतीसाठी विशेष ग्रामसभेची सूचना – गुरुवार दिनांक २० मार्च

२ सर्वसाधारण जागा निश्चित करण्यासाठी सोडत– सोमवार दिनांक २४ मार्च

३ मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेत सुधारणा करून त्याबाबत योग्य ती सूचना व प्रसिद्धी – बुधवार दिनांक २६ मार्च.

### रिक्त जागा

| | | | |
|---|---|---|---|
| नाशिक | २२ | इगतपुरी | २९ |
| त्र्यंबकेश्वर | १४ | पेठ | १५ |
| सुरगाणा | १३ | दिंडोरी | २४ |
| कळवण | १४ | बागलाण | ५१ |
| देवळा | ३ | चांदवड | ८ |
| मालेगाव | १० | नांदगाव | ११ |
| येवला | १९ | निफाड | ८ |
| सिन्नर | २६५ | | |

# अधिकाऱ्याकडून दर महिन्याला भाजीपाला, कोंबडी, सूरमई मासे, बोंबलाची मागणी!

## मनपा कर्मचाऱ्याकडून आरोप



**नाशिक/सिडको : प्रतिनिधी**

महापालिकेचे अतिक्रमण उपायुक्त डॉ. मयूर पाटील दर महिन्याला दहा हजार रुपये, कोंबडी, बोंबील, सूरमई मासे, ताजी फळे व भाजीपाला मागत असल्याचा गंभीर आरोप सिडको विभागीय कार्यालयातील मनपा कर्मचारी राजेंद्र उगले यांनी केला आहे.

विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांच्यासमोर त्यांच्या दालनात उपायुक्त पाटील यांच्यावर हा आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, उगले या कर्मचाऱ्याची बदली करण्यात आल्याने हे आरोप केल्याचे उपायुक्त पाटील यांनी म्हटले आहे.

यावेळी उपायुक्त डॉ. मयूर पाटील हे कार्यालयात पोहोचले असता विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांच्या उपस्थितीत राजेंद्र उगले यांनी उपायुक्त डॉ. पाटील यांच्यावर पैसे व विविध वस्तूंची मागणी केल्याचा आरोप केला.

महापालिकेच्या सिडको विभागीय कार्यालयात नागरिकांकडून पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. मात्र, पहिल्यांदाच एका मनपा कर्मचाऱ्याने थेट वरिष्ठ अधिकाऱ्यावर पैसे मागितल्याचा आरोप केला आहे. महापालिकेतील काही अधिकारी आणि कर्मचारी नागरिकांकडून बेकायदेशीर पैसे घेत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही झाल्या होत्या. मात्र, आता एका कर्मचाऱ्यानेच थेट आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर आरोप केल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

उगले यांनी उपायुक्त डॉ. पाटील यांच्यासमोरच तुम्ही माझ्याकडून भाजीपाला मागत होतात. तसेच पैसेही घेत होतात, असे स्पष्टपणे सांगितल्याने उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि माध्यम प्रतिनिधी आश्चर्यचकित झाले. या संपूर्ण प्रकरणाची माहिती अंबड पोलीस ठाण्यात देण्यात आली असून, रात्री उशिरापर्यंत तक्रार नोंदवण्याचे काम सुरू होते.

> मनपा कर्मचारी राजेंद्र उगले यांनी माझ्यावर लावलेले आरोप हे खोटे आहेत. नागरिकांकडून त्यांच्या तक्रारी केल्या जात होत्या. आणि त्यांची बदली करण्याची मागणी केली होती. त्यामुळे मनात धरून त्यांनी माझ्यावर खोटे आरोप केले आहेत.
>
> **- डॉ. मयूर पाटील,** उपायुक्त, मनपा (अतिक्रमण)

> डॉ. मयूर पाटील यांनी माझ्यासमोर कुठलीही मागणी केलेली नाही तसेच ऐकलेही नाही. परंतु हे ऐकून माझ्या डोळ्यांत अश्रू आले. भाजीपाला व काही खाद्यपदार्थ तसेच पैशांची मागणी यासंदर्भात काहीही माहीत नाही.
>
> **- जयश्री बैरागी,** विभागीय अधिकारी, मनपा

नाशिक आज
# गांवकरी
■ नाशिक, बुधवार, दि. १९ मार्च २०२५



◀◀ महिंद्रा ॲग्रोने गाठला द्राक्ष निर्यातीचा मोठा टप्पा! ◀◀ पान ३



◀◀ राज्यात १३२ कारखान्यांची एफआरपी अद्याप बाकी ◀◀ पान ३

## महत्त्वाचे

### अहिल्यादेवी होळकर यांना शुक्रवारी सांस्कृतिक मानवंदना

**नाशिक : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाने सांगीतिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. परशुराम सायखेडकर नाट्यगृह, नाशिक येथे शुक्रवार, दि.२१ रोजी सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त या सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना ॲड. आशिष शेलार मंत्री सांस्कृतिक कार्य यांची असून, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून या कार्यक्रमाची निर्मिती झाली आहे. या कार्यक्रमात ख्यातनाम कलावंत सहभाग घेणार आहेत. या कलाकारांच्या कला सादरीकरणातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीला उजाळा देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

### डॉ. बापूराव हिरे यांना डॉक्टरेट



**नाशिक : प्रतिनिधी**

मोटिव्हेशन अकॅडमीचे संचालक डॉ. बापूराव हिरे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना फिलोसॉफीमध्ये डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) बहाल करण्यात आली. नाशिकच्या व्यक्तीची अमेरिकन विद्यापीठाने दखल घेतल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### केंद्रीय कर सहायकपदी गौरव धोंडगेंची निवड



**नाशिक : प्रतिनिधी**

पंचवटीतील धात्रक फाटा येथील गौरव धोंडगे केंद्रीय अर्थ मंत्रालयाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कर सहाय्यक पदाची परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे. गौरवने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल्स अँड टेलिकम्युनिकेशन पदवी घेतली आहे. गौरवचे वडील ज्ञानेश्वर धोंडगे हे खासगी शाळेच्या बसवर चालक तर आई घरकाम करते. मूळचे ते धोंडगेवाडी, ता. मालेगाव येथील आहेत.

### शलाका हिरे यांना पीएच.डी. प्रदान



**नाशिक : प्रतिनिधी**

येथील शलाका कैलास हिरे यांना सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे येथून सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग फॉर सेफ्टी हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्यांचे संशोधन लफबरो युनिव्हर्सिटी, यूके सोबतच्या सहकार्याने झाले. त्यांना भारतामधून डॉ. सायली सांडभोर आणि यूकेमधून डॉ. कीर्ती रूईकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





नाशिक : शहरात आज रंगपंचमी पारंपरिक उत्साहात साजरी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी रंगांसह पिचकारी विक्रेत्यांनी ठाण मांडले आहे. तर तरुणाईच्या आनंदाला उधाण आणणारे रेन डान्सिंगचे कारंजेही अनेक मंडळांकडून सज्ज करण्यात आले आहेत. तर चिमुकल्या मित्रांवर रंग उडवण्यासाठी बालगोपाळांनी पिचकारी खरेदीसाठी पालकांसह बाजारपेठही गाठली. (छायाचित्रे : रविकांत ताम्हणकर)

# आज रंगपंचमी

## रंगांची मुक्त उधळण करण्यासाठी सज्जता

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यभरात रंगपंचमीची धूम, विविध रंगांची उधळण करत आज आनंदोत्सव साजरा करण्यात येणार आहे. रंगपंचमीचा उत्साह आज सर्वत्र पाहायला मिळत असून, नाशिककरांसह अवघी तरुणाई रंगांची मुक्त उधळण करण्यासाठी सज्ज झाली आहे.**



धूलिवंदनापासून सुरू होणाऱ्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी पाच दिवस पूर्ण होतात. या पाचव्या दिवशी रंग खेळून रंगपंचमी साजरी केली जाते. रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण. रंगपंचमीच्या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून सण साजरा करतात. नाशिकमध्ये सकाळपासूनच रंगांची उधळण करण्यास प्रारंभ होणार आहे.

शहरात विविध ठिकाणी रेन डान्ससह पारंपरिक रहाडीमध्ये डुबक्या घेत गुलाबी होण्याचा आस्वाद घेण्यात येणार आहे.तर पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहनही अनेक संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात आले आहे. ठिकठिकाणी पोलिसांचाही बंदोबस्त आहे.

**येवल्यात रंगणार सामने**

येवला शहर म्हटले की, ऐतिहासिक अन् सांस्कृतिक तसेच धूमधडाक्यात सण-उत्सव साजरे करणारे शहर म्हणून ओळखले जाते. वर्षभरात येणारे सण मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येतात. शहरातील नागरिक मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरे करतात. त्यातच रंगपंचमीला सामने खेळण्याचीही अनेक वर्षांपासून ही परंपरा आहे. शहरात रंगपंचमी धूमधडाक्यात साजरी होते.

# टँकरचा फेरा यंदा चुकणार?

## मागील वर्षी ५० टँकर; ‘गंगापूर’मध्ये पुरेसा पाणीसाठा

**नाशिक : प्रतिनिधी**

वरुणराजाने यंदा नाशिकवर कृपादृष्टी ठेवल्याने जिल्ह्यातील धरण समूहात मार्चच्या मध्यानंतरही ६५ टक्के पाणी शिल्लक असून, तब्बल दोन वर्षांच्या अंतराने मार्च महिना टँकरमुक्त आहे. गंगापूर धरणातही ७३ टक्के पाणी शिल्लक असल्याने नाशिककरांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासणार नाही, असा प्रशासनाचा अंदाज आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत हा पाणीसाठा पुरेल. त्यामुळे कपातीची गरज पडणार नाही, असे सांगण्यात आले.

नाशिककरांची तहान भागविणाऱ्या गंगापूर धरणात सद्यस्थितीत ७३.२७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी मार्चच्या मध्यापर्यंत ५६.६१ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. अल निनोमुळे ऐन फेब्रुवारीच्या मध्यावरच चिंतेचे ढग जमा झाले होते.

यंदा मात्र गतवर्षीपेक्षा पाणीसाठा जास्त असल्याने पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे. गंगापूर धरण सर्वांत मोठे असून, काश्यपी, गौतमी गोदावरी मध्यम स्वरूपाचे, तर आळंदी नदीवरील मध्यम स्वरूपाचे आळंदी, अशी एकूण ४ धरणे आहेत. या चारही धरणांची एकूण १०,१६६ द.ल.घ.फू. साठवण क्षमता आहे. मागील वर्षी गंगापूर धरण समूहात एकूण ५६३४ द.ल.घ.फू. (६७.४९) पाणीसाठा शिल्लक होता. यंदा हाच पाणीसाठा ६५५५ द.ल.घ.फू. (६४.४८) इतका आहे.



**टँकरची संख्या घटली**

मागील वर्षी ३४८ गावे आणि ८७२ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा झाला होता. एकूण १ हजार २२० गाव-वाड्यांना ३७० टँकरच्या ८१४ फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. टँकर भरण्यासाठी तब्बल २१० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले होते. यंदा मात्र अशी परिस्थिती नसल्याने केवळ १४९ टँकरचेच नियोजन करण्यात आले. मार्च महिन्याच्या मध्यातही टँकरची मागणी नसल्याने महिनाअखेरपर्यंत त्याची मागणी होण्याची शक्यता नसल्याचे प्रशासनाने सांगितले.

**या गावांची भूजल पातळी घटली**

**बागलाण -९८, चांदवड -८६, देवळा - ४१, दिंडोरी-२८, इगतपुरी-१३, कळवण -७२, मालेगाव-५४, नांदगाव -२८, नाशिक -१८, निफाड - १११, सिन्नर-११८, येवला-१०९.**

# अतिक्रमणामुळे तरुणीचा अपघात

**वडाळागाव : प्रतिनिधी :**

गोविंदनगर येथील रस्त्यावर झालेल्या अपघातात शिक्षिका ठार झाल्याची घटना ताजी असतानाच, नुकतेच याच परिसरात एका तरुणीचा अपघात घडून त्यात ती गंभीर जखमी झाल्यामुळे पुन्हा गोविंदनगरचे अतिक्रमणने डोके वर काढल्याची चर्चा सुरू झाली आहे.



श्रुतिका देसाई या नाशिक शहर भाजप द्वारका मंडल अध्यक्ष सुनील देसाई यांच्या कन्या दि.१३ रोजी सकाळच्या सुमारास गोविंदनगर ते सिटी सेंटर मॉलकडे जात असताना दुकानांसमोरील गर्दीचा अंदाज न आल्याने त्यात त्यांचा अपघात झाला.

त्यांच्या चेहऱ्यास, हातास, डोक्यास मार लागला. सुदैवाने कोणतीही मोठी इजा झाली नाही. अपघातामुळे परिसरात अतिक्रमणने डोके वर काढले असून, आणखीन जीवितहानी होण्याची वाट अतिक्रमण विभाग पाहत आहे का, अशी चर्चा परिसरात सुरू झाली आहे.

# सफाई ठेकेदाराला पाचव्यांदा मुदतवाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

सफाई ठेक्याची (वॉटरग्रेस) मार्च अखेरीस मुदत संपुष्टात येत आहे. दरम्यान, या कामाची निविदा वेळेत होणार नसल्याने महापालिका प्रशासनाने पाचव्यांदा मुदतवाढ दिली आहे. ३१ मेपर्यंत विद्यमान ठेकेदाराकडे कामाची जबाबदारी असणार आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिका कायदेशीर सल्लामसलात अडकल्याचे चित्र आहे.

मनपाने ऐन विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागण्याअगोदर विशिष्ट ठेकेदाराला डोळ्यापुढे ठेवत १७६ कोटींच्या निविदेतील अटी-शर्तीत बदल केले. त्या विरोधात भाजप आमदारांनी आक्षेप घेत ही निविदा रद्द करावी, अशी मागणी केली होती. तसेच विद्यमान वॉटरग्रेस ठेकेदार न्यायालयात गेला होता. न्यायालयाने मनपाला फटकारत नेटवर्थ व अनुभव या अटी बदलण्याचे सुचविण्यात आले आहे. शहराचा आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता विद्यमान ठेकेदारास पुन्हा दोन महिने म्हणजे ३१ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. महासभेवर हा प्रस्ताव ठेवला जाणार आहे. नेटवर्थ म्हणजे ठेकेदाराची पत असून, ती सुमारे शंभर कोटी असली पाहिजे, असे मनपाने म्हटले होते. तर अनुभवाची अट देखील त्यात होती. मागच्या ठेक्याच्या प्रक्रियेत या दोन्ही अटी नव्हत्या.

वॉटरग्रेस सफाई कर्मचारी ठेका मागील मार्च महिन्यात संपुष्टात आला आहे. मात्र, त्यानंतर लोकसभा व शिक्षक मतदारसंघ निवडणुकांमुळे नव्याने निविदा प्रक्रिया राबवता आली नाही. त्यामुळे शहराच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता विद्यमान वॉटरग्रेस ठेकेदाराला मुदतवाढ देण्यात आली होती. आता न्यायालयाच्या आदेशानंतर मनपा कायदेशीर सल्ला घेणार असून, हे प्रकरण कायदा विभागाकडे पाठविण्यात आल्याने तेथून अभिप्राय मिळाल्यावर पुढील प्रक्रिया होणार आहे.

# निमा कौशल्य विकास, इन्क्युबेशन सेंटरसाठी प्रयत्नशील राहणार

## निमाच्या शिष्टमंडळास ना. लोढा यांचे आश्वासन

**नाशिक : प्रतिनिधी**

निमा हाऊस, सातपूर येथे कौशल्य विकास तथा इन्क्युबेशन सेंटर व्हावे यासाठी मंजुरी मिळावी म्हणून निमाचे अध्यक्ष आशिष नहार, खजिनदार राजेंद्र वडनेरे आणि स्टार्टअप अँड स्किल कमिटी चेअरमन श्रीकांत पाटील यांनी मंगलप्रभात लोढा यांची भेट घेऊन चर्चा केली.



निमा ही उत्तर महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक संस्था असून, नाशिक जिल्ह्यातील लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांचे प्रतिनिधित्व करते. येथील उद्योगांना विविध सुखसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निमा सदैव प्रयत्नशील असते.

कुशल मनुष्यबळ निर्माण करणे हा सध्या सर्व उद्योजकांसाठी कळीचा मुद्दा आहे, जेणेकरून जागतिक बाजारपेठेत आपले वैशिष्ट्य टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक उत्पादक प्रयत्न करीत असतो. त्याअनुषंगाने सदरचा उपक्रम हा महत्त्वाचा दुवा ठरू शकतो, असे निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी सदरची मागणी करताना मंगलप्रभात लोढा यांच्या निदर्शनास आणून दिले.

नुकताच निमा, राज्य सरकारच्या कौशल्य विकास विभाग व सपट इंजिनिअरिंग कॉलेजसह विविध इंजिनिअरिंग कॉलेज, औद्योगिक संस्था मिळून यशस्वी झालेल्या उत्तर महाराष्ट्रातील इग्नास्टिंग इनोव्हेशन या दोनदिवसीय कार्यशाळेची माहिती ना. मंगलप्रभात लोढा यांना दिली.

नाशिकमध्ये अनेक इंजिनिअरिंग कॉलेज देखील सदर विषयात आग्रही असल्याचे त्यांना सांगितले. ना. लोढा यांनी पुढील आठवड्यात मुंबई येथे सविस्तर प्रस्ताव सादर करण्यास सांगितले व योग्य ते सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, ना. मंगलप्रभात लोढा यांनी शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा केली. निमाच्या मागण्या मान्य करून त्यावर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासनही दिले. त्यामुळे आगामी काळात औद्योगिक विकासास चालना मिळणार आहे.



# अनुदानित आश्रमशाळा नोकर भरतीचा अहवाल सादर करा

## आदिवासी विकासमंत्री डॉ. ऊईकेंचे निर्देश

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभाग आणि अनुदानित आश्रमशाळा हे एक कुटुंब आहे. या दोघांनी एकत्र येऊन आदिवासी आश्रमशाळांचे समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा. अनुदानित आदिवासी आश्रमशाळा या दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करतात. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमधील संचमान्यता करून नोकरभरती सुरू करण्याच्या अनुषंगाने सविस्तर तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक ऊईके यांनी प्रशासनाला दिले.

अनुदानित आदिवासी आश्रमशाळांच्या अडचणीसंदर्भात संस्थाचालकांनी मंगळवारी (दि.१८) डॉ. ऊईके यांची भेट घेऊन संवाद साधला. यावेळी आमदार संजय पुरम, बाळासाहेब मांगुडकर, माजी आमदार अपूर्व हिरे, वैभव पिचड, आनंद ठाकूर, शिवराम झोले, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांच्यासह अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संघटनेचे पदाधिकारी व संस्थाचालक उपस्थित होते.

**या विषयांवर झाली चर्चा**

अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना देण्यात येणारे अनुदान विद्यार्थी संख्येनुसार देण्यात यावे. गेल्या अनेक वर्षांपासून अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक भरती बंद असून, ही भरती पुन्हा सुरू करावी. टप्प्याटप्प्याने देण्यात येणारे अनुदान वेळेत देण्यात यावे. संचमान्यता असलेल्या व पदे मंजूर असलेल्या ठिकाणी शिक्षकांना मान्यता मिळावी, अशा विविध विषयांवर चर्चा झाली.

आकस्मिक खर्चाचे अनुदानाचे टप्पे वेळेत देण्यात यावेत. संस्थाचालकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात येतील. संस्थाचालकांना योग्य तो न्याय देऊ, असेही मंत्री डॉ. ऊईक यांनी सांगितले. दरम्यान, अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील संचमान्यता करून शिक्षक भरती तातडीने सुरू करावी, अनुदानाचे टप्पे वेळेत द्यावेत आदी मागण्यांचे निवेदन संस्थाचालकांनी ना. ऊईके यांच्याकडे यावेळी सादर करत साकडे घातले.

# रामलल्लाच्या दर्शनाला साडेसातशे ज्येष्ठ नागरिक रवाना!

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना : ‘जय श्रीराम’च्या घोषणांनी रेल्वे स्थानक दुमदुमले

**नाशिक : प्रतिनिधी**

**शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत जिल्ह्यातील ७५० हून अधिक ज्येष्ठ नागरिक काल अयोध्येला रामलल्लाच्या दर्शनाला रवाना झाले. एकूण आठशे जणांचे अर्ज आले होते. त्यातून साडेसातशे जणांची निवड करण्यात आली. जिल्ह्यातून या योजनेंतर्गत ही पहिलीच रेल्वे आहे.**




- **प्लॅटफॉर्मवर रेड कार्पेट**
- **रेल्वेला आकर्षक सजावट**
- **राम, लक्ष्मण, सीता, हनुमानाची वेशभूषा केलेले पात्र ठरले आकर्षण.**
- **प्रत्येक यात्रेकरूला ओळखपत्र**
- **प्लॅटफॉर्म क्रमांक चारवर यात्रेचे स्वरूप**

या विशेष रेल्वे गाडीला समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, सहायक आयुक्त देवीदास नांदगावकर, रेल्वे स्टेशनचे प्रबंधक मनोज कुमार श्रीवास्तव, तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी यांनी हिरवा झेंडा दाखवून गाडी रवाना झाली. तत्पूर्वी समाजकल्याण विभागातर्फे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी अयोध्येला जाणाऱ्या भाविकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान केला.

नाशिकरोड रेल्वे स्थानकावरील प्लॅटफार्म चारवर ही विशेष रेल्वे उभी करण्यात आली होती.

## संपादकीय

# शांतता नांदली पाहिजे



तिथीनुसार असलेल्या शिवजयंतीच्या दिवशी नागपूरमध्ये झालेली दंगल औरंगजेबाच्या कबरीवरुन झाली असल्याचे दिसत असले, तरी ही दंगल अफवेमुळेही झाली असल्याचेही दिसत आहे. इतकी वर्षे कबरीला विरोध झाला नाही किंवा ती घडविण्याची मागणी करण्यात येत नव्हती. ती आताच का केली जात आहे? हा प्रश्न आहे. अलीकडच्या काही घटना त्यामागे आहेत. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर खरा इतिहास लोकांसमोर आला. राज्यामध्ये लोकांच्या भावना प्रज्वलित झालेल्या आहेत. औरंगजेबाबद्दलचा रागही खूप मोठ्या प्रमाणात बाहेर येत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दंगलीवर विधानसभेत निवेदन करताना सांगितले. छावा प्रदर्शित झाल्यानंतर समाजवादी पक्षाचे आमदार अबु आझमी यांनी औरंगजेबाची विधानसभेत स्तुती केल्याचा आरोप झाला. संभाजी महाराजांना क्रूरपणे ठार मारणाऱ्या औरंगजेबाची स्तुती सहन होऊ शकत नाही. हे आझमींनी लक्षात घेतले नाही. यावरुन त्यांना विधानसभेतून निलंबितही करण्यात आले. निलंबनानंतर त्यांनी आपले विधान मागेही घेतले. तरीही काही फरक पडलेला नाही. शिवाजी महाराजांचे वंशज आणि भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनीही कबर काढून टाकण्याची मागणी केली होती. औरंगजेबाविषयी राज्यातील सत्ताधारी पक्षांमध्ये तीव्र राग आहे, हे दिसून आले आहे. संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे औरंगजेबाची कबर काढून टाकण्याची मागणी जोर धरत असली, तरी ती काढता येत नाही, ही राज्य सरकार आणि सत्ताधारी पक्षांची मजबुरी आहे. भारतीय पुरातत्व विभागाने या कबरीला ५० वर्षांपूर्वी संरक्षित स्थळ म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे कबरीचे संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारची आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलेले आहे. गेल्या आठवड्यात हिंदुत्ववादी संघटनांनी कबर उखडून टाकण्याची तयारीही केली होती. मात्र, राज्य सरकारला मोठा फौजफाटा कबरीच्या ठिकाणी तैनात करावा लागला आणि प्रतिबंधात्मक कारवाई करावी लागली. ज्या औरंगजेबाने आमच्या हजारो लोकांना मारले, दुर्दैवाने त्याच्याच कबरीचे संरक्षण आम्हाला करावे लागत आहे, अशी खंतही फडणवीस यांनी व्यक्त केली होती. तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्ताने भिवंडीत पहिल्या शिवमंदिराचे लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी कबरीचे संरक्षण करावे लागत असल्याची खंत व्यक्त केली. पण, औरंगजेबाच्या कबरीचे महिमामंडन होऊ दिले जाणार नाही, तर छत्रपती शिवरायांच्या मंदिराचे होईल, असे ते म्हणाले. कबरीचे उदात्तीकरण होऊ देणार नाही. उदात्तीकरण करण्याचा कुणी प्रयत्न करत असेल, तर त्याचा प्रयत्न चिरडून टाकण्याचे काम आम्ही करू, असा स्पष्ट इशाराही फडणवीस यांनी दिला होता. दुसरीकडे त्यांच्याच नागपूरमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. नागपुरातील महाल परिसरात सकाळी साडेअकरा वाजता विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी 'औरंगजेबाची कबर हटाव' असे नारे देत त्यांनी गवताच्या पेंढ्यांनी बनवलेली प्रतिकात्मक कबर जाळली. नंतर गणेशपेठ पोलिसांनी आंदोलकांवर संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल केले. पण संध्याकाळी अफवा पसरवण्यात आली की, सकाळच्या आंदोलनात जी प्रतिकात्मक कबर जाळली, त्याच्या कापडावर धार्मिक मजकूर होता. जमाव जमला आणि वातावरण हिंसक झाले, त्यानंतर पोलिसांना लाठीमार करावा लागला, असे मुख्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेने कबर हटविण्याची मागणी केलेली आहे. खुलताबाद येथील कबर उखडून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न पोलिस बंदोबस्तामुळे यशस्वी झाला नाही. या संघटनांनी शिवजयंतीच्या दिवशी सकाळीच आपल्या मागण्यांसाठी आंदोलन सुरू केल्याने तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी या आंदोलनाची वेळीच दखल घ्यायला पाहिजे होती. प्रतिकात्मक कबर जाळली जात असताना एक चादरही जाळण्यात आली. आम्ही चादर जाळली, पण त्यावर 'आयत' नव्हती, असे स्पष्टीकरण विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले आहे. आम्ही कोणत्याही धर्माच्या कपड्यांना आग लावली नाही. आम्ही फक्त कपड्यांना आग लावली, असाही दावा परिषदेने केला आहे. आगीत हिरव्या रंगाची चादर देखील टाकण्यात आल्याचे एका व्हिडिओमध्ये दिसून येत असल्याने परिषदेचा दावा खरा मानायचा की खोटा? हा प्रश्न उपस्थित झाला. आपल्याकडे धार्मिक रंगांना महत्व आहे. विशिष्ट रंगाचे कापड जाळण्यात येत असेल, तर विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्या जातात आणि अफवांना पीक येत असते. हेच कारण नागपूर दंगलीमागे असल्याचे दिसून येत आहे. दंगल पूर्वनियोजित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत केलेल्या निवेदनात म्हटले आहे. सकाळची घटना घडल्यानंतर शांतता होती. त्यानंतर काही लोकांनी जाणीवपूर्वक हल्ला केला. घटनास्थळी एक ट्रॉली भरुन दगड मिळाले. शस्त्रही मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आली. ठरवून काही घरांना आणि आस्थापनांना लक्ष्य करण्यात आले. यामागे काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न दिसत आहे. अशा लोकांवर कारवाई केलीच जाईल, असे फडणवीस म्हणाले. दंगल घडवून आणण्याचा कट असेल, तर त्याचा सुगावा पोलिसांना लागला पाहिजे होता. पोलिसांनी 'त्या' भागात जाण्याचे टाळले असावे. पण, जेव्हा गेले तेव्हा त्यांनाच जमावाशी संघर्ष करावा लागला. यामध्ये तीन पोलिस उपायुक्तांसह ३३ पोलिस जखमी झाले. ही माहितीही फडणवीस यांनीच दिली. कोणीही दंगा करण्याचा प्रयत्न केला, तर जात, धर्म न पाहता कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी देऊन राज्यात शांतता निर्माण होईल, या दिशेने पाऊल उचलले आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्याची आपली सर्वांची जबाबदारी असली, तरी ती पोलिसांची आहे. सर्व समाजांचे धार्मिक सण सुरू आहेत. सध्या रमजानचा महिना सुरू आहे. गुढीपाडवा येत आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची तयारी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था कशी राखता येईल, एकमेकांप्रति आदरभाव कसा राखता येईल, शांतता कशी नांदेल असा प्रयत्न सर्वांनी करावा, हाच फडणवीस यांचा प्रयत्न आहे. नागपूर दंगलीचे लोण महाराष्ट्रात पसरणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी सर्वांची असली, तरी ती सरकारची सर्वाधिक आहे. सरकारने विशेष दक्षता घेतली पाहिजे. राजकारण म्हणून विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करणे स्वाभाविक असले, तरी राज्यात शांतता प्रस्थापित होण्यासाठी विरोधकांनी सरकारला सहकार्य करणे अपेक्षित आहे.

## विचारधन

# प्रपंचात प्रेमभाव कसा वाढेल?



निसर्गत:च प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेम जडते; विरुद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो, तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे आणि प्रेम जडण्याकरिता सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरुवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी आणि त्यानंतर आजूबाजूला आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. ज्याला भगवंताचे प्रेम येईल तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील.

# चिमण्यांचा चिवचिवाट हरवलाय

**'चिऊताई, चिऊताई दार उघड!'सारख्या बडबडगीतांमध्ये, लोककथामध्ये सर्वत्र आढळणारी चिवचिव चिमणी गेली कुठे? असा प्रश्न जगभरातील पर्यावरणप्रेमींना पडला आहे. कारखान्यातल्या चिमणीचे भकभक धूर ओकणे प्रमाणाबाहेर वाढले आणि अंगणातली चिमणी दिशेनाशी होऊ लागली. पुढच्या पिढीला चिमणी फक्त चित्रांमध्येच दिसणार की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. परिणामी, २०१० सालापासून २० मार्च हा वर्ल्ड स्पॅरो डे जागतिक चिमणी दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे.**

**चिमणी दिन**

**प्रा. अमोल अहिरे**
**९९२१९७६४२२**



चिमण्यांच्या चिवचिवाटाने सुरू होणारा दिवस शहरातच काय पण ग्रामीण भागातदेखील अलीकडे फारसा अनुभवता येत नाही. चिमण्यांच्या चिवचिवाटामुळे आपल्याला एक आल्हाददायक वातावरणाचा अनुभव येत असतो. परंतु आज त्या चिमण्या या जगातूनच गायब होण्याच्या मार्गावर आहेत. आपण लहानपणी चिमण्यांची गोष्ट ऐकली असेलच. गोष्टीतल्या चिऊ-ताऊविषयी आपुलकी आणि प्रेम वाटू लागते. साधारण १४ ते १६ सेंटिमीटर असलेली नाजूकशी चिमणी आपल्याला नक्कीच आकर्षित करत असते. चिमणी आपल्या सगळ्यांच्या परिचयाची. कदाचित अतिपरिचयाची. आज चिमण्यांची संख्या कमी झालेली दिसते. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वांत जास्त संख्येने सापडणारा पक्षी म्हणजे चिमणी. विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु आता तिच्यासाठी अंगण नाही, झाडं नाहीत, वळचणी नाहीत आणि आपल्या घरांमध्ये तिच्या घरट्यासाठी छोटीशी जागाही नाही. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात चिमण्या मारण्याचे अभियान सुरू झाले होते, परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहणारे धोके लक्षात आले. चिमण्यांची घटती संख्या मानवासाठी अधिक धोकादायक आहे. गेल्या पाच वर्षांत पक्ष्यांच्या संख्येत तब्बल ७९ टक्के घट झाल्याचे तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे. त्यातही कीटकभक्षी असलेल्या चिमणीसारख्या पक्ष्यांची संख्या कमी होणे, हे मानवासाठी धोकादायक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. त्यानंतर जगभरातील तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती चिमणी जगायला हवी याची जाणीव होऊन २०१० पासून २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो.

भारतात नाशिक येथील नेचर फॉरएव्हर सोसायटीचे संस्थापक आणि निसर्गरक्षक मोहम्मद दिलावर आणि फ्रान्समधील इकोसिस ॲक्शन फाउंडेशन या संस्थांनी, इतर स्वयंसेवी संस्थांसह चिमण्या कमी होण्याची कारणे शोधण्यासाठी अभ्यास केला. चिमण्यांना मदत करण्यास सुरुवात केली आणि चिमण्यांची कमी होणारी संख्या हा वातावरणातील वाढत्या प्रदूषणाचा परिणाम आहे काय? हे तपासून पाहण्यासाठी जगभर चळवळ उभारली.

२०१५ सालाच्या दिवसाची मुख्य संकल्पना होती आय लव्ह स्पॅरो. दिल्ली महापालिकेने चिमणी हा तेथील राज्यपक्षी जाहीर केला आहे. या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे आपुल्या जाहल्या तिन्हीसांजा, हे ग. दि. माडगूळकरांचे गाणे आज पूर्णपणे लागू होते. एक घास चिऊताईचा असे म्हणून आई आपल्या बाळाला एक-एक घास मायेने भरवते. चिमणी काळाच्या ओघात दिसेनाशी झाली. कुठेतरी प्रत्येकाच्या बालपणाच्या आठवणींशी चिऊताई जोडली गेली आहे. सध्यातरी चिमणी काळाच्या ओघात दिसेनाशी झाली. आताच्या पिढीला चिमण्यांचा चिवचिवाट कानी पडणे दुर्मिळ झाले आहे. कविता, बडबडगीते यांतच चिमणी शिल्लक राहते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. शहरात मातीची भिंत किंवा कौलारू घरे पाहावयास मिळत नाहीत. अंगणात धान्य निवडणारी महिला दिसत नाही. अंगणात उड्या मारत धान्य टिपणारी बागडणारी चिमणी कुठे दिसणार? सिमेंटच्या जंगलात झाडे मोठ्या प्रमाणात तोडण्यात आल्याने अपवादात्मक झाडे आपल्या नजरेस पडतात. कधी काळी चिमण्यांच्या चिवचिवाटामुळे होणारी सकाळ आता केवळ आठवणीपुरता उरली आहे. जागतिक चिमणी दिनी लोकांमध्ये चिमणी वाचविण्यासाठीची जागृती करणे, तिचे अन्नसाखळीतील-पर्यायाने पर्यावरणातील महत्त्व समजावणे, चिमणीला जगण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करणे, अशा प्रकारचे कार्यक्रम वैयक्तिक अगर संस्था पातळीवर आयोजित केले जातात, परंतु चिमणीसाठीच्या जनजागृतीची गरज कायमस्वरूपी आहे. कमी होणारी झाडे, माणसाच्या बदललेल्या खाण्याच्या सवयी, वाढते आधुनिकीकरण, गगनचुंबी इमारतींत होणारी वाढ, मोबाइल फोन टॉवर्स या सर्व गोष्टींमुळे चिमणी अडचणीत आली आहे. चिमणीला बाभळीसारख्या नैसर्गिक अधिवासाबरोबरच घरटे बांधण्यास अनुकूल गोष्टी उपलब्ध करून देणे, घराभोवती शक्य असल्यास छोटी झाडेझुडपे लावणे, आपल्या घराजवळ, बाहेर चिऊताईसाठी दाणा-पाणी ठेवणे अशा गोष्टी प्रत्येक जण करू शकतो. जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने संकल्प करू या, प्रत्येकाने आपल्या बागेत, परिसरात खाद्यपदार्थांची सोय केली तर पुन्हा एकदा आपल्याला चिमण्या मोठ्या संख्येने दिसू शकतील.

## बंधने फक्त महिलांवरच का?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा भेद राहिला नाही. महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. मात्र, समाजात असाही एक घटक आहे, ज्यांना महिलांची प्रगती खटकत आहे. सनातनी विचारांचे हे लोक महिलांना सतत या ना त्या कारणांमुळे ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषेवरून तर कधी त्यांच्या वेशभूषेवरून ट्रोल करतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, कोठे फिरावे, काय खावे, प्यावे हे पुरुषांनी ठरवावे, ही अठराव्या शतकातील मानसिकता झाली. स्त्री-पुरुष समानता ही फक्त बोलण्यापुरतीच आहे, हेच या मानसिकतेतून दिसून येते. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात, असाही दावा संस्कृती रक्षक करतात. पण ते सोयीस्करपणे विसरतात की साठ-सत्तर वर्षांच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत, ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

# आत्महत्या विनाअनुदानित शिक्षकाची

**शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असतो. तो पिढ्या घडवतो, संस्कार करतो आणि देशाच्या उज्वल भविष्यासाठी योगदान देतो. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ज्या शिक्षकाच्या ज्ञानाने समाज प्रगल्भ होतो, तोच शिक्षक आपल्या मुलाबाळांसाठी दोन वेळच्या भाकरीसाठी हतबल होत आहे. बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी संस्थाचालकांच्या त्रासाला आणि वेतनाच्या संघर्षाला कंटाळून मृत्यूला सामोरे जावे लागले. ही घटना केवळ दुःखद नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाचा ज्वलंत पुरावा आहे.**



**मंथन**

**विजयकुमार गुंड**
**८७८८०२१८९१**

आत्महत्येपूर्वी धनंजय नागरगोजे यांनी संस्थाचालकांना विचारले, मी १८ वर्षे शिकवत आहे, पण अजून वेतन नाही. मी आता काय करू? संस्थाचालकाने उत्तर दिले, तू आत्महत्या कर, म्हणजे तू ही मोकळा होशील आणि मीही मोकळा होईन! ही क्रूरता आणि असंवेदनशीलता ऐकल्यावर हताश झालेल्या शिक्षकाने आपल्या लहान मुलीच्या नावे पत्र लिहिले आणि फेसबुकवर शेवटचा संदेश पोस्ट करून आयुष्य संपवले. एका शिक्षकाला अशा वागणुकीला सामोरे जावे लागते? शिक्षक हा समाजाचा कणा आहे. शिक्षण देणाऱ्यालाच अशा अत्याचारांना तोंड द्यावे लागत असेल तर शिक्षण व्यवस्थेची स्थिती काय? राज्यात सात शिक्षक मतदारसंघ असून, सात आमदार विधान परिषदेवर शिक्षकांचे प्रश्न मांडण्यासाठी शिक्षकांनी निवडून दिले आहेत. दुर्दैवाने, यावर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुदानाच्या टप्प्यात वाढ झाली नाही. विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांना अपेक्षा होती की या वेळी तरी त्यांना न्याय मिळेल, वेतनासाठी संघर्ष थांबेल. परंतु, सात शिक्षक आमदार असतानाही शिक्षकांचा विचार करण्यात आला नाही. ज्यांनी शिक्षकांच्या समस्या सोडवण्याचे वचन दिले, तेच आज गप्प का? सन २०१९ मध्ये सरकारने २० टक्के अनुदान जाहीर केले, पण अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. हजारो विनाअनुदानित शिक्षक आश्वासनांवर जगत आहेत. वेतन नसल्यामुळे शिक्षक उपाशी मरत आहेत, कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत आणि आता हताश होऊन जीवन संपवत आहेत. शासनाचे ढिसाळ धोरण आणि अनास्थेमुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.

शासनाने वेळेवर अनुदान दिले असते तर धनंजय नागरगोजे आज जिवंत असते. संस्थाचालक जबाबदारीने वागले असते तर एका शिक्षकाला मृत्यूला सामोरे जाण्याची वेळ आली नसती. शिक्षण खात्याने शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवला असता तर अशी घटना घडली नसती. शिक्षक आमदारांनी अधिक प्रभावीपणे आवाज उठवला असता तर शिक्षकांना न्याय मिळाला असता. संस्थाचालकावर तातडीने गुन्हा दाखल करावा. विनाअनुदानित शिक्षकांचे वेतन त्वरित सुरू करावे. शिक्षकांच्या वेतन आणि भविष्यासाठी कायदा करावा. शिक्षकांना वेतन आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली नाही, तर शिक्षण क्षेत्राची अपरिमित हानी होईल. शिक्षक हा उपाशी राहून ज्ञान देतो, पण त्याला स्वतःच्या मुलांसाठी दोन वेळचे अन्न मिळू नये, ही परिस्थिती निंदनीय आहे. सरकारने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांनी संघटित होऊन निर्णायक लढा उभारला पाहिजे. आज धनंजय नागरगोजे गेले, उद्या अजून किती शिक्षकांना प्राण गमवावे लागतील, आत्महत्या कराव्या लागतील? शासनाला अजून किती बळी द्यायचे आहेत? सरकार गप्प राहिले तर शिक्षक आणि समाजाने एकत्र येऊन या अन्यायाविरुद्ध निर्णायक संघर्ष उभा केला पाहिजे. कारण, शिक्षक संपले तर शिक्षणही संपेल!

**(लेखक हे शिक्षक भारती सोलापूर जिल्ह्याचे प्रवक्ते आहेत.)**

# शिवप्रभू आचरणातही दिसावेत!

**तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार जयंती साजरी केली जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत. आपल्या अफाट बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शह देणाऱ्या. कडे-कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल.**

**दृष्टिक्षेप**

**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलीकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे कि चेन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रति प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आहे.

ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी-मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर करतात. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेवढे सोपे आहे तेवढेच कठीण. शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे. त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा!

## जनमनाचे प्रतिध्वनी

### बालमृत्यूंचे प्रमाण चिंताजनक

राज्यातील आदिवासी आणि दुर्गम भागात बालमृत्यूंचे प्रमाण वाढत आहे. बालवयात होणारे विवाह, अकाली प्रसूती, कमी वजनाच्या बाळाचा जन्म, संतुलित व पोषक आहाराची कमतरता, आरोग्यसेवेची मर्यादित उपलब्धता आणि सांस्कृतिक जीवन पद्धती अशा विविध कारणांमुळे कुपोषण आणि बालमृत्यूंची संख्या वाढते आहे. पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात जानेवारी २०२० ते जानेवारी २०२५ या पाच वर्षांत शून्य ते १ वर्ष वयोगटातील ६८ तर १ ते ५ वर्ष वयोगटातील १७ असे एकूण ८५ बालमृत्यू झाले. वास्तविक राज्यात सहा वर्षांखालील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना राबविली जाते. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये हजारो कोटींची तरतूद केली जाते. असे असूनही राज्यात लहान मुलांचे कुपोषणाचे व मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. राज्यात आजही सुमारे ८० हजार बालके कुपोषित असून, या मुलांना तातडीच्या पोषक आहाराची व योग्य वैद्यकीय उपचारांची गरज आहे. **- प्रदीप मोरे**

### हुल्लडबाजी तरुणाईला रोखा

सध्या तरुणाईमध्ये दुचाकींची पुंगळी अर्थात सायलेन्सर काढून गाड्या पळविण्याचे वेड लागले असल्याचे दिसून येते आहे. निवडणुकीतील आपल्या समर्थकांचा विजयी जल्लोषादरम्यान तसेच विविध कारणांमुळे दुचाकींचे धूर सोडणारे सायलेन्सर काढून गल्लीबोळातून, महानगर, शहरातून गाड्या पळविल्या जातात. मात्र, हा सारा प्रकार वाहतूक पोलीस उघड्या डोळ्यांनी पाहत असतात. प्रामुख्याने यामध्ये बुलेट दुचाकीचा आवाज तर कर्णकर्कश, कानठळ्या हृदयात धडकी बसवणारा असतो. वास्तविक पाहता सायलेंसर काढून दुचाकी चालविल्यामुळे धूर मोठ्या प्रमाणात निघतो. सध्या सरकार, सेवाभावी संस्था, सामजिक संघटना प्रदूषण रोखण्यासाठी विविध पातळ्यांवर काम करत असताना असली हुल्लडबाजी करणारे महाभाग अनेकांना त्रासदायक ठरतात. हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणाईवर वेळीच वाहतूक पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून पुन्हा असला प्रकार करायला धजावणार नाहीत असली कडक शिक्षा करावी.

**-राजू जाधव, बेळगाव**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### महेश मांजरेकर यांची 'फिल्टर कॉफी'



**मुंबई :** कॉफीची नजाकत काही वेगळीच! मग ती कोल्ड असो वा हॉट! कॉफीच्या शौकिनांची संख्या कमी नाही. कॉफीचा खरपूस दरवळ जसा घरभर पसरतो, तसाच आता रंगभूमीवर कॉफीचा दरवळ पसरणार आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक महेश वामन मांजरेकर यांनी ही 'फिल्टर कॉफी' नाट्यरसिकांसाठी आणली आहे. अद्वैत आणि अश्वमी थिएटर्स प्रकाशित महेश वामन मांजरेकर सादर करीत असलेली ही तजेलदार कॉफी ६ एप्रिलला रंगभूमीवर येणार आहे. रितीशा प्रोडक्शन्स निर्मित महेश वामन मांजरेकर लिखित दिग्दर्शित 'फिल्टर कॉफी' या नाटकांचे निर्माते दिलीप माधव जगताप असून, सहनिर्माते राहुल भंडारे आहेत. नाटकात विराजस कुलकर्णी, विक्रम गायकवाड, कुणाल मेश्राम, अंकिता लांडे आणि उर्मिला कानिटकर यांच्या भूमिका आहेत. याप्रसंगी बोलताना महेश मांजरेकर म्हणाले '१९९२ साली मला हे नाटक करायचं होतं. त्यावेळी ते शक्य झालं नाही आता हे नाटक मी आणलं असून ते स्वतः दिग्दर्शित करतोय. माझ्या सबतीने निर्माते, कलाकार आणि तंत्रज्ञ अशी आम्ही सगळ्यांनी मिळून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी आणलेली कडू गोड चवीच्या फिल्टर कॉफी' ची ट्रीट नाट्यरसिक नक्कीच एन्जॉय करतील, असा विश्वास महेश मांजरेकर यांनी व्यक्त केला. माझी ही पहिली नाट्यकृती असून महेश मांजरेकर यांच्यासारख्या दिग्ग्ज दिग्दर्शकासोबत काम करणं ही माझ्यासाठी पर्वणी असल्याचे अभिनेत्री उर्मिला कानिटकर हिने यावेळी सांगितले. 'फिल्टर कॉफी' या नाटकाचे सहलेखन अभय देखणे सहाय्यक दिग्दर्शक सुरज कांबळे आहे. संगीताची जबाबदारी हितेश मोडक यांनी सांभाळली आहे. प्रकाशयोजना शीतल तळपदे तर नेपथ्य संदेश बेंद्रे यांचे आहे. वेशभूषा लक्ष्मण येलप्पा गुल्लार यांची आहे. दीपक कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य या नाटकासाठी लाभले आहे.

### सूरजच्या 'झापुक झुपूक'चे प्रमोशन




**मुंबई :** 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण आता मराठी सिनेसृष्टी गाजवण्यासाठी सज्ज झाला आहे. सूरज चव्हाण लवकरच मोठ्या पडद्यावरून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या ज्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत त्या चित्रपटाच्या प्रमोशनला आज मुहूर्त लागला. मोरगावच्या गणपती बाप्पाचा आणि जेजुरीच्या खंडोबा देवाचा आशीर्वाद घेत सूरज चव्हाणने झापून झुपक सिनेमाच्या प्रमोशन ची सुरुवात केली आहे. खंडोबा देवाच्या चरणी आज सूरजने आपल्या आगामी चित्रपटाचे पोस्टर ठेवून, बाप्पाचा आशीर्वाद घेतला आहे. या चित्रपटात जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे , केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' चित्रपट कौटुंबीक आणि मनोरंजन ने भरपूर अशी एक धमाल लव्हस्टोरी आहे. सिनेमाची कथा नक्की काय आणि कशी असणार आहे याचा उलगडा २५ एप्रिलला सिनेमागृहातच जाऊन बघूया.

### 'नयन' २१ मार्चपासून प्रेक्षकांच्या भेटीला



**मुंबई :** मनाला भिडणारे अनोखे विषय नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी मराठी सिनेसृष्टी जागतिक पातळीवर ओळखली जाते. अशाच पद्धतीचा तसेच 'आजचा संघर्ष, उद्याचे सामर्थ्य' अशी प्रेरणादायी टॅगलाईन असलेला 'नयन' येत्या शुक्रवारी म्हणजेच २१ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात एक महत्त्वपूर्ण विषय अतिशय सहजपणे सादर करण्यात आला आहे. गोपी एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निर्मात्या अरुणा मोरे यांनी 'नयन' या बहुचर्चित चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'नयन'ची कथा-संवादलेखन अंकुश मोरे यांनी केले असून, त्यांनीच या चित्रपटाचे कल्पक दिग्दर्शनही केले आहे. या चित्रपटाची कथा कोकणात घडणारी आहे. पटकथा नारायण गोंडाळ यांनी लिहिली असून, संकलन सुबोध सुधाकर नारकर यांनी केले आहे. सिद्धेश पै, मोनालिसा बागल, सुहास पळशीकर, अंशुमाला पाटील, रिना लिमन, गणेश यादव, दीपक शिर्के, विजय पाटकर, प्रणव रावराणे, श्रीनिधी शेट्टी आदी कलाकारांच्या या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. सुरेश वाडकर, जावेद अली, आदर्श शिंदे, स्वप्नील बांदोडकर, आनंदी जोशी, राहुल सक्सेना यांनी गाणी गायली आहेत. संगीत विक्रांत वार्डे यांचे आहे, तर पार्श्वसंगीत पंकज पडघम यांनी दिले आहे. नृत्यदिग्दर्शन सिद्धार्थ पै यांचे असून, ध्वनी संयोजन सुनील पाटोळे यांनी केले आहे.

### 'अशी ही जमवाजमवी'चा टीझर रिलीझ

**मुंबई :** मैत्री, प्रेम, कुटुंब या विषयांवर आजवर बरेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत; मात्र राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटात फक्त तरुणांचीच नाही तर वृद्ध मित्र मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी आपल्याला अनुभवयाला मिळणार आहे. या दमदार आणि बहुप्रतीक्षित चित्रपटाचं टिझर प्रदर्शित झालंय, ज्यात अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन दिग्गजांची मजेदार जुगलबंदी पहायला मिळते. चित्रपटाचं नाव आणि रिलीझ झालेल्या टिझरवरून संपूर्ण सिनेमा पाहण्याची प्रेक्षकांची उत्सुकता आता वाढली आहे. राहुल शांताराम यांनी 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू केलेली आहे. हा नवाकोरा चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या सिनेमागृहात भेटीला येणार आहे.



# पंतप्रधान आवासअंतर्गत ३,००० घरांचे वित्तपुरवठ्यासाठी सहकार्य

## होम फायनान्सने महाराष्ट्र हाउसिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनसोबत महत्त्वपूर्ण करार

**मुंबई : भारतातील अग्रगण्य परवडणाऱ्या गृहकर्ज देणाऱ्या कंपन्यांपैकी एक असलेल्या IIFL होम फायनान्स लिमिटेडने महाराष्ट्र हाउसिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडसोबत एक महत्त्वपूर्ण करार जाहीर केला आहे. परवडणाऱ्या गृहसंकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि महाराष्ट्रात गृहकर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत सुमारे ३,००० घरांच्या विक्रीला चालना देण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.**

या करारावर खखत्रुःङ होम फायनान्सचे सीईओ आणि एऊमोनू रातरा आणि चक्ळ्ळ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. ही भागीदारी MHDCच्या गृहसंकल्पना आणि IIFL HFLच्या गृहकर्ज देण्याच्या अनुभवाचा उपयोग करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांना घरे घेण्यासाठी मदत करेल. हा करार भारत सरकारच्या सबके लिए घर या दृष्टीकोनाशी सुसंगत असून, परवडणाऱ्या घरांसाठी दोन्ही संस्थांची वचनबद्धता दृढ करतो.

आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेडचे सीईओ आणि ED, श्री. मोनू रातरा यांनी या भागीदारीबद्दल सांगितले, MHDCसोबतची ही भागीदारी हजारो कुटुंबांचे स्वप्न साकार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. MHDCच्या गृहसंकल्पनांना आमच्या आर्थिक तज्ज्ञतेसह आणि डिजिटल-फर्स्ट दृष्टिकोनासह एकत्र करून, आम्ही एक भक्कम पर्यावरण प्रणाली निर्माण करत आहोत जी महाराष्ट्रातील परवडणाऱ्या घरांना पाठिंबा देईल. या भागीदारीद्वारे, आम्ही महाराष्ट्राच्या दूरदराजच्या भागांमध्येही घरे सहज आणि परवडणारी बनवण्याचा प्रयत्न करत आहोत.

MHDCच्या अधिकाऱ्यांनी भागीदारीबद्दल सांगितले, IIFL होम फायनान्ससोबतची भागीदारी महाराष्ट्रातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या आमच्या ध्येयाकडे एक महत्वाचा टप्पा आहे.

आयआयएफएल होम फायनान्सच्या आर्थिक उपाययोजना आमच्या गृहसंकल्पनांसोबत एकत्र करून, आम्ही हजारो कुटुंबांसाठी घर खरेदी करण्याची प्रक्रिया सुलभ करत आहोत.

आम्ही केवळ घरे बांधत नाही, तर समाजाची उभारणी करत आहोत आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीत योगदान देत आहोत. आयआयएफएल होम फायनान्सच्या वित्तीय तज्ज्ञतेसह आणि MHDC च्या महाराष्ट्रातील दृढ उपस्थितीसह ही संकल्पना परवडणाऱ्या घरांसाठी एक मोठा बदल घडवेल आणि राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

# शेअर बाजाराने घेतली उसळी

## गुंतवणूकदारांना झाला चार लाख कोटींचा नफा

**मुंबई :** अनेक दिवसांच्या घसरणीनंतर भारतीय शेअर बाजार आज सुस्थितीत आला आहे. अनेक दिवस नुकसान सहन करणाऱ्या गुंतवणूकदारांनी आज मोठा नफा कमावला. कारण, आज (१८ मार्च) सेन्सेक्सने उसळी घेतली. ९०० अंकांच्या उडीसह सेन्सेक्स ७५,००० अंकांच्या पुढे गेला. सकाळी बाजार उघडल्यानंतर काही वेळ धिम्या गतीने पुढे सरकणाऱ्या सेन्सेक्सने अचानक मोठी उसळी घेतली. सकाळी साडेदहा वाजता सेन्सेक्स ७५,००० अंकांच्या पुढे व्यवहार करत होता. तर निफ्टी २५२ अंकांनी म्हणजेच १.४ टक्क्यांनी वाढून २२,७६३ वर थांबला. सेन्सेक्स १.२ टक्के म्हणजेच ८९४ अंकांनी वधारला असून ७५,०५६ वर व्यवहार करत होता. सेन्सेक्स संध्याकाळी ७५,०५० वर थांबला. बँक निफ्टी ६५५ अंकांनी म्हणजेच १.३६ टक्क्यांनी वाढून ४९,०१२ पर्यंत गेला आणि ४९,००२ वर थांबला.



आज बाजार सुस्थितीत दिसत असला तरी हीच स्थिती पुढेही राहील असं सांगता येत नाही. कारण अमेरेकेने अनेक देशांवर आयात शुल्क लावल्यामुळे, फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर वाढीच्या निर्णय आणि इतर भू-राजकीय कारणांमुळे अजूनही जोखीम तशीच आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत बाजारात काय घडेल याचा अंदाज वर्तवणं अवघड ठरेल.

दरम्यान, सेन्सेक्स वधारल्यामुळे गुंतवणूकदारांना मोठा नफा झाला आहे. आयसीआयसी बँक, ॲक्सिस बँक, झोमॅटो व टाटा मोटर्सच्या समभागांमध्ये मोठी वाढ दिसली. मुंबई शेअर बाजारातील नोंदणीकृत कंपन्यांच्या मार्केट कॅपमध्ये ४.०३ कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

मुंबई शेअर बाजारात उद्या आणि परवा काय घडेल हे अमेरिकेतील आर्थिक घडामोडींवर अवलंबून असणार आहे. उद्या यूएस फेडरल रिझर्व्हचे निर्णय जाहीर होणार आहेत. सर्व प्रकारचे व्याजदर कायम राहतील असं अर्थतज्ज्ञांना वाटतं. मात्र, गुंतवणूकदारांना व्याजदर कपातीची अपेक्षा आहे. सर्व गुंतवणूकदार व्याजदर कपात/वाढ व चलनवाढीच्या सर्व आर्थिक अंदाजांवर आणि उद्या होणाऱ्या निर्णयांवर बारीक लक्ष ठेवून आहेत.

चीनमध्ये उद्योजकांना मदत निधी मिळण्याची अपेक्षा आहे. तिथल्या जिनपिंग सरकारने अपेक्षित निधी जाहीर केल्यास त्याचा स्टीलसह अनेक क्षेत्रातील कंपन्यांवर चांगला परिणाम दिसू लागेल.

# राज्यात १३२ कारखान्यांची एफआरपी बाकी

## सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांची माहिती

**पुणे : प्रतिनिधी**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या एफआरपीत गेल्या पाच वर्षांत पाच वेळा वाढ देण्यात आली आहे. परिणामी, या वर्षी १३२ कारखान्यांची एफआरपी राहिली असल्याची माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी पत्रकारांना सांगितली.

दरम्यान, राज्यातील १६३ साखर कारखाने उसाअभावी बंद झाले आहेत तर साखर उतारा ९.४३ टक्के मिळाला असून, साखरेचे उत्पादन ७८७.६७ लाख क्विंटल झाले असून, ऊस गाळप ८३४ .८८ लाख मे. टन झाले असल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयाकडून सांगण्यात आली. यंदाच्या हंगामात एकूण २०० साखर कारखान्यांनी हंगाम घेतला त्यामध्ये ९९ सहकारी साखर कारखाने आहेत

साखर उत्पादनात यंदा अनपेक्षित घट झाली आहे. साखर कारखान्यांसाठी चिंता वाढवणारी बाब म्हणावी लागेल. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या एफआरपीत गेल्या पाच वर्षांत पाच वेळा वाढ देण्यात आली आहे. हा दर २७५० वरून ३४०० वर पोहोचला आहे. तर दुसऱ्या बाजूला साखरेचा विक्री दर २९०० वरून अवघा ३१०० वर गेला आहे. त्याचा परिणाम म्हणून यावषी १३२ कारखान्यांची एफआरपी प्रलंबित असल्याचे दिसून येते.



साखर उद्योगाने राज्याला अर्थकारणाला चालना दिली. हाच उद्योग यंदा मोठ्या अडचणीत आहे. साखर उत्पादनातील लक्षणीय घट तसेच साखरेचा उत्पादन खर्च आणि कारखान्यांना मिळणारे उत्पन्न यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे.

त्यातूनच साखर कारखानदारी अडचणीत सापडली आहे. याचा परिणाम साखर दरावर होणे शक्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. वर्षात किमान १४० ते १५१ दिवस साखर हंगाम चालतो. वर्षी सरासरी ९९ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन अपेक्षित होते. साखर उत्पादनाचा अंदाज चुकण्याची शक्यता आहे.

# 'महिंद्रा'ने गाठला द्राक्ष निर्यातीचा मोठा टप्पा!

## युरोप, उत्तर अमेरिका, आग्नेय आशियासह जगभर निर्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतातून टेबल द्राक्ष निर्यात करणाऱ्या आघाडीच्या कंपन्यांपैकी एक असलेल्या महिंद्रा ॲग्री सोल्युशन्स लिमिटेडने भारतीय द्राक्षे जागतिक बाजारपेठेत निर्यात करण्याच्या कामामध्ये २० वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठल्याची घोषणा केली. २००५ मध्ये महिंद्राने युरोप आणि यूकेला पहिल्यांदा द्राक्षांची निर्यात केली होती. उत्तर अमेरिका, युरोपियन युनियन, यूके, आग्नेय आशिया आणि इतर अनेक देशांमध्ये उच्चतम दर्जाची गुणवत्ता, सुरक्षा मानके आणि शाश्वत पद्धतींसह द्राक्ष पुरवली जातात.

महिंद्रा ॲग्रो कंपनीमार्फत विविध प्रकारच्या उच्च दर्जाच्या द्राक्षांची निर्यात केली जाते. त्यामध्ये पांढरी बिनबियांची थॉमसन आणि सोनाका, लाल बिनबियांची फ्लेम आणि क्रिमसन तसेच काळी बिनबियांची शरद या द्राक्षांचा समावेश आहे.

नाशिकमध्ये असलेल्या अत्याधुनिक द्राक्ष पॅक हाऊसच्या सहाय्याने द्राक्ष व्यवसायाला पाठबळ मिळत असून, द्राक्षांच्या कापणीनंतर व्यवस्थापनासाठी जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. २०१९ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या पॅक हाऊसमध्ये उत्पादनाचा मागोवा घेणे सुनिश्चित करत पुरवठा साखळीदरम्यान पिकाचा ताजेपणा कायम ठेवत संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित करून द्राक्षांची निवड आणि पॅकिंग केले जाते.



शेतकऱ्यांकडून उच्च गुणवत्तेची टेबल द्राक्षे घेतली जातात आणि त्यांना द्राक्ष उत्पादन, पिकांची काळजी, कापणी आणि कापणीनंतरचे व्यवस्थापन याचे मार्गदर्शन केले जाते. यामध्ये सिंचन पद्धतीत सुधारणा, शेतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब आणि रासायनिक इनपुट व पाण्याचा कमी वापर यावर भर देण्यात येतो. त्यामुळे द्राक्षशेतीशी संबंधित कार्बन फूटप्रिंट कमी होतो आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होते.

टेबल द्राक्षांचे उत्पादन आणि व्यवस्थापनाची प्रक्रिया नव्याने परिभाषित करत असतानाच, स्थानिक समुदायाच्या कल्याणासाठी रोजगार निर्मिती आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सक्रिय भूमिका बजावत आहे. २० वर्षांच्या द्राक्ष निर्यातीच्या टप्प्याबाबत बोलताना महिंद्रा ॲग्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक रमेश रामचंद्रन म्हणाले, गेल्या २० वर्षांत आमच्या द्राक्ष व्यवसायाच्या माध्यमातून आम्ही साध्य केलेल्या गोष्टींचा आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. द्राक्षांसारख्या उच्च मूल्य असलेल्या फळपिकाद्वारे शाश्वतरीत्या गुणवत्ता, उत्पादनक्षमता आणि शेतकऱ्यांचा नफा वाढवण्याचे ध्येय आम्ही निश्चित केले होते. ही २० वर्षांची वाटचाल संपूर्ण कृषी मूल्यसाखळीच्या परिवर्तनासाठी दिलेल्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

# ज्येष्ठ नागरिक बचत योजनेला आता एचडीएफसी बँकेचे सहकार्य

**नाशिक :** एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आज जाहीर केले की, आता एचडीएफसी बँकेत ज्येष्ठ नागरिक बचत योजनेच्या (एससीएसएस) अंतर्गत ठेवी स्वीकारण्यात येतील. एससीए-सएस ही भारत सरकारद्वारा ज्येष्ठ नागरिकांसाठी चालविण्यात येणारी बचत योजना आहे.एचडीएफसी बँक भारत सरकारसाठी एखाद्या एजन्सी बँकेसारखे काम करेल आणि ग्राहकांना चांगली सेवा प्रदान करून त्यांच्याकडून या योजनेअंतर्गत ठेवी प्राप्त करेल.

या बँकेच्या कोणत्याही शाखेत जाऊन पात्र ग्राहक एससीएसएस साठी अर्ज करू शकतात. या योजनेसाठी पात्र असणाऱ्या ग्राहकांमध्ये ६० वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठ्या व्यक्ती तसेच ५५ वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठे, नोकरीतून निवृत्त झालेले लोक यांचा समावेश आहे.

शिवाय, संरक्षण सेवांमधून निवृत्त झालेले कर्मचारी देखील वय वर्ष ५० झाल्यानंतर या योजनेसाठी अर्ज करू शकतात एससीएसएस*मध्ये केलेली गुंतवणूक आयकर अधिनियमाच्या कलम ८० सी अंतर्गत लाभ मिळवण्यास पात्र आहे. या योजनेत त्रिमासिक व्याज देण्यात येते आणि ठेवीचा लॉक-इन पिरीयड ५ वर्षांचा आहे. ही ठेव पुन्हा पुन्हा तीन-तीन वर्षे वाढवून घेता येते. या व्यतिरिक्त, एससीएसएस अंतर्गत देण्यात येणारा व्याज दर सरकारकडून वेळोवेळी सूचित करण्यात येतो.

एचडीएफसी बँकेचे पराग राव म्हणाले, एक आघाडीची एजन्सी बँक म्हणून, भारताच्या मुख्य राष्ट्रीय लघु बचत योजना कार्यक्रमांच्या छत्राखाली आणखी एक योजना देऊ करताना आम्हाला आनंद होत आहे. एससीएसएस ही योजना देशातील ज्येष्ठ नागरिकांना या योजनेतील आकर्षक व्याज दरासह एक स्थिर उत्पन्न स्रोत मिळवून देतो. आयकर गणनेत तुम्ही ८०सी कलमाच्या अंतर्गत पात्र ठरता हा या योजनेचा अतिरिक्त फायदा आहे.

# उर्वशी ढोलकिया देवी सिंह शेखावतच्या रूपात

**मुंबई :** सोनी सबवरील 'पुष्पा इम्प-ॉसिबल' मालिकेत पुष्पा (करुणा पांडे) या करारी आणि धडाडीच्या स्त्रीची प्रेरणादायक कहाणी बघताना प्रेक्षक रंगून गेले आहेत. पुष्पा जीवनातील प्रत्येक आव्हानाला अत्यंत दृढ निर्धाराने तोंड देते. अलीकडच्या नवीन कथानकात, पुष्पाच्या संपूर्ण कुटुंबावर आलेल्या संकटात पुष्पाच्या पाठीशी उभे राहण्यासाठी उर्वशी ढोलकियाने पुन्हा मालिकेत दमदार पुनरागमन केले आहे.



'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत एक रोमांचक ट्विस्ट आला आहे आणि एका धक्कादायक संकटातून पुष्पाला आणि तिच्या कुटुंबाला वाचवण्यासाठी अगदी योग्य वेळी बुद्धिमान वकील आणि सामाजिक कार्यकर्ती देवी सिंह शेखावतच्या रूपात अभिनेत्री उर्वशी ढोलकिया मालिकेत परत आली आहे.

# आयसीएमएआयतर्फे आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिसंवाद

## निर्यात प्रक्रियेत सीएमएच्या भूमिकेबाबत ऊहापोह

**नाशिक : प्रतिनिधी**

**निर्यात प्रक्रियेत सीएमएच्या भूमिकेबाबत आयसीएमएआयतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिसंवादात ऊहापोह करण्यात आला.**

दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया आयसीएमएआय नाशिक चॅप्टर आणि विदेश व्यापार महानिदेशालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय व्यापारावर एकदिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचा प्रमुख उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापार संबधित योजना व धोरणांची माहिती निर्यात बंधू योजनेंतर्गत लोकाभिमुख सहभाग असा होता.




भारताची निर्यात क्षमता, नवीनतम योजना, विविध ई-कॉमर्समधील संधी इत्यादीची माहिती या परिसंवादात देण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जीएसटी आयुक्त आर.के.द्विवेदी, तसेच फॉरेन ट्रेडचे जनरल डायरेक्टर बी. एन. विश्वास, जीएसटीचे आतिरिक्त आयुक्त अजित दान, अशोक नवाल, पोस्ट ऑफिसचे वरिष्ठ अधीक्षक प्रफुल्ल वाणी उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते म्हणून शेखर सिंग तसेच मनोज मालपाणी, आयसीआयसीआयचे मॅनेजर आशिष बेदमुथा, सूरज लाहोटी हे होते.

या परिसंवादात निर्यात प्रक्रियेतील दस्तऐवजीकरण व त्याची प्रक्रिया, योजना शुल्क, निर्यात संबंधित विविध प्रोत्साहन योजना, निर्यातीत डीजीएफटीची भूमिका, निर्यातीत सीमाशुल्कांची भूमिका, निर्यात प्रक्रियेमधील सीएमएची भूमिका तसेच निर्यातीत ई-पोस्ट आणि बँकेची भूमिका यांसारख्या विविध विषयांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मैथिली मालपुरे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी निमा, आयमा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, सिन्नर तालुका इंडस्ट्रीज को-ऑपरेटिव्ह स्टेट लिमिटेड यांचा देखील महत्त्वाचा सहभाग होता. आरिफ खान मन्सुरी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी आयसीएमएआयच्या नाशिक चॅप्टरचे अध्यक्ष अमित जाधव, पीडी कमिटीचे अध्यक्ष कैलास शिंदे, उपाध्यक्ष मयूर निकम, चिटणीस प्रकाश राजपूत, खजिनदार नवनाथ गांगुर्डे, धनंजय जाधव, संतोष ब्राह्मणकर, विद्यार्थी प्रतिनिधी सुयोग मालपुरे यांचे सहकार्य लाभले.

गांवकरी प्रतिमा
नाशिक, बुधवार,
दि. १९ मार्च २०२५



# जागरूक पालक ?



प्रा. विभावरी पवार
समन्वयक, व्यवस्थापन विभाग
सी.एम.सी.एस. महाविद्यालय

काळ बदलला आणि त्यासोबत प्रत्येक बाबतीत बदल घडले. राहणीमान, वागण्या, बोलण्याच्या पद्धती बदलल्या. रीतिभाती, परंपरा जाणणारी वडीलधारी पिढी लुप्त होत चालली. काहीतरी हरवल्यासारखे रोज जाणवते आहे. गेल्या वीस वर्षांपासून प्राध्यापक म्हणून काम करत असल्यामुळे तरुण पिढीशी रोजच अगदी जवळचा संबंध येतो. त्यांच्यात होणारे योग्य-अयोग्य बदल पहिल्यानंतर असे वाटते की शिक्षक आणि पालक यांच्या या दोघांनी एकत्र येऊन योग्य ती पावले उचलली तर या नवीन पिढीतील मुला-मुलींमध्ये असलेली हुशारी सत्कारणी लावता येईल.

परीक्षा काळात विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे देखील नवनवीन अनुभव येतात. त्यातून खूप काही शिकता येते. बाहेरील रंगीबेरंगी दुनियेमुळे मुलाचे खरे रंग दिसून येत नाही. आधुनिक काळातील आधुनिक बदल खूप योग्य आहेतच आणि गरजेचेही. बदल हीच एक गोष्ट प्रत्येकाच्या आयुष्यातील सातत्याने होणारी गोष्ट आहे. स्मार्ट युगात स्वबुद्धीचा वापर कमी होताना दिसला, तंत्रज्ञान प्रगतीमुळे गॅजेट्सचा अतिरिक्त वापर होताना दिसला. आता अभ्यास तर मोबाइलशिवाय होतच नाही. पुस्तकाच्या पानांचे फोटो काढून त्याचे वाचन मोबाइलमध्ये होते. काल एकाच दिवसात दोन असे अनुभव आले की, ज्यामुळे नाण्याला दोन बाजू असतात हे प्रकर्षाने जाणवले. आई-वडिलांना आपली मुले प्रियच असतात. त्यामुळे कित्येक वेळा मुलांच्या बोलण्यावर, सांगण्यावर डोळे झाकून विश्वास टाकला जातो. पण त्याचमुळे कदाचित पालकांना काही काळानंतर अनपेक्षित आणि मनस्ताप देणाऱ्या गोष्टींना समोर जावे लागते. मग त्यांची होणारी केविलवाणी अवस्था पाहून त्रास होतो. हवालदिल काही पालक आपल्या मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळावे, शिकून पायावर ठामपणे उभे राहता यावे, जे कष्टमय आयुष्य ते जगतात ते मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून शहरातील न परवडणारे खर्च माथी घेऊन मुलांना शिक्षणासाठी चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात. काही मुले त्याची जाणीव ठेवून उत्तम प्रकारे शिक्षण घेतात. पण सगळेच सारखे नसतात. काही मुले-मुली शहरातील नको त्या प्रलोभनाच्या आहारी जाऊन मुखवटा घालून जगतात. एकही दिवस कॉलेज न करता नको त्या सवयी आणि संगतीपाई अशा गोष्टींना महत्त्व द्यायला लागतात, ज्यामुळे सरळसोप्या गोष्टी देखील अवघड होऊन बसतात. गावाकडचे असो नाहीतर शहरातील असो, आई-वडील आपल्या मुलांच्या भल्याचाच सतत विचार करतात. पण कधी-कधी त्याच पालकांना चुकीचे अनुभव येतात. एक लक्षात येते की, मुलांना नाही या शब्दाचीच सवय पालकांनी नकळत लावलेली नाही. मी पालकही आहे आणि शिक्षकही आहे. त्यामुळेच कदाचित दोन्ही बाजूंचा विचार करण्याची आणि अचूक ओळखण्याची क्षमता वाढली आहे. माझा एकुलता एक मुलगा किंवा मुलगी आहे म्हणून मी गाढवी प्रेम करून चालणार आहे का? ज्यामुळे त्यांच्या आयुष्यात त्रासदायक बदल घडत असतील त्या गोष्टींना वेळेतच नाही म्हणून रोखले तर बऱ्याच चुकीच्या गोष्टी होणारच नाहीत. स्मार्ट मोबाइल दिला तर त्याचा नेमका वापर होतो का हे पण बघणे गरजेचे आहे. गाडी दिली, पण मग ती जिथे वेळेवर पोचण्यासाठी दिली तिथे ती पोचते का? हेही पाहणे आपली जबाबदारी आहे. मित्रमैत्रिणी नक्कीच असायला हव्यात. पण त्याची पारख आपल्या मुला-मुलींना आहे का हे पण लक्षात आणून दिले पाहिजे. परीक्षेत कॉपी केली तर पहिलीच वेळ आहे सोडून द्या, हे सांगण्यापेक्षा त्यांच्यासमोर शिक्षकांना योग्य ते करा, असे ठामपणे सांगितले तर कोणताच मुलगा परत तसे करणार नाही. काही मुले हुशार असतात पण उर्मट असतात. मग अशा वेळी मी पालक म्हणून ती-तो घरी आमच्याशीही असेच बोलतो हे सांगून अजून खतपाणी घालण्याऐवजी तिथेच त्यांचे बोलणे रोखले तर पुन्हा पश्चात्तापाची वेळच येणार नाही.

थोडक्यात आजच्या पिढीसोबत मित्रत्वाचे घट्ट आई योग्य नाते निर्माण करत असताना पालकांनी आम्ही तुझे आई-बाप आहोत याची जाणीव आणि आदरयुक्त भीती मुलांना वाटावी, अशी काळजी घेतली तर योग्य ते बदल आणि आयुष्य घडवणारी स्मार्ट पिढी नक्कीच समोर येईल. म्हणून सर्व पालकांना कळकळीची विनंती आजी की, मुला-मुलींसाठी जे काही कराल त्याच्या त्यांना पुढे जाऊन फायदा होणार आहे का? हे नक्की जाणून घ्या. असे म्हणतात A Stitch in Time Saves Nine. म्हणून आजच नाण्याच्या दोन्ही बाजू बघा आणि मुलांना योग्य ती साथ द्या.



शुभदर्शना पाटील
(बढे)

# लुप्त का तो ओलावा ?

काही महिन्यांपासून तरुण पुरुषांच्या आत्महत्येच्या बातम्या समोर येत आहेत. त्यातल्या बहुतांश आत्महत्येमागची कारणे ही पत्नीकडून होत असलेला छळ ही होती. जिच्यासमवेत सात जन्म सोबत राहण्याची शपथ घेतली, आज त्याच पत्नीने अशी परिस्थिती उभी करावी, हे अगदी अनाकलनीय आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी, त्यांच्या हक्कांसाठी बरेच कायदे, संघटना आहेत. कारण पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे छळ आजवर जास्तच झाला आहे. पण बऱ्याचदा याच कायदा, हक्कांचा गैरफायदा घेऊन कित्येक स्त्रिया पैसे उकळण्यासाठी किंवा इतर कारणांसाठी पुरुषांना जाच देतात. व्हायरल झालेल्या काही व्हिडिओद्वारे तर आत्महत्या केलेल्या पुरुषांच्या चेहऱ्यावरील नैराश्य, जगण्याची उडून गेलेली उमेद अगदी स्पष्टपणे दिसत होती. अर्धांगिनी म्हटल्या जाणाऱ्या पत्नीला आपल्या पतीचे मनही न वाचता यावे? यामागे पत्नीचीही काही कारणे असू शकतात. आजच्या स्पर्धेच्या युगात माणसे फक्त पैशाच्याच शोधात आहेत. त्यात सुख, शांती आणि समाधान पार नाहीसे झाले आहे. विशेषतः जेव्हा पती-पत्नी दोघेही कमवत असतात तेव्हा कामाचा ताण, हार्मोनल बदल, व्यस्त दिनचर्या आणि त्यात आर्थिक व्यवस्थापन या सगळ्यांचा ताळमेळ घालणे म्हणजे एक दिव्यच. आणि हे दिव्य पार पाडताना एकमेकांना वेळ न देता येणे, एकमेकांच्या आयुष्यात डोकावण्याचा प्रयत्न न करणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. बऱ्याचदा दिवसभर थकून आल्यावर एक ग्लास पाण्यासोबत आजचा दिवस कसा होता? हे शब्द जरी कानावर पडले तरी अर्धा ताण तिथेच नाहीसा होतो, मग तो नवरा असो नाहीतर बायको!

सोबत जेवायला बसणे, आजचा दिवस कसा गेला, काय गमतीजमती झाल्या, काय चॅलेंजेस होते या अगदी साध्यागोष्टींची चर्चा केली तरी नात्यांमध्ये ओलावा टिकून राहातो.

पती पत्नीच्या नात्याला कोण्या एकाने समजून चालत नाही. आज आपण जास्त पैसा तितके जास्त सुख या गोड गैरसमजात राहत आहोत. पण आजूबाजूला अगदी पुलाखाली संसार थाटणाऱ्या जोडप्याला बघितले तरी, डोक्यावर साधं छतही नसताना ते अगदी समाधानी असल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून जाणवते. मग आपण तर त्या तुलनेत खूपच सुखी आहोत. कधी कधी नात्याला स्पेसपेक्षा जास्त खांद्याची गरज असते. तो वेळोवेळी योग्य व्यक्तीने दिला की सुखाची व्याख्या पैशात नाही तर



कुटुंबातच दिसायला लागते आणि अनुभवायलाही मिळते.

# फेशियल

नेहा खरे
कॉस्मेटोलॉजिस्ट

ब्यूटी टिप्स

**फेशियल करत आहात?**

फेशियल हे फक्त स्किनकेअर ट्रीटमेंटपेक्षा जास्त काही आहे. हे तंत्र, उत्पादने आणि त्वचा स्वच्छ करण्यासाठी, पोषण करण्यासाठी आणि टवटवीत करण्यासाठी एकत्रितपणे काम करणाऱ्या स्टेप्स आहे.

**त्वचेचे प्रकार ओळखणे :** क्लायंटच्या त्वचेचा प्रकार (तेलकट, कोरडा, संयोजन, संवेदनशील) आणि चिंता (पुरळ, रंगद्रव्य, वृद्धत्व) समजून घेणे योग्य उपचार सुनिश्चित करते. योग्य उत्पादने आणि तंत्रे निवडण्यात मदत करते.

**क्लिंजिंग :** घाण, तेल आणि जमा मेकअप काढून टाकते. सक्रिय घटक चांगल्या प्रकारे शोषण्यासाठी त्वचा तयार करते. एक्सफोलिएशन पेशींच्या नूतनीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी मृत त्वचेच्या पेशी काढून टाकते. फिजिकल स्क्रब, केमिकल एक्सफोलियंट्स किंवा एन्झाइम-आधारित उत्पादने वापरून केले जाऊ शकते.

**स्टीम (पर्यायी) :** खोल साफ करण्यासाठी छिद्र उघडते. सहज काढण्यासाठी ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्स मऊ करण्यास मदत करते.

एक्सफॉलिएशन (आवश्यक असल्यास) ब्लॅकहेड्स, व्हाइटहेड्स आणि बंद झालेले छिद्र काढून टाकते. त्वचेचे नुकसान किंवा डाग पडू नयेत म्हणून हळुवारपणे केले पाहिजे.

**मसाज :** रक्त परिसंचरण आणि लिम्फॅटिक ड्रेनेज वाढवते. आराम करण्यास मदत करते आणि त्वचेची लवचिकता सुधारते.

**फेसपॅक :** त्वचेचा प्रकार आणि चिंता यावर आधारित (हायड्रेटिंग, ब्राइटनिंग, शुद्धीकरण, वृद्धत्व विरोधी). त्वचेला सुखदायक आणि टवटवीत करण्यात मदत होते.

**टोनिंग :** त्वचेचे पीएच संतुलित करते आणि छिद्र घट्ट करते.

सीरम आणि मॉइश्चरायझर्स चांगल्या प्रकारे शोषण्यासाठी त्वचेला तयार करते.

**सीरम :** लक्ष्यित फायद्यांसाठी व्हिटॅमिन सी, हायलुरोनिक ॲसिड किंवा पेप्टाइड्ससारख्या केंद्रित घटकांचा वापर करते. दीर्घकाळ टिकणाऱ्या प्रभावांसाठी त्वचेमध्ये खोलवर प्रवेश करते.

**मॉइश्चरायझिंग आणि हायड्रेशन :** ओलावा मध्ये लॉक आणि त्वचा अडथळा मजबूत. कोरडेपणा प्रतिबंधित करते आणि त्वचा कोमल ठेवते.

**सूर्य संरक्षण (दिवसाचे फेशियल) :** त्वचेचे अतिनील हानीपासून संरक्षण करण्यासाठी SPF लागू करणे महत्त्वाचे आहे. दीर्घकाळ परिणाम सुनिश्चित करते आणि चेहऱ्यानंतरची संवेदनशीलता प्रतिबंधित करते.

**चेहऱ्यावरील काळजीनंतरचे मार्गदर्शन :** क्लायंटला आफ्टरकेअरबद्दल शिक्षित करणे, सूर्यप्रकाश टाळणे आणि योग्य स्किनकेअर रूटीनसह परिणाम राखणे.



किचन टिप्स

हेमा वेलणकर



# पुरणाच्या पोळ्या

महाराष्ट्रीयन घरांमध्ये पक्वान्न म्हणजे पुरणाची पोळी. आज वेळेअभावी पुरणाच्या पोळ्या बहुतेक घरांत विकत आणल्या जातात. विकतच्या पोळ्या चांगल्या असल्या तरी त्यामध्ये मैदा वापरला जातो. कणीक वापरून केलेल्या पोळ्या जास्त स्वादिष्ट आणि हरवाळ होतात. अजिबात मैदा न वापरता नुसत्या कणकेच्या पातळ, मऊ, हरवाळ पोळ्या या टिप्स वापरून करता येतील.

कणीक पातेल्याला मलमलच फडक बांधून त्यावरून वस्त्रगाळ करून घ्या. कणकेमध्ये चवीनुसार मीठ घालून पोळ्याना भिजवतो त्यापेक्षा किंचित घट्ट कणीक भिजवा. तो गोळा एका फडक्यात बांधून दोन तीन तास पाण्यात पूर्णपणे बुडवून ठेवा. पोळी लाटताना वरून लावायला कणीक न वापरता नेहमी तांदळाची पिठी वापरा. त्यामुळे पोळी मस्त फिरतं.

कणकेच्या गोळ्याच्या दुप्पट तरी पुरणाचा गोळा घ्या. वरील प्रकारे कणीक भिजवली असेल तर हे अजिबात कठीण नाही.

पोळपाटाला मलमल किंवा सुती फडके बांधा. त्याने पोळी पोळपाटाला चिकटत नाही. फडके न वापरता बटर पेपर ठेवला तरी चालेल. डायरेक्ट पोळपाटावर पोळी कधी लाटू नका. लागेल तशी पिठी घेऊन हलक्या हाताने पोळी लाटा आणि अलगदपणे तव्यावर टाकून भाजून घ्या.

# महिला सबलीकरण वास्तव व व्यथा

भाग ३



कुंदा बच्छाव-शिंदे

खरेतर ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री कामगारांनी रूटगर्से चौकात जमून स्वतःच्या हक्कासाठी प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली व स्त्रियांच्या या ऐतिहासिक कार्यासाठी ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. म्हणजे स्त्री त्या काळापासून तर आजतागायत स्व-हक्कासाठी, स्वसन्मानासाठी लढा देत आहे.

मात्र आज एकविसाव्या शतकात स्त्रीने स्वतःची शक्ती ओळखली आहे. ती आपल्या अधिकारांसाठी जगणे शिकली आहे, आजच्या स्त्रीने सिद्ध केले आहे की स्त्रिया एकमेकांच्या शत्रू नाहीत तर सहकारी आहेत. स्त्री सशक्त आहे आणि ती तिच्या शक्तीची अभिव्यक्ती करू लागली आहे. स्त्रिया आता आपला आत्मसन्मान जपू लागल्या आहेत. त्याचबरोबर आपल्या घरातील व आजूबाजूच्या स्त्रियांचाही सन्मान त्या करू लागल्या आहेत. घराच्या संरक्षण कवचातून बाहेर येऊन तिने अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्वतःच मिळविले आहे. उच्च शिक्षणासाठी मुली लहान लहान शहरातून मोठ्या शहरांमध्ये येऊन राहणे, नोकरी करणे, आपली ओळख निर्माण करणे यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढीला लागला आहे. आत्मविश्वासाबरोबर आपले मत ठामपणे मांडू लागल्या आहेत. आपल्या देशातच काय तर विदेशात जाऊन त्या शिक्षण घेऊ लागल्या आहेत. आज लग्नासाठी वर पसंत करताना मुलींच्या मताला प्राधान्य दिले जात आहे. शिकून काय करणार शेवटी, त्यांना चूल आणि मुलं तर सांभाळायचे आहे अशा रूढी-परंपरा झुगारून देऊन लग्नाआधीच मुलींना उच्च शिक्षण देणे व त्यांना आत्मनिर्भर करणे ही मानसिकताही आता समाजात स्वीकारली जात आहे. आजची आधुनिक तरुणी स्वतःचा सन्मान करत अन्यायाच्या विरोध करण्याच्या परिणामांना न जुमानता अन्यायाचा विरोध करत आहे. आजची स्त्री खऱ्या अर्थाने सखी सहचारिणी बनली आहे. ती पतीची दुःख वाटून घेऊन त्याला प्रत्येक सुख-सुविधा मिळविण्यात बरोबरीने हातभार लावू लागली आहे. शिक्षित आणि घराबाहेर जाऊन कमावू लागलेली आजची आई मुलांप्रति अधिक जागृत आणि संवेदनशील बनली आहे. मुलांचे पालनपोषण करताना ती त्यांना निर्णय घेण्यातही भागीदार बनली आहे. मुले आपल्या आईच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगू लागले आहेत. आजची स्त्री खऱ्या अर्थाने सासर व माहेरसंबंधी आपले कर्तव्य पूर्ण करत आहे. स्त्रीच स्त्रीची शत्रू असते हा कलंक देखील तिने पुसून टाकला आहे. सासू-सून यांच्यातील युद्ध आता फक्त टीव्ही मालिकांमधूनच पहावयास मिळत आहे; कारण आजच्या सासू-सुना एकमेकांच्या वैरी नाही तर मैत्रिणी बनल्या आहेत. म्हणजे आता स्त्रीला बिचारी समजण्याचा, अबला समजण्याचा काळ गेला आहे असे म्हणायला हरकत नाही.

आज स्त्रियांनी स्वतःच्या आत्मसन्मानाचा सन्मान केला तर तिच्या सबलीकरणासाठीच्या कुठल्याही अभियानांची गरज पडणार नाही.

नारी तू घे अशी उंच भरारी
फिरून पाहू नकोस माघारी..
ताकद तुझ्या मनगटात भारी,
तूच तुझ्या भाग्याची विधाती..!!

समाप्त

# उपवासाचे पापड

अनुपमा जोशी



साहित्य : अडीच किलो बटाट्याला अर्धा किलो साबुदाणा भाजून व नंतर दळून घ्यावा. चवीनुसार हिरवी मिरची, जिरे, मीठ.

कृती : आदल्या दिवशी बटाटा उकडून, साल काढून, किसून डब्यात भरून फ्रीजमध्ये ठेवा. दळलेला साबुदाणा रात्री भिजत घाला. सकाळी कोरडा झाला असेल तर त्यात थोडे गरम पाणी घाला. मोठ्या कढईत थोडे तेल किंवा तूप घालून त्या साबुदाण्याला एक वाफ काढा. साबुदाणा पारदर्शक होईपर्यंत परतत राहा. झाकण ठेवून वाफ येऊ द्या, मग गॅस बंद करा. परातीत बटाटे, साबुदाणा, हिरवी मिरची, मीठ व जिरे याची पेस्ट करा व त्यात टाकून चांगले मळून घ्या. छोटे-छोटे गोळे करा. एका माठ्या प्लास्टिकच्या कागदावर लाटी ठेवा. वरून प्लास्टिकच्या पेपर गोलाकार कापून घ्या. त्याला तेल किंवा तुपाचा हात लावून घ्या, तो त्यावर ठेवा व बोटाने ती लाटी पसरावा. फार पातळ करू नका व जाड पण नको मीडियम पापड करा.

महत्त्वाचे

## येवला शहरातील प्रशासकीय संकुल येथे स्वच्छता मोहीम

**येवला : प्रतिनिधी**




येथील नगर परिषद तहसील कार्यालय, पंचायत समिती, शहर पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने येवला शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, मुख्याधिकारी तुषार आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा अभियानांतर्गत या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी सात कलम कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यात कार्यालयाने आपल्या ऑफिस व परिसर स्वच्छ केला पाहिजे. त्या अनुषंगाने येवला प्रशासकीय संकुल येथे स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेमध्ये सुमारे ३०० कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यात नगरपरिषद, तहसील ऑफिस, पंचायत समिती, पोलीसपाटील संघटना आदी कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. या मोहिमेमध्ये सुमारे ५ टन कचरा जमा करण्यात आला. यामुळे या मोहिमेसाठी ५ घंटागाड्या व २ ट्रॅक्टर व साहित्य येवला नगरपरिषदेकडून पुरवण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, मुख्याधिकारी तुषार आहेर, संदीप वायाळ, गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, उपमुख्याधिकारी चंद्रकांत भोये, बांधकाम अभियंता राजेंद्र सुतावणे, कर व निरीक्षक रोहित पगार, स्वच्छता निरीक्षक पूनम भामरे, दीपाली सरोदे, बाळू पारधी, विष्णू हाडके, तुषार नालकर, शिवशंकर सदावर्ते, राजेंद्र जांभुळकर, नितीन आहेर, किरण अहिरे, गौरव चुंबळे, शीतल शेळके, गोपी जावळे, संजय लोंढे, दीपक जावळे, नितीन लोणारी, केशव बिवाल, संदीप बोढरे, नितीन हारके, संजय लोणारी, राजेश निकम, सोमनाथ भूरूक आदींनी स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. प्रशासकीय संकुल येथे सुमारे तीन तास स्वच्छता मोहीम करण्यात आली.

## गोदावरी नदीचे प्रदूषण रोखून पायाभूत सुविधा द्या : खा. भगरे

**दिंडोरी : प्रतिनिधी**



नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीतील प्रदूषण रोखत पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन करण्याची मागणी खा. भास्कर भगरे यांनी संसदेत केली आहे. संसदेत बोलताना भगरे यांनी गोदावरी नदीची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. नाशिक महानगरपालिका हद्दीतील सांडपाणी असेल किंवा कंपन्यांचे दूषित पाणी यामुळे संपूर्ण नदीपात्र अत्यंत प्रदूषित झाली आहे. चांदोरी, सायखेडा, नांदूरमध्यमेश्वर या भागामध्ये प्रचंड पाण्याचा घाण वास येऊन जनपर्णी मोठ्या प्रमाणात वाढून जलचर प्राणी मोठ्या प्रमाणात मरण पावत आहे. तरी यावर ठोस उपाययोजना करण्यात यावी. त्याचबरोबर कुंभमेळा पावसाळ्याच्या काळात येत असल्यामुळे अतिवृष्टी, गोदावरी नदीचा पूर, चिखलवरती शाश्वत उपाययोजना कराव्यात. विविध रस्त्यांतील पूल, नाशिक-त्र्यंबकेश्वरला जोडणारे रस्ते, पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सिंहस्थाचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी केली.

## येवला तालुका वारकरी महामंडळाच्या तालुकाध्यक्षपदी भाऊसाहेब महाराज



**आडगाव रेपाळ : वार्ताहर**

अखिल भाविक वारकरी मंडळ नाशिक जिल्हा कार्यकारिणीत पारेगावचे व येवला येथील प्रथितयश उद्योजक आणि वारकरी संप्रदायासाठी तळमळीने सेवाभावी कार्य करणारे समाजसेवक हभप बाबासाहेब महाराज खिल्लारे यांची जिल्हा प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे, तसेच संप्रदायात गेली साडेपाच दशके निष्काम सेवाव्रती प्रसिद्ध कीर्तनकार मुखेडचे वारकरी भूषण हभप भाऊसाहेब महाराज आहेर यांची येवला तालुका अखिल भाविक वारकरी मंडळ तालुका अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे ज्येष्ठ सहकार नेते अंबादास बनकर, हभप विठ्ठल अण्णा शेलार, हभप जनार्दन अण्णा खिल्लारे, मा. सभापती प्रवीण गायकवाड, कृउबा संचालक सचिन आहेर, हभप आप्पासाहेब गायकवाड, हभप शिवाजी महाराज आडगाव, हभप बद्रिनाथ आहेर, नारायण गुंजाळ मा. सरपंच, आडगाव व पारेगाव मुखेड पंचक्रोशीतील भाविक वारकरी यांनी अभिनंदन व स्वागत केले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे, प्रदेशाध्यक्ष जोतिराव महाराज चांगभले, जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर, जिल्हा उपाध्यक्ष हभप विलास महाराज सांगळे, सचिव हभप साहेबराव महाराज अनवट, दिंडोरी तालुकाध्यक्ष हभप आबासाहेब महाराज गाडे अक्राळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

संत निवृत्तिनाथ संजीवन समाधी मंदिराच्या बाजूस असलेल्या गोविंदबाबा मठात सुवर्ण महोत्सवी हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. संत तुकाराम महाराज बीज रविवार दिनांक १६ मार्च २०२५ पासून ते फाल्गुन वद्य नवमी रविवार दिनांक २३ मार्च २०२५ पर्यंत अखंड हरिनामाचा गजर होत आहे. वैकुंठवासी संत गोविंदबाबा यांनी सुरू केलेल्या सत्यधर्मजागृतीचे हे ५३ वे वर्ष आहे. यानिमित्ताने सकाळ व सायंकाळ नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन तर दुपारी प्रवचन असा हा भक्तीरसाचा लाभ येथे भाविकांना घेता येणार आहे. ह.भ.प. गोविंद महाराज शिरोळे, ह.भ.प. अतुल महाराज परदेशी, ह.भ.प. अर्जुन महाराज जगताप, ह.भ.प. रोहन महाराज पाडेकर, ह.भ.प. मंगेश महाराज ढवळी, ह.भ.प. योगेश महाराज होन, ह.भ.प. नवनाथ महाराज कांबळे, ह.भ.प. नरायण महाराज पोले, ह.भ.प. आचार्य सुरेश महाराज, ह.भ.प. मोहन महाराज पगार, ह.भ.प. जगदीश महाराज जोशी, ह.भ.प. विवेक महाराज शास्त्री, ह.भ.प. प्रल्हाद महाराज शास्त्री, ह.भ.प. राजेंद्र महाराज तुपे, ह.भ.प. माऊली महाराज सातारकर, ह.भ.प. जयंत महाराज गोसावी, ह.भ.प. निवृत्ती महाराज माळी

# येवल्यात आज रंगणार रंगांचे सामने

## धूमधडाक्यात सण-उत्सव साजरे करणारे शहर म्हणून ओळख

**येवला : विलास पगारे**

येवला शहर म्हटले की, ऐतिहासिक अन् सांस्कृतिक तसेच धूमधडाक्यात सण-उत्सव साजरे करणारे शहर म्हणून ओळखले जाते. रंगपंचमी उत्सव तर येवला शहरात मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो.

सुमारे दीडशे ते दोनशे वर्षांपासून हा रंगपंचमी उत्सव साजरा केला जातो. आज बुधवार दि. १९ रोजी रंगपंचमी आहे. या निमित्ताने येवला शहरात रंगांचे सामने खेळून रंगपंचमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. रंगपंचमी हा सण आनंद, उत्साह आणि प्रेम यांचे प्रतीक असणारा सण-उत्सव आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रंगपंचमीच्या दिवशी वैशिष्ट्यपूर्ण रंगांचे सामने खेळून शहरातील नागरिक एकमेकांवर रंगांची उधळण करून रंगपंचमी उत्सव साजरा करीत असतात. महाराष्ट्रात नव्हे तर देशात फक्त येवला शहरात रंगांचे सामने खेळून एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने रंगपंचमी उत्सव साजरा करण्यात येतो. शहरात सकाळी ८ला बच्चेकंपनीच्या माध्यमातून रंगपंचमी उत्सवाला प्रारंभ करण्यात येतो.



**असे होणार रंगांचे सामने**

रंगपंचमी उत्साहानिमित्ताने येवला शहरातील टिळक मैदान येथे सायंकाळी ५ वाजता रंगांचा पहिला सामना तर शहरातील डी.जी. रोड येथील मैदानात रंगांचा दुसरा सामना सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. दुतर्फा दोन्ही बाजूने ट्रॅक्टरवर रंगांचे टिपडे ठेवून युवक एकमेकांवर रंगांचा वर्षाव करीत असतात. या रंग उत्सवात शेकडो युवक सहभागी होऊन रंग खेळण्याचा आनंद लुटत असतात. या रंगोत्सवात युवक सहभागी होत असतात तर विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर मंडळी रंगोत्सवाचा आनंद लुटताना दिसून येतात. एकमेकांवर रंगांचा वर्षाव करण्यात येतो. येथील रंगांचा सामना आटोपल्यानंतर येथील सायंकाळी ७ वाजेच्या दरम्यान सर्व रंगप्रेमी डी.जे. रोड येथील प्रांगणात रंगोत्सव साजरा करून एकमेकांवर विविध रंगांची उधळण करून रंगपंचमी उत्सव साजरा करतात.

**रंगपंचमीची आचारसंहिता**

कोणत्याही दुकानावर, दुकानाच्या बोर्डावर, घराच्या भिंतींवर रंग फेकू नये, रंगांचे सामने खेळताना प्लास्टिकचे डबे, बादल्या वापरण्यात याव्यात, शर्ट फाडून विजेच्या तारांवर फेकू नये, रंगांचे सामने बघण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांवर रंग टाकू नये, बळजबरीने कोणत्याही व्यक्तीच्या अंगावर रंग टाकू नये, रंग खात्रीशीर दुकानदाराकडून विकत घ्यावेत, अशा प्रकारची आचारसंहिता रंगपंचमी उत्सव समितीच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे.




## जि. प. प्राथमिक शाळा बारशिंगवेत आनंद मेळावा

**वासाळी : वार्ताहर**

इगतपुरी तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा बारशिंगवे मराठी माध्यमातील इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांचा बालआनंद मेळावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना कमवा व शिका याची जाणीव होण्यासह विविध व्यवसाय व व्यवहाराची माहिती व्हावी, यासाठी हा बालआनंद मेळावा घेण्यात आला.

आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल लावले होते. उपस्थित विद्यार्थ्यांनी व पालकांना पदार्थ विकत घेऊन मनसोक्त आनंद लुटला. स्टॉलवरील पदार्थ विक्री, जाहिरात, सादरीकरण याबाबतचा नावीन्यपूर्ण आगळावेगळा अनुभव घेताना विद्यार्थ्यांना वेगळी अनुभूती अनुभवायला आली. यात पाणीपुरी, भेळ, पालेभाज्या, गुलाबजामून, आप्पे, कचोरी, वडापाव, इटली, मसाला पापड, भजे, शिरा, ठेचा भाकर, पोहे, उसळ, चॉकलेट, चायनीज पदार्थ असे वेगवेगळे पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः बनवले होते. आपण केलेले पदार्थ विकताना त्यांना वेगळाच आनंद मिळत होता. या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देवाण-घेवाण व्यवहार तसेच स्वतः केलेल्या कामाचा आनंद प्रत्यक्ष व सहज घेता आला. काही अनुभव हे पुस्तकांपेक्षा प्रात्यक्षिकातून उत्कृष्ट रीतीने दिले जातात. त्यातील हा आनंद मेळावा हे उत्कृष्ट उदाहरण होय.




## म्हसरूळ मातोश्री फार्मसी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन

**येवला : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासह व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी म्हसरूळ (नाशिक) येथील मातोश्री फार्मसी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या निमित्ताने विद्यार्थ्यांचा गुणगौरव देखील करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून इंडिया बुल्सचे सहाय्यक व्यवस्थापक शंकर कोकणे, सीएसआर नीलेश सोनवणे, संतोष एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष रामदास दराडे, संचालक गोकुळ दराडे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कारांचे सदरीकरण केले. पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून पालक महिलांसाठी पैठणीची सोडत ठेवण्यात आली होती. विजेत्या पालकांना पाहुण्यांच्या हस्ते पैठणी भेट देण्यात आली. मातोश्री शिक्षण संकुलाने नाशिक शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे अनेक होतकरू विद्यार्थी शिकून नोकरी व व्यवसायात नावलौकिक करत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री प्राचार्य डॉ. सचिन कापसे, प्रा. गायत्री बोडके, प्रा. श्रीकृष्ण जगदाळे, प्रा. रोहित आघाडे, प्रा. रविना बर्वे, प्रा. कोमल मटाले, प्रा. हर्षदा बागूल, प्रा. सुवर्णा ताठे आदींनी परिश्रम घेतले.

## सहकार क्षेत्रातील बदलांचा अभ्यास गरजेचा

### हिरामण ढोरे : निफाडला सहकार प्रशिक्षण कार्यक्रम

**निफाड : शहर प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रामध्ये कामकाज करत असताना कायद्याच्या बंधनात राहून तसेच सर्वांना विश्वासात घेऊन कामकाज करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नागरी सहकारी पतसंस्था, बिगरशेती सहकारी पतसंस्था, कर्मचारी सहकारी पतसंस्था यांचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद, उपविधी, सहकार क्षेत्रामध्ये होणारे नवनवीन बदल, शासकीय अध्यादेश, परिपत्रके यांबरोबर नियमक मंडळ व सहकार कायदा यांवर मार्गदर्शन करून सहकार टिकणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सहकार प्रशिक्षण केंद्र पुणे येथील प्राचार्य हिरामण ढोरे यांनी केले.

ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, सहाय्यक निबंधक कार्यालय, निफाड अंतर्गत निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या सभागृहात झालेल्या सहकार प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते. व्यासपीठावर निफाडचे सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड, विभागीय प्रकल्पाधिकारी एजाज शेख, विभागीय अधिकारी संजय मानकर, जिल्हा सहकार विकास अधिकारी एम. एम. वायकर, सहकार अधिकारी पी. एम. धनगर, सहकार विकास अधिकारी ए. पी. राजनोर, सहकार अधिकारी कैलास सोनवणे, शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे, कार्यवाह राहुल दवते, बाबा गुंजाळ, बाळकृष्ण वाजे, किरण जाधव आदी होते.

यानंतर निफाडचे सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड यांनी सहकार अधिनियम आणि सहकार कायद्याविषयी उपस्थितांना विस्तृत माहिती दिली. याप्रसंगी नीळकंठ कुंदे, रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे, बाजीराव पिठे, माधवी शेलार, प्रभाकर महाले, केशव रायते, उमेश बिवाल, विलास चव्हाण, शशिकांत बोराडे, संगीता सोनवणे, सविता सोनवणे, संजय खालकर, सुनील कांडेकर, सोपान उगले, बाळासाहेब बोरगुडे, शरद सानप, मधुकर थोरात, मोहन निकम, नंदू मोरे, जयश्री पाटील, प्रकाश दुधाळे, विनायक बेलेकर, महेंद्र बानबेरू, सारत शिलावट, सुभाष निफाडे, विलास मोरे, अशोक मिसाळकर, विलास वडघुले उपस्थित होते.



## राष्ट्रवादी अजितदादा गटातर्फे सभासद नोंदणीस सुरुवात

**दिंडोरी : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या सभासद नोंदणीस अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला.

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने तयारी सुरू केली आहे. प्रत्येक गावातील जनतेच्या विविध समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी गावोगाव पक्षाचे संघटन मजबूत करत सभासद नोंदणीच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांना राष्ट्रवादी परिवारात आणावे, असे आवाहन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले. ज्येष्ठ नेते गणपतराव पाटील, बाळासाहेब जाधव, प्रकाश वडजे, सुरेश मामा कळमकर, सदाशिव शेळके, शहाजी सोमवंशी, विलासराव कड, विश्वासराव देशमुख, प्रकाश शिंदे, तालुकाध्यक्ष राजेंद्र उफाडे, तालुका युवक अध्यक्ष कृष्णा मातेरे, गोकुळ झिरवाळ, महेंद्र बोरा, दत्तात्रय गटकळ, विष्णुपंत पाटील, सम्राट राऊत, मधुकर भरसट, कचरू पाटील, दत्तू चव्हाण, संजय केदार, संजय मोरे, मधुकर बोरस्ते, सारंग घोलप, अजित कड, अतुल निगळ, लक्ष्मण बागुल, रावसाहेब जाधव, मिथुन गवळी, अशोक बुवा, पिंटू मोंढे, प्रीतम देशमुख, विनोद देशमुख, गणपत बोडके, अमोल पवार आदी उपस्थित होते.

## दहेगावमध्ये गहू काढणी करणाऱ्या तरुणाचा मृत्यू

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड तालुक्यातील दहेगाव बसस्थानकाजवळ १६ मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सुरेंद्र कुमार बलराम (वय २९, रा. बालू अठरा, हरियाणा) या तरुणाचा अचानक मृत्यू झाला. ते दहेगाव येथे गहू काढणीच्या मशीनवर काम करत होते. सविस्तर वृत्त असे की, सुरेंद्र कुमार बलराम हे दहेगाव येथे गहू काढणीच्या मशीनवर काम करत असताना अचानक त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने मनमाड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक गंभीर झाल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालय, मनमाड येथे हलवण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पवनकुमार बाल किसन यांनी चांदवड पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, हवालदार सांगळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**म्हेळुस्के : वार्ताहर**



राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जात नसल्याने व त्याबाबत वारंवार आश्वासन देऊनही आश्वासित मागण्यावर निर्णयांची अंमलबजावणी होत नसल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक नाराज आहेत. आपण पदभार घेतल्यापासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकदाही स्वतंत्र बैठक घेतली नाही व समस्यांचे निराकरणही केले नाही. याबाबतचे निवेदन दिंडोरी तालुका कार्यकारिणी तसेच सदस्यांनी दिंडोरी तहसीलदार यांना दिले आहे.

निवेदनात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अर्धवेळ, विना तसेच अंशतः अनुदानावरील नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी व सेवानिवृत्तांना या योजनेचा तातडीने लाभ द्यावा, १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, राज्यातील अंशतः अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ देण्यात यावी. जाहीर केलेले अनुदान त्वरित देण्यात यावे, मान्यताप्राप्त आयटी शिक्षकांच्या समायोजनाबाबतचा शासनादेश त्वरित निर्गमित करण्यात यावा, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना त्वरित लागू करावी.

निवडश्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी, प्रलंबित वाढीव पदांचे समायोजन त्वरित करावे, विनाअनुदानित सेवेत असलेल्या शिक्षकांची अनुदानितकडे बदली करून त्यांच्या प्रस्तावास शिक्षण उपसंचालकांनी त्वरित मान्यता द्यावी, संचालक कार्यालयात त्रुटी पूर्तता केलेल्या प्रलंबित वाढीव पदाच्या फाइल्स त्वरित मंत्रालयात मागवून त्या पदांना मान्यता देऊन त्यांच्या समयोजनाचे त्वरित आदेश द्यावेत, वेतन आयोगाचे थकीत हप्ते त्वरित द्यावेत, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा कार्यभार सतत तीन वर्षे कमी झाला, शून्य झाला तरच अतिरिक्त घोषित करावे, अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया बंद करावी, शिक्षकांची सर्व रिक्त पदे त्वरित भरावीत आदी मागण्या आहेत. यावेळी जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे सह कार्याध्यक्ष प्रा. शिवाजी कदम, जिल्हा संघटक प्रा. संतोष उफाडे, खजिनदार प्रा. हेमंत घडवजे तसेच तालुक्यातील शिक्षक सदस्य उपस्थित होते.

## शिधापत्रिकाधारक भगिनींना साड्यांची प्रतीक्षा

### होळीचा सणही उलटला; रेशन दुकान चालकांकडे चकरा



**निफाड : विशेष प्रतिनिधी**

होळीच्या निमित्ताने रेशन दुकानांतून साड्यांचे वाटप होणार होते. मात्र, अजूनही या साड्यांचे वितरण नाही. त्यामुळे अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना या साड्या कधी वितरण होणार, असा प्रश्न लाडक्या बहिणींकडून केला जात आहे.



अंत्योदय शिधापत्रिकाधारक महिलांना साड्या दिल्या जाणार आहे. त्यासंदर्भातील आदेश राज्याच्या पुरवठा विभागाने काढले होते. महायुती सरकारने लाडक्या बहिणींवर लक्ष केंद्रित केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांना परिवहन महामंडळाच्या बसेसमधून अर्ध्या तिकिटावर प्रवास करण्याची योजना आणली.

त्यानंतर विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजना आणत १५०० रुपये महिलांच्या खात्यात देणे सुरू केले. त्यामुळे महिलांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरभरून मतदान केले. आता महायुतीच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारनेही महिलांवर लक्ष केंद्रित केले आहे.

होळीच्या निमित्ताने रेशन दुकानातून साड्यांचे वाटप होणार होते, मात्र अद्याप त्यासंदर्भात पुरवठा विभागाची हालचाल नसल्याचे लक्षात येत आहे. अंत्योदय शिधापत्रिकाधारक महिलांना साड्या देण्यासंदर्भात अन्नधान्य पुरवठा विभागाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील सर्व रेशन दुकानांवर अंत्योदय कार्डधारकांच्या संख्येनुसार साड्या उपलब्ध करून दिल्या जाणार होत्या.

महिलांना होळीनिमित्त साडी मिळणार असल्यामुळे लाडक्या बहिणी आनंदात होत्या. परंतु साड्या अजूनही मिळाल्या नसल्याने बहिणी नाराज आहेत.

## शहाजीराजे भोसले जयंती उत्सव उमराणे येथे साजरा

**उमराणे : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संकल्पक शिवश्री शहाजीराजे भोसले जयंती उत्सव जाणता राजा मित्रमंडळ व ग्रामस्थांच्या वतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकी संघाचे चेअरमन रत्नाकर देवरे होते.

मंगळवार दि.१८ मार्च २०२५ रोजी छत्रपती संभाजीराजे चौकात शिवश्री शहाजीराजे भोसले यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमतः हिंदवी स्वराज्य संकल्पक शिवश्री शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेचे पूजन राजाराम दौलत देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. राज भाऊसाहेब देवरे, उद्योजक नितीन सोनार आदी नागरिकांचा वनरक्षक अनिल पवार यांच्या हस्ते शिवचरित्र भेट देऊन सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून नानाजी देवरे, दिनेश वाघ, ईश्वर ठाकरे, भाऊसाहेब देवरे, केदा देवरे, योगेश शिरुडे, विक्रम देवरे, वामन खैरनार, बळीराम पवार, सचिन देवरे, विनोद पाटणी, अनिल सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष नंदन देवरे यांनी प्रस्ताविकात हिंदवी स्वराज्य संकल्पक शिवश्री शहाजीराजे भोसले यांच्या कालखंडातील शौर्याची माहिती विशद केली.

महत्त्वाचे




## सिन्नरला राष्ट्रवादी अजित पवार गटाची सभासद नोंदणी सुरू

**सिन्नर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा तळागाळातील जनमाणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सभासद नोंदणीस शहरात सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष गायकवाड, ज्येष्ठ नेते राजेंद्र चव्हाण, माजी नगराध्यक्ष नामदेव लोंढे, युवकचे जिल्हा कार्याध्यक्ष आदित्य गव्हाणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष कदम, विधानसभा अध्यक्ष राजेंद्र घुमरे, शहरध्यक्ष सुभाष कुंभार, युवक तालुकाध्यक्ष योगेश आव्हाड, युवक शहराध्यक्ष अक्षय उगले, विध्यार्थी तालुकाध्यक्ष यश कोतवाल आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शहरासह तालुक्यात राष्ट्रवादीची ताकद वाढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## अवैध दारू विक्री विरोधात विखरणी ग्रामपंचायत आक्रमक

**येवला :** अनेकांचे संसार उद्ध्वस्त करणारी दारू विक्री विखरणी गाव परिसरात सध्या अवैद्यपणे विक्री सुरू आहे. बिनधास्तपणे २४ तास हा व्यवसाय सुरू असल्याने आता अवैध दारू विक्री बंदीसाठी ग्रामपंचायत सरसावली असून, २० मार्च रोजी महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. वारंवार ग्रामस्थांनी तक्रार करूनही अवैध दारूविक्री थांबेलली नाही. त्यामुळे गावातील महिला आक्रमक झाल्या असून, सरपंच ज्योती शेलार यांनी २० मार्च रोजी सकाळी १० वाजता विशेष महिला ग्रामसभेचे नियोजन केले आहे. ग्रामपंचायत कार्यालय आवारात गावातील महिलांची विशेष ग्रामसभा बोलावली आहे. ग्रामसभेसाठी तालुका पोलि निरीक्षक संदीप मंडलिक यांना निमंत्रण दिले आहे. विखरणी परिसरातील गावांच्या मध्यावर व्यापारी दृष्टीने महत्वाचे गाव आहे. हिंदू मुस्लिम बांधव गावात गुण्यागोविंदाने राहत असताना गावाची ओळख अवैध दारू विक्रीमुळे गाव बदनाम होत आहे.गावातील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर अवैधपणे दारू विक्री केली जात असून गावातील १३ ते १४ वर्षाचे लहान मुले दारूच्या व्यसनाच्या आहारी जात आहे.त्यामुळे गावातील महिलांनी आपले कुटुंब,संसार या व्यसनापासून वाचविण्यासाठी एकत्र आले आहे. गावात दारूबंद व्हावी हा महिलांचा ठाम निर्णय आहे आणि यावर पोलिसांनी कार्यवाही करावी यासाठी विशेष महिला ग्रामसभेचे आयोजन केले असल्याचे सरपंच ज्योती शेलार व ग्रामसेविका छाया ठाकरे यांनी सांगितले. ग्रामसभेच्या माध्यमातून प्रशासनाकडे पाठपुरावा करून अवैधपणे होणारी दारू विक्री बंद करण्यासाठी साकडे घालणार आहे. तरीही दखल न झाल्यास पुढचे पाऊल उचलले जाईल, असे त्यांनी सांगितले.

# आ. नितीन पवार समर्थकांचे आंदोलन

## बदनामी करणाऱ्यावर कठोर करावाईची मागणी

**कळवण : प्रतिनिधी**

**आमदार नितीन पवार व जयश्री पवार यांच्याविरोधात अभोणा पोलीस ठाण्यात खोटे, नाटे तक्रारी अर्ज करून त्यांची बदनामी करणाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार पवार समर्थकांनी तहसीलदार रोहिदास वारुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



ग्रामविकास अधिकारी रामराव महाजन यांनी शिंगाशी, चणकापूर, अभोणा येथील नोकरीवेळी विविध विकासकामांत केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी, या मागणीसाठी मंगळवारी प्रशासकीय कार्यालयाबाहेर आमदार पवार समर्थकांनी ठिय्या आंदोलन करून तहसीलदार रोहिदास वारुळे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे, मतदारसंघातील सर्वपक्षीय सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते विनंती पुर्वक निवेदन करतो की, दि. १५ फेब्रुवारी रोजी शीतल रामराव महाजन/ गायकवाड यांचे भाऊ योगेश काशीनाथ गायकवाड यांनी कळवण-सुरगाणा मतदारसंघाचे आमदार नितीन अर्जुन पवार व त्यांच्या पत्नी जयश्री नितीन पवार यांच्याविरोधात अभोणा पोलीस ठाण्यात अत्यंत खोटे, नाटे, बिनबुडाचे आरोप असलेला तक्रारी अर्ज दिला आहे. सदर तक्रारी अर्जाच्या पोहचवर संबंधित ठाणे अमलदाराची स्वाक्षरी घेऊन सदरचा तक्रारी अर्ज त्यांनी सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. तसेच त्यांनी विविध वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांवर बातम्या प्रसारित करून लोकप्रिय व कार्यक्षम आमदार यांची विनाकारण बदनामी सुरू केली आहे.

शीतल महाजन यांचे पती व योगेश गायकवाड यांचे मेहुणे रामराव महाजन हे चणकापूर व अभोणा ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) म्हणून शासकीय सेवेत आहेत. त्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत आपल्या पत्नी म्हणजे शीतल महाजन यांचे नावे सन २०२० ते २०२१ साली शबरी आवास घरकुल योजनेचा लाभ घेतला आहे. जो शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना घेता येत नाही. तसेच महाजन ज्या ज्या ठिकाणी कार्यरत होते व आहेत त्या त्या ठिकाणी त्यांनी महात्मा गांधी रोजगार हमीसारख्या योजनेत आर्थिक गैरव्यवहार केला आहे.

याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. परंतु शीतल महाजन यांचे पती ग्रामविकास अधिकारी असल्यामुळे त्यांनी हे प्रकरण गेल्या तीन ते चार वर्षांपासून दाबण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे तक्रारदार महिला ललिता बिरारी यांनी निवेदन देऊन आमदार नितीन पवार यांच्याकडे दाद मागितली होती. त्यानुसार त्यांनी विधानमंडळात लक्षवेधीद्वारे चौकशीची सूचना मांडली आहे.

विधिमंडळाने संबंधित विभागाच्या अधिकारी यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे शीतल महाजन व त्यांचे पती ग्रामविकास अधिकारी रामराव महाजन भयभीत झाले. यातून सुटका होण्यासाठी त्यांनी राजकीय स्टंटबाजी सुरू केली आहे.

औषध पीत आत्महत्या करण्याचा बनावट प्रयत्न करत राजकीय विरोधक असलेल्या आमदार नितीन पवार यांना बदनाम करण्याचा प्रयत्न त्या करत आहे. यावेळी नगराध्यक्ष कौतिक पगार, बाजार समिती सभापती धनंजय पवार, मधुकर जाधव, राजेंद्र भामरे, रमेश पवार, लक्ष्मण पवार, डी. एम. गायकवाड, रघुनाथ महाजन, युवराज गांगुर्डे, प्रभू जाधव, भगवान बागूल, रमेश गावित, ललिता बिरारी, अशोक पवार, कमल पवार, आदींसह मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते.

## नववर्षाच्या स्वागतासाठी ३० मार्चला शोभायात्रा

### सिन्नर सांस्कृतिक मंडळाचा उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

मराठी नववर्ष तथा पाडव्याच्या औचित्य साधून हिंदू पंचांगाप्रमाणे नववर्षाचे स्वागत करण्यासाठी सिन्नर सांस्कृतिक मंडळातर्फे रविवारी (दि.३०) सिन्नर शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ४० फुटी उंच गुढी उभारून या शोभायात्रेस प्रारंभ होणार असल्याची माहिती सिन्नर सांस्कृतिक मंडळाच्या वतीने देण्यात आली. या उपक्रमाचे हे तेरावे वर्ष आहे.

टाळ मृदंगाचा गजर, संतांचे भक्तीमय अभंगाचा जयघोष, पारंपारिक ढोल-ताशांच्या निनाद अशा वातावरणात मराठी व भारतीय संस्कृतीचा उद्घोष होणार आहे. पारंपरिक वेषातील घोडेस्वार, वासुदेव, गोंधळी, तुताऱ्या, अब्दागिरी, भगवे झेंडे, वाघ्या मुरळी, मल्लखांब, गणेशाची पालखी, वासुदेव, बोहाड्यातील सोंगे, लेझीम पथक, वेगवेगळे चित्र रथ, झांज पथक, बजरंगबलीच्या भव्य-दिव्य मूर्ती आदी आकर्षक व लक्ष्यवेधी पथके या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून शोभायात्रेला प्रारंभ होईल. गणेशपेठ-भिकुसा कॉर्नर - शिंपी गल्ली - लालचौक - गंगावेस खडकपुरा, जुनी नगरपालिका - महालक्ष्मी रोड - नाशिकवेस मार्गे नर्मदा लॉन्स येथे शोभायात्रेचा समारोप होईल. सिन्नरमधील सर्व सायकलिस्ट येथील पुरुष व महिला यांनी सायकल चालवून पर्यावरणपूरक संदेश शहरात देणार आहे. ढग्या डोंगर समिती, वनप्रस्थ फाउंडेशन तसेच अनेक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी विविध उपक्रमात भाग घेणार आहेत. सिन्नर सांस्कृतिक मंडळाच्या वतीने अध्यक्ष कृष्णाजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शोभायात्रा नियोजनाची तयारी करण्यात आली. सर्व पक्षीयांनी या मिरवणुकीत सहभागी व्हावे, असे आवाहन आवाहन कृष्णाजी भगत, प्रकाश नवसे, हेमंत वाजे, प्रा. राजाराम मुंगसे, प्रा. जावेद शेख, मनीष गुजराथी, भाऊसाहेब शिंदे, मनोज भंडारी, दत्ता जोशी, दत्ता बोराडे, अमोल बोराडे आदींसह सदस्यांनी केले आहे.

## कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करा

### खासदार वाजे यांचे केंद्रीय वाणिज्य मंत्री गोयल यांना साकडे

**सिन्नर : प्रतिनिधी**



**केंद्र शासनाने कांद्यावरील टक्के शुल्क लादल्याने दरात कमालीची घसरण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, त्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करावे, अशी मागणी खासदार राजाभाऊ वाजे यांनी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

देशांतर्गत घटत्या किमती, अतिरिक्त उत्पादन आणि वाढती जागतिक स्पर्धा यावर उपाय म्हणून कांद्यावरील २०% निर्यात शुल्क रद्द करण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान आणि बिहारमधून सर्वाधिक आवक झाल्यामुळे कांद्याचे दर प्रति किलो १५-२० रुपयांपर्यंत घसरले आहेत आणि त्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे. पाकिस्तान आणि चीनसारखे प्रतिस्पर्धी देश कांदे १२५ डॉलर्स प्रति टन स्वस्त देत आहेत.

ज्यामुळे पारंपरिकपणे भारताचे वर्चस्व असलेल्या पूर्व आशिया आणि आखाती राष्ट्रांमधील बाजारपेठा काबीज होत आहेत. बांगलादेशनेही भारतातून आयात कमी केली आहे. डिसेंबर २०२४ पासून निर्यातशुल्क सुरू राहिल्याने भारताची स्थिती आणखी कमकुवत झाली आहे. ज्याचा परिणाम शेतकरी आणि निर्यातदारांवर झाला आहे. त्यामुळे कांद्याच्या किमती स्थिर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी २० टक्के निर्यातशुल्क काढून टाकावे, प्रतिस्पर्धी निर्यातदारांविरुद्ध भारताची जागतिक स्पर्धात्मकता पुनर्संचयित करावी, भरघोस उत्पादन आणि जागतिक संधींसह शेतकरी आणि निर्यातदारांमध्ये पुढील त्रास टाळण्यासाठी निर्यातशुल्क उठवणे आवश्यक आहे, अशी विनंतीही खासदार वाजे यांनी गोयल यांना केली आहे.

## अवकाळीचे वातावरण, किरकोळ पावसाची शक्यता

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मंगळवार दि. १८ ते शनिवार दि. २२ मार्चदरम्यानच्या पाच दिवसांत ढगाळ वातावरणासहित अगदीच तुरळक ठिकाणी किरकोळ पाऊस, विजा, वारा व गडगडाटीच्या वातावरणाची शक्यता असल्याचा अंदाज सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला.

मध्य महाराष्ट्रातील खांदेश ते कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यापर्यंतच्या दहा जिल्ह्यांत मंगळवार दि. १८ ते गुरुवार दि. २० मार्चदरम्यानचे तीन दिवस तर मराठवड्यातील आठ जिल्ह्यांत मंगळवार दि. १८ ते शुक्रवार दि. २१ मार्चदरम्यानचे चार दिवस व विदर्भातील अकरा जिल्ह्यांत शुक्रवार व शनिवार दि. २१-२२ मार्च दरम्यानचे दोन दिवस या अवकाळी वातावरणाचा परिणाम जाणवेल. मराठवाडा, विदर्भ व जळगाव, दक्षिण नगर, सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यांत दि. २१ मार्चला या वातावरणाचा प्रभाव अधिक जाणवेल असे वाटते. दरम्यानच्या पाच दिवसांत कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात दिवसाच्या दुपारच्या कमाल तापमानात काहीशी घट होऊन तापमान सध्यापेक्षा २-३ डिग्रीने खालवेल, असा अंदाज खुळे यांनी व्यक्त केला.



## नळवाडीच्या सरपंचपदी एकनाथ सहाणे बिनविरोध

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नळवाडी येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी एकनाथ बळीराम सहाणे (देशमुख) यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणुका अधिकारी तथा तलाठी श्रीमती आर. व्ही. कुलकर्णी यांच्या अध्यक्षताखाली सदस्यांच्या विशेष बैठकीत एकनाथ सहाने यांची सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामसेवक काळे यांनी निवडणूक सहाय्यक म्हणून काम पाहिले. याप्रसंगी ग्रामपंचायतचे सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर सहाने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कर्मचारी विलास कदम, संगणक विभाग छाया सहाने, कृषिदूत भारतराव देशमुख, ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश वेताळ, लोकशिक्षण मंडळ माजी विश्वस्त मारोतराव दराडे, विद्यमान विश्वस्त सुदामराव दराडे, माजी सरपंच अर्जुनराव दराडे, भीमराज दराडे, सुनील एकनाथ सहाने, माजी सरपंच रामदास सहाने, दीपक सहाने, खरेदी विक्री संघ माजी संचालक बाळासाहेब देशमुख आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृक्षसंवर्धनासाठी २८ हजारांचा निधी



**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील दिवंगत कवी प्रा. चंद्रकांत कानडी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त उमाळा या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात कवितासंग्रहाच्या विक्रीतून जमा झालेल्या रु.२३,४००/- रकमेसह कानडी कुटुंबीयांकडून वैयक्तिकरीत्या ५ हजार असे २८ हजार ४०० रुपयांची देणगी ग्रीन रिवोल्यूशन संस्थेला वृक्षसंवर्धनासाठी देण्यात आली. याप्रसंगी डॉ. ललित पवार, आनंद कानडी यांच्यासह ग्रीन रिवोल्यूशनचे पदाधिकारी व कानडी कुटुंबीय उपस्थित होते.

## ग्राहकांनी अनावश्यक वस्तू खरेदीचा मोह टाळावा

### जागतिक ग्राहकदिनी नायब तहसीलदार सागर मुंदडा यांचे आवाहन

**सिन्नर : प्रतिनिधी**



ग्राहकांनी अनावश्यक वस्तू खरेदी करण्याचा मोह टाळावा तसेच फसवणूक झाल्यास ग्राहक मंचाकडे दाद मागता येते, असे प्रतिपादन नायब तहसीलदार सागर मुंदडा यांनी केले.

सिन्नर ग्राहक पंचायत व सिन्नर तहसील यांच्या संयुक्त विद्यमाने सिन्नर तहसील येथे १५ मार्च जागतिक ग्राहक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर नायब तहसीलदार संजय धनगर, पुरवठा निरीक्षक विशाल धुमाळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार महामित्र दत्ताजी वायचळे, ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक तथा अशासकीय सदस्य दत्ता शेळके, डॉ. श्यामसुंदर झळके आदी उपस्थित होते.

सागर मुंदडा यांनी ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना घ्यायची काळजी व ग्राहकांचे हक्क व कर्तव्य या बाबतीत सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. दत्ता वायचळे यांनी प्रास्ताविकात ग्राहक दिन मोठ्या स्वरूपात साजरा करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास या वर्षी शासनाकडून सस्टेनेबल जीवन शैलीकडे न्याय संक्रमण ही थीम देण्यात आली असल्याचे दत्ता शेळके यांनी सांगत त्याबाबत उपस्थितांना शाश्वत जीवनशैली या विषयी सविस्तर माहिती दिली. १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन याच दिवशी का साजरा केला जातो याची माहिती व इतिहास उपस्थितांना डॉ. श्यामसुंदर झळके यांनी आपले मनोगतात व्यक्त केले. पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे, तसेच ग्राहकांनी अनावश्यक वस्तू खरेदी करण्याचा मोह टाळावा जेणेकरून या अनावश्यक वस्तू कालबाह्य झाल्यावर त्याचा उपयोग होत नाही. पैशांचा अपव्यय होतो. शिवाणी बोराडे, सदस्य ग्राहक पंचायत सिन्नर यांनी फसवणूक झालेल्या पीडितांना ग्राहक आयोगा कडून कसा न्याय मिळतो व कार्यप्रणाली याची माहिती दिली. सूत्रसंचालन पुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी विवेक जमदाडे यांनी केले. कार्यक्रमास रवींद्र घोगे, बापूसाहेब चतुर, शशिकांत सावंत, बस्तीराम कुंदे, प्रमोद काकडे, प्रभाकर चतुर ग्राहक पंचायत सदस्य, सिन्नर तहसील कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## नागरिकांना वेठीस न धरता महसूलचे काम सुरू करा

### आमदार आशुतोष काळे यांच्या तहसीलदारांना सूचना

**वावी : वार्ताहर**

महसूल विभागाने सुरू केलेल्या काम बंद आंदोलनामुळे नागरीकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची सुरु असलेली मुजोरी चालणार नाही नागरिकांना वेठीस न धरता महसूल विभागाचे काम त्वरित सुरू करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी तहसीलदार महेश सावंत यांना दिल्या.

कोपरगाव तालुक्यातील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यावर करण्यात आलेल्या कारवाईच्या निषेधार्थ कोपरगाव तालुका तलाठी संघटनेने मागील आठ दिवसापासून काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यामुळे नागरिकांना होत असेलल्या त्रासाची दखल घेवून आ.आशुतोष काळे यांनी तहसीलदार महेश सावंत यांना यावर तातडीने तोडगा काढून काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांचे महसूल विभागाशी सबंधित कामे अडली आहेत. १० वी १२ वीच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी विविध शासकीय दाखल्यांची आवश्यकता असते. प्रवेशाच्या वेळी वेळेत दाखले उपलब्ध होत नसल्यामुळे १० वी १२ वीचे विद्यार्थी परीक्षा आटोपताच विविध शासकीय दाखले काढून ठेवतात त्यामुळे पुढच्या अडचणी कमी होऊन विद्यार्थी व पालकांची धावपळ होत नाही.

परंतु तलाठ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे विद्यार्थ्यांना शासकीय दाखले मिळविण्यात अडचणी येत आहेत.

तसेच नागरीकांना विविध कामांसाठी उत्पनाचे दाखले तसेच शेतीवर घेतलेल्या कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी शेतीचे चालू वर्षाचे उतारे आवश्यक असतात. सर्वच बँकांची वर्षअखेरीचा ताळेबंद जुळविण्याची प्रक्रिया वेगात सुरु असून कर्जधारक शेतकऱ्यांकडे कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी बँकांचा तगादा सुरु आहे परंतु तलाठ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे शेतकऱ्यांना शेतीचे सात बारा उतारे मिळत नाही अशा अनेक अडचणींचा सामना शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना करावा लागत आहे.

त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना महसूल विभागाच्या काम बंद आंदोलनामुळे येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची सुरु असलेली मुजोरी यापुढे खपवून घेणार नाही. त्याबाबत तुम्ही केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करून त्यांच्याकडून मार्गदर्शक सूचना घ्या व त्या सूचनेनुसार काम करा. सर्वसामान्य जनतेला त्रास होणार नाही याची काळजी घेऊन महसूल विभागाचे काम त्वरित सुरू करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी तहसीलदार महेश सावंत यांना दिल्या.

## फळभाजीपाला विक्रेत्यांसाठी आता लक्ष्मणरेषा

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नर शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सिन्नर पोलिस स्टेशन आणि नगरपालिका प्रशासनाने संयुक्त मोहीम हाती घेतली असून, कारवाईच्या दुसऱ्या दिवशी सिन्नर बसस्थानक परिसर आणि जुना खापराळेनाका परिसरात रस्त्याच्या कडेला नायलॉन दोऱ्या ठोकून हातगाडे चालक, फळविक्रेते आणि भाजीपाला विक्रेत्यांसाठी लक्ष्मणरेषा आखून देण्यात आली. लक्ष्मणरेषा ओलांडल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा यावेळी व्यावसायिकांना देण्यात आला.**



सोमवारी (दि.१७) पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शहरातील नाशिकवेस, भाजीबाजार, आडवाफाटा, अंजिक्यतारा हॉटेल परिसरात फिरून भाजीपाला व्यावसायिक आणि हातगाड्यांवरील विक्रेत्यांना वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा प्रकारे रस्त्याच्या कडेला बसून व्यवसाय करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर मंगळवारी (दि.१८) सकाळी ११ वाजेपासून पुन्हा या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. बसस्थानक परिसरात महात्मा फुले पुतळ्यालगत असलेले अंडाभुर्जी व्यावसायिक, समोरच्या बाजूला असलेले फळविक्रेते, इतस्ततः बसून वाहतूक कोंडीस हातभार लावतात. त्याचप्रमाणे शिवाजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेले वडापावसह अन्य काही व्यावसायिक वाहतूक कोंडीस अडथळा ठरत असल्याने या भागात पोलिस व नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कडेला नायलॉन दोऱ्या ठोकून या दोऱ्यांच्या आतच रस्त्याच्या कडेला व्यवसाय करण्याची तंबी व्यावसायिकांना देण्यात आली. त्या कारवाईत पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह कर्मचारी समाधान बोऱ्हाडे, कृष्णा कोकाटे, रवींद्र चिने, आप्पासाहेब काकड, हरीष आव्हाड, नवनाथ पवार, नगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे अभियंता देवेंद्र शिंदे, कर विभागाचे अश्विन पुंड, जागाभाडे विभागाचे अमित रायते यांच्यासह कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले होते.

### आज शहरातील उर्वरित भागात कारवाई

आडवा फाटा परिसर, अजिंक्यतारा भागात त्याचप्रमाणे खासदार पूल आणि नाशिकवेस परिसरातील भाजीबाजारात व्यावसायिकांना शिस्त लावण्यासाठी तेथेही अशाच प्रकारे नायलॉन दोऱ्या ठोकून व्यावसायिकांना लक्ष्मणरेषा आखून दिल्या जाणार आहेत. आज (दि.१९) पोलिस आणि नगरपालिका प्रशासनाच्या वतीने संयुक्तरीत्या कार्यवाही करण्यात येणार आहे.